म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

थमाला, पुष्प १ लें



REFBK-0004637

आवृत्ति १ ली ]

[ किंमत १० आणे

४८५

सं.चू.
23/11/32

मराठी ग्रंथ संग्रहालय
८८८५

REFBK-0004637

भारत-प्रकाश-ग्रंथमाला-पुष्प १ लें

# सेनापति तात्या टोपे

यांचें

## अल्प चरित्र

REFBK-0004637

डॉ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 4636

—प्रकाशक—

श्रीपाद दत्तात्रेय वैद्य

सन १९३२

किंमत १० आणे

—प्रकाशक—
श्रीपाद दत्तात्रय वैद्य
आर्य प्रकाशन कार्यालय,
३७५ सदाशिव पेठ, पुणें, २

( पुनर्मुद्रणाचे वगैरे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते
अ. वि. गृह लोकसंग्रह
छापखाना पुणें

ॐ

श्रीराम

फूल नाहींच,

परंतु, सेवेच्या फुलाची ही पाकळी

त्या मराठी साम्राज्याचे

अंतिमचे विस्मृत सेनापति

# तात्या टोपे

यांचे चरणीं

कृतज्ञ हृदयानें सादर समर्पण.

ना. दा. सावरकर.

# एस. डी. वैद्य आणि कंपनी.

## नव्या–जुन्या पुस्तकांचे व लेखन-साहित्याचे व्यापारी

### काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें, २

आमचेकडे शाळा-कॉलेजोपयोगी व नाटकें, कादंबऱ्या, चरित्रें, निबंध, काव्यग्रंथ, धार्मिक ग्रंथ, विनोदी वाङमय, लघुकथा वगैरे सर्व प्रकारचीं नवीं-जुनीं पुस्तकें विकत मिळतात.

सर्व प्रकारचीं जुनीं पुस्तकें विकत घेतलीं जातात.

सर्व प्रकारचें लेखन-साहित्य विकत मिळतें.

शाळा-कॉलेजें व ग्रंथालयांस योग्य कमिशन दिलें जातें.

वरील सर्व माल परगांवीं व्ही. पी. नें पाठविला जातो.

---

# भारत-प्रकाश-ग्रंथमाला

### ३७५ सदाशिव पेठ, पुणें, २

एका वर्षांत तीन पुस्तकें प्रसिद्ध होतील. एक रुपया अगाऊ भरून मालेचे वर्गणीदार होणारांस मालेच्या प्रत्येक पुस्तकावर शें. १२॥ टक्के कमिशन मिळेल.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठे |
|---|---|---|
| | प्राक्कथन | प्रारंभीं |
| १ | कोण व कोठले ? | १ ते ७ |
| २ | १८५७ च्या क्रांतीचीं पूर्वकारणें व तिचा स्फोट. | ७ ते २० |
| ३ | कानपूरची क्रांति व पेशवाईचें पुनरुज्जीवन. | २१ ते ३८ |
| ४ | तारा आकाशांत चढूं लागला. | ३८ ते ५० |
| ५ | तारा अस्तगिरीकडे उतरूं लागला. | ५० ते ६८ |
| ६ | तारा अस्तगिरीसमीप आला. | ३८ ते ७१ |
| ७ | तारा अस्तंगत झाला | ७१ ते ८१ |
| ८ | परिशिष्ट १ | ८३ ते ८४ |


संच. नं. ७७०९
ता. २३/११/३२
नं. ६६००

# एस. डी. वैद्य आणि कंपनी

वाचनालय शाखा

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड पुणें, २

नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, निबंध, चरित्रें, काव्य-ग्रन्थ, विनोदी वाङ्मय, वगैरे सर्व प्रकारचीं वाचनीय पुस्तकें वाचावयास दिलीं जातात.

पुस्तकाच्या किंमतीइतकी रक्कम अनामत ठेवावी लागते.

वाचन-मूल्य ४ दिवसास २ आणे व पुढें दर दिवसास अर्धा आणा.

---

THE WORKS OF:—

1 Swami Rama Tirtha Vol. I–VIII Re. 1-0-0 each.
2 Dr. Rabindranath Tagore.
3 Shri Aurobindo Ghosh.
4 Swami Vivekanand.
5 The story of Swami Rama by Puransingh Rs. 3-0-0

Catalogue on application to:—

**S. D. Vaidya & Co.**

Booksellers & Publishers,

54 Budhwar, Poona, 2

# प्रकाशकाचें निवेदन

सन १८५७ सालीं झालेल्या स्वातंत्र्य-युद्धाचे सेनापति तात्या टोपे यांचें चरित्र प्रसिद्ध करण्याचा आज योग येत आहे. झांशीच्या राणीचें चरित्र प्रसिद्ध झालें आहे. सन १८५७ या नावाचें एक पुस्तक प्रो. बेहेरे यांनींहि लिहिलें आहे. परंतु सेनापति तात्या टोपे यांचें चरित्र आजवर कोणीहि प्रसिद्ध केलें नाहीं. शेवटचे बाजीरावसाहेब पेशवे यांचे दत्तक पुत्र नानासाहेब पेशवे यांचें पेन्शन इंग्रजसरकारनें बंद केल्यामुळें नानासाहेब चिडून जाऊन त्यांनीं इंग्रजसरकाराविरुद्ध बंड केलें. या कामीं तात्या टोपे यांनीं नानासाहेबांचे व मराठी राज्याचे एकनिष्ठ सेवक या नात्यानें शेवटचा एक शिपाई उरेपर्यंत सर्व उपायांची शिकस्त करून इंग्रजसरकारास जेरीस आणलें. परंतु, सेनापति तात्या टोपे यांना बरोबरीच्या नात्यानें न वागवितां सामान्य खुनी माणसाप्रमाणें फांशी देण्यांत आलें. असो.

श्रीपाद दत्तात्रय वैद्य

# प्राक्कथन.

कोणतेंहि मूल जन्माला आल्याबरोबर व जन्मल्यानंतर कोणत्याहि सर्वसाधारण मुलाप्रमाणेंच रडतें, हंसतें व इतर सर्व व्यवहार करतें. त्यावेळीं त्याच्यामध्यें कोणतेंच अनन्यत्व नसतें, कोणतेंच अलौकिकत्व नसतें. पुढील आयुष्यांत मोठमोठे जगद्विख्यात झालेले पुरुषहि इतर मुलांप्रमाणेंच रडले, इतर मुलांप्रमाणेंच हंसले. त्यावेळच्या त्यांच्या त्या रडण्यांत वा हंसण्यांत कोणतेंहि अलौकिकत्व नव्हतें, कोणतेंहि असामान्यत्व नव्हतें. मोठे रामकृष्णासारखे अवतारी पुरुष जरी घेतले तरी ते जन्मतः इतर अर्भकांप्रमाणें रडले, हंसले. कथेकरी पुराणिकांच्या भावड्या काल्पत कथा सोडल्या तरी हेंच सत्य आपणांस आढळून येईल.

'नादत्ते कस्यचित् पापं, न चैव सुकृतं विभुः'।

अशाच रीतीनें सर्व मानवी मुलें जन्माला येतात व त्यांच्या अर्भकावस्थेंत सारख्याच क्रीडा करतात. परंतु, त्यांचें मोठेंपण, त्यांचें अलौकिकत्व, त्यांचें असामान्यत्व व त्यांचें अवतारत्व हें त्यांच्या पुढील चरित्रांत समाविष्ट झालेलें असतें. त्यांच्या कर्तृत्वांत त्यांचा जन्म असतो. 'नर करणी करे, तो नरका नारायण बन जाय' हीच मोठेपणाची, अवताराची खरी व्याख्या आहे. प्रथम सर्वजण 'नर'च असतात; व त्यांनीं 'करणी' केली तर व तेव्हांच ते 'नारायण' होतात. कोणताहि नर जन्माच्या वेळीं 'अवतार' नसतो. तर तो जसजशी 'नारायणा'ची करणी करीत जातो, तसतसें अवतारत्व त्यांत अवतरत जातें. 'अवतार'त्व स्वयंभु नसतें; तें स्वतःच्या उत्कट, अचाट, असामान्य व अलौकिक 'करणी' वर अवलंबून असतें.

आणि म्हणूनच ज्यावेळीं एकाद्या अचाट व अलौकिक कर्तृत्वानें एकादा पुरुष जगामध्यें प्रसिद्धीला येतो, त्यावेळीं त्याच्या जन्मासंबंधानें, जन्म स्थानासंबंधानें, शतशः व सहस्रशः व्यक्ती जिज्ञासेनें व कुतूहलानें चौकशी करतात, माहिती काढतात, तेथील स्थानांच्या यात्रा करतात, तीं स्थानें क्षेत्रें होतात. त्यांच्या जन्मतिथी हजारों लोक पाठ करतात व मग हजारों

ज्योतिषी त्यांच्या कुंडल्या मांडून सर्व उच्चीचे, सर्व शुभ मंगलाचे, सर्व बलिष्ठ ग्रह त्यांच्या जन्मस्थानीं होते असें सिद्ध करण्यास झटतात.

ज्या स्वातंत्र्यवीराचें, महाराष्ट्र वाचकांपुढें आज चरित्रचिंतन करण्याचें आम्हीं ठरविलें आहे, त्या तात्या टोपे यांच्यासंबंधींहि वरील नियमच लागू पडत आहे. तात्या टोपे ज्यावेळीं महाराष्ट्रांत जन्मले त्याचवेळीं शेंकडों हजारों अर्भकें या महाराष्ट्रांत जन्मलीं. परंतु, त्यांपैकीं बहुतेकांनीं त्यांच्या पुढील आयुष्यांत पारतंत्र्याची खंति बाळगली नाहीं, स्वातंत्र्याची प्रीति धरली नाहीं; देश व धर्म यांच्या उन्नतीसाठीं स्वतःच्या प्राणांची होळी केली नाहीं. १८१८ या वर्षी धुळीत मिळालेल्या महाराष्ट्राच्या भगव्या-झेंड्याच्या चिंधड्या उडालेल्या पाहून व जरिपटक्याचें अधोवदन अवलोकून तात्या टोपे ज्या दिवशीं जन्मले त्या दिवशीं जन्मलेल्या अर्भकांपैकी पुढें कोणी-हि त्याची लज्जा मानली नाहीं; व कोणीहि स्वतःच्या देहाचें बलिदान करून मराठ्यांचें विगत झालेलें साम्राज्य पुनर्जीवित करण्याचा प्रयत्न केला नाहीं—आणि म्हणून त्या अर्भकांचे पुरुष होऊन ते मेले तरी त्यांच्या जन्माच्या तिथी कोणी विचारीत नाहीं; त्यांच्या मरणानें कोणी रडत नाहीं !

अनेक फुलें फुलतीं।
फुलोनिया सुकोनि जाती।
कोणी त्यांची महती गणती। ठेविली असे! ॥

परंतु, तात्या टोपे हे अशा ‘ अनेक फुलां ’पैकीं नव्हते. ते पुढील कोटींतील होते—

परी जें गजेंद्रशुंडेनें उपटिलें।
श्रीहरीसाठीं मेलें।
कमलफूल तें अमर ठेलें।
मोक्षदायी पावन।

अशा त्या मोक्षदायी पावन कमलपुष्पाप्रमाणें, तात्या टोपे यांनीं आपलें सर्वस्व, गजेंद्राप्रमाणें जी संकटग्रस्त झालेली आहे, त्या या मातृभमीकरतां श्रीहरीचरणीं अर्पण केलें. म्हणूनच त्यांच्या जन्मतिथीची, त्यांच्या जन्मस्थानाची, त्यांच्या जीवन कार्याची व त्यांच्या अद्भुत कृत्यांची

माहिती मिळविण्याचा चटका आज महाराष्ट्रांतील कृतज्ञ हृदयांना लागलेला आहे. त्याच चटक्यानें प्रेरित होऊन आम्ही आज या थोर स्वातंत्र्य-सेनापतीचें अल्पमात्र चरित्रचिंतन येथें करणार आहों. तात्या टोपे यांच्यासंबंधीं कोणतीहि विस्तृत व विश्वसनीय माहिती स्वतंत्रपणें अद्याप कोठें प्रकाशित झालेली नाहीं. विख्यात इतिहासाचार्य कै. राजवाडे, खरे वगैरेंचें संशोधन मराठ्यांच्या सतराव्या व अठराव्या शतकांतील इतिहासासंबंधीं चाललें होतें. त्यामुळें त्यांना वेळ मिळाला नाहीं. व दुसरेंहि एक अधिक महत्त्वाचें कारण होतें, तें म्हणजे त्यावेळीं असें समजलें जात होतें कीं, १८५७ चें 'क्रांतियुद्ध' अजून इतिहासांत समाविष्ट झालेलें नाहीं; प्रचलित राजकारणाशींच तें दूरान्वयानें कां होईना संबद्ध आहे. आणि याच समजुतीनें कोणीहि संशोधक वा लेखक त्यावेळीं १८५७ च्या क्रांतियुद्धासंबंधानें जिज्ञासा दाखवावयास वा इतिहास लिहिण्यास सरकारच्या भयानें धजत नसे; व सरकारहि १८५७ चें कोणी नांव काढलें कीं, डोळे वटारीत असे. इतकेंच नव्हे, परंतु, १८५७ च्या उत्थानाला 'शिपायांचें बंड'च म्हटलें पाहिजे, 'क्रांतियुद्ध म्हणतां कामा नये' असा सरकारचा कटाक्ष होता व लेखकांची तदनुरूप प्रवृत्ति होती. व त्यामुळें१८५७ सालीं जे जे देशभक्त त्या स्वातंत्र्यसमरांत समाविष्ट झाले त्यांची माहिती केवळ दंतकथा अथवा कल्पित कथा, याच्या पलिकडे त्यावेळीं मुळींच कोणाला अवगत नव्हती. नाहीं म्हणावयास झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचें चरित्र मात्र श्री. पारसनीस यांनीं विस्तृत असें लिहून महाराष्ट्रास उपकृत करून ठेविलें आहे.

त्याचप्रमाणें बॅ. सावरकर यांनीं इ. स. १९०९ मध्यें सत्तावन्नचें 'स्वातंत्र्य युद्ध' या नांवाचें एक विस्तृत माहितीचें पुस्तक प्रथम मराठींत लिहिलें होतें. परंतु, त्यावेळच्या राजकीय परिस्थितींत तें छापलें जाऊं शकलें नाहीं. म्हणून मग त्यांनीं त्याचें इंग्रजींत भाषांतर करून तें विलायतेंतच प्रसिद्ध केलें. परंतु, प्रसिद्ध होण्याच्या आधींच हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचा त्यांच्यावर कोप झाला व तें त्यांनीं बहिष्कृत ठरवून त्यास हिंदुस्थानात आणण्यास बंदी केली.

याव्यतिरिक्त त्यावेळीं अन्य कोणी १८५७ च्या क्रांतियुद्धासंबंधीं वा त्यांतील व्यक्तीसंबंधी विशेषसें लिहिलेलें नाहीं.

परंतु, ती परिस्थिति आज सर्वस्वी पालटली आहे. १८५७ च्या क्रांतियुद्धास आतां अर्धशतक उलटून गेल्यामुळें ते सर्व प्रकरण निःसंशयपणें 'इतिहासा'मध्यें समाविष्ट झालें आहे व म्हणून संशोधकास व इतिहास लेखकांस त्यासंबंधीं आतां सत्यचित्र रेखाटण्यास मुळींच प्रत्यवाय उरला नाहीं. त्याचप्रमाणें सरकारची दृष्टि आतां त्या प्रकरणाकडे 'इतिहास' म्हणून बघण्याइतकी निवळली आहे. तेव्हां त्यावेळच्या स्वातंत्र्यवीरांसंबंधीं व देशभक्तांसंबंधीं आज महाराष्ट्रीयांनीं कृतज्ञतेनें संशोधन केलें पाहिजे. आणि संशोधनाकडे सांप्रत महाराष्ट्रांतील लेखकांचें लक्ष वेधत आहे हें सुचिन्ह होय. याचें प्रत्यंतर म्हणजे प्रसिद्ध लेखक प्रो. बेहेरे यांनीं अगदीं अलीकडे म्हणजे १९२७ सालीं एक विस्तृत, साधार व मार्मिक असा ग्रंथ 'सन १८५७' या नांवानें प्रसिद्ध केला आहे.

त्याचप्रमाणें आमचे बालमित्र श्री. घनःश्याम बाळकृष्ण चिपळूणकर पुणें, यांनींहि एक झांशीच्या महाराणीचें अत्यंत चटकदार छोटेंसें जीवनचरित्र थोडे वर्षापूर्वी प्रसिद्ध केलें आहे. आम्हीहि याच हेतूनें आज तात्या टोपे यांचें अल्प चरित्र वाचकांस सादर करीत आहोंत. तात्या टोपे यांच्या चरित्राचा हा प्रथम प्रयत्न, अल्प क्षेत्रामध्येंच करावा लागत आहे. व त्यामुळें तो त्रोटकपणें होणें अपरिहार्य आहे. तरीपण त्याच्या वाचनानें विस्तृत चरित्रलेखनाची इच्छा अन्य कोणा समर्थ चरित्रकारांस झाली तरी या चरित्रचिंतनाचें एक कार्य सफल झालें असेंच आम्ही समजूं.

मराठी साम्राज्यासारखा एका बलिष्ठ साम्राज्याचा अंत १८१८ सालीं झाला. त्यावेळीं अगदीच क्षीण आणि क्षुद्र प्रतिकार करण्यांत आला. ज्याच्या स्थापनेसाठीं सतराव्या शतकाचा सबंध उत्तरार्ध, छत्रपति शिवाजी महाराज, संभाजी महाराज व राजाराम महाराज यांना लढाया करण्यांत व्यतीत करावा लागला, त्या थोर मराठी साम्राज्याचा अंत इ. स. १८१८ या वर्षी केवळ दोन चार फुसक्या लढायांत व्हावा, हें दृश्य अत्यंत उद्वेग उत्पन्न करणारें आहे. याची जणु काय खंति वाटूनच १८५७ च्या पिढीनें स्वातंत्र्यसमराचें आह्वान करून मराठी साम्राज्याच्या वैभवाला साजेल अशी रणधुमाळी केली व त्यामध्यें पराभव होऊन मराठी साम्राज्याचें

अवशिष्ट वैभव जरी पूर्णपणें लुप्त झालें, तरी तो झगडा कांहीं अपवाद वगळून त्या साम्राज्याच्या नांवाला साजेल असाच झाला यांत शंका नाहीं. प्रत्यक्ष पेशवे कुलांतील तीन पुरुष नानासाहेब–बाळाराव व रावसाहेब हे या होमांत बळी पडले व त्याच कुलांतील बांदेवाले नबाबहि सर्व राजैश्वर्य गमावून बसले. त्याचप्रमाणें झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांनीं घनघोर संग्राम करुन धारातीर्थीं देह ठेविला; आणि पेशव्यांचे मुख्य सेनापति तात्या टोपे यांनीं, मराठी साम्राज्य–संस्थापनेच्या काळचे प्रसिद्ध सेनापति धनाजी, संताजी यांच्याप्रमाणेंच अद्भुत पराक्रम केला व शेवटचा एक शिपाई जवळ असेपर्यंत हटेलपणानें, 'जितेंगे तो और बी लढेंगे' असा मरणाला तुच्छ करणारा, मराठ्यांचा दुर्दांत दृढनिश्चय जगापुढें प्रगट केला. अशा रीतीनें मराठी साम्राज्याच्या पतनाला १८१८ सालीं जो क्षुद्र व क्षीण प्रतिकाराचा काळिमा लागला होता, तो धुवून काढला गेला. स्वराज्याचें पुनर्जीवन करणें जरी न साधलें, तरी त्याचा मृत्यु, त्याच्या तोलामोलाच्या वैभवानें संपादण्यांत त्यांनीं यश मिळविलें. स्वराज्याच्या झगड्यांत यश येऊन त्याच्या सिंहासनावर बसण्याचें भाग्य संपादणें, त्याच्याइतकेंच तें मिळविण्याच्या प्रयत्नांत प्राणदानासहि सिद्ध होणें, हें थोरच कृत्य आहे. असें वैभवयुक्त मरण पत्करण्यांत ज्या महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसेनापतीनें अग्रस्थान पटकाविलें, त्या तात्या टोपे यांचें अल्पसें चरित्र, त्यांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्याच्या इच्छेनें कृतज्ञ हृदयानें आम्ही सर्व मराठमोळ्यांस सादर करीत आहोंत. तें त्यांना स्फूर्तिदायक होवो, अशी परमेश्वरचरणी प्रार्थना आहे.

गिरगांव, मुंबई.
वर्षप्रतिपदा शके १८५४.

**ना. दा. सावरकर.**

# सेनापति तात्या टोपे यांचें अल्पचरित्र

## प्रकरण १ लें

## कोण व कोठले ?

तात्या टोपे या नांवानें एका काळीं अखिल हिंदुस्थानांत निनादित झाले होते, ते तात्या टोपे हे कोण होते व कोठले होते, असा प्रश्न सहजच मनापुढें उभा राहतो.

१८५७ च्या क्रांतिकारक स्फोटांत जे अनेक पुरुष तेजोमय ताऱ्यां-प्रमाणें अकस्मात् उदयाला आले व क्षणमात्र आपल्या तेजोवलयानें सर्वांचे डोळे दिपवून पुन्हां भूतकाळच्या अस्तागिरीमागें अंतर्हित झाले, त्या पुरुषां-पैकीं तात्या टोपे हे एक प्रमुख पुरुष होते. दुर्दैवानें त्यांच्या बाल्याचा साद्यंत इतिहास आजवर उपलब्ध झालेला नाहीं. म्हणून त्यांच्या बाल्यासंबंधीं आपल्या मनांत जी एक अनावर जिज्ञासा उत्पन्न होते ती आजच्या परिस्थि-तींत पूर्ण करतां येत नाहीं. तरी पण जी अल्पस्वल्प माहिती उपलब्ध झाली ती पुढें दिली आहे.

तात्या टोपे यांचें घराणें मूळ येवलें येथील होय. येवलें हें गांव सध्या-च्या प्रदेशविभागणीप्रमाणें नाशिक जिल्ह्यांतील एक तालुक्याचें गांव आहे या गांवीं तात्या टोप्यांचें घराणें अजून वसत आहे. तात्या टोप्यांच्या वडि-लचें नांव पांडुरंगपंत असें होतें. या पांडुरंगपंतांना एकंदर आठ मुलें झालीं. त्यांतील दुसरा मुलगा रघुनाथ हाच पुढें तात्या टोपे या नांवानें प्रसिद्धीस आला.

तात्या टोपे यांचा जन्म इ. स. १८१४ या वर्षी येवलें या गांवीं झाला. तात्या टोपे यांचे वडील पांडुरंगपंत यांचा व शेवटच्या बाजीरावांच्या वेळीं प्रसिद्धीस आलेले त्रिंबकजी डेंगळे यांचा पूर्वीचा परिचय व ऋणानुबंध होता. कारण त्रिंबकजी डेंगळे हेहि येवल्याजवळ जें निफाड म्हणून नाशिक जिल्ह्यांतच आज तालुक्याचें गांव आहे, तेथील रहिवासी होते. आणि असें सांगतात कीं, त्रिंबकजी डेंगळ्याचे ओळखीनेंच पुण्यास शेवटच्या बाजीरावांचे दरबारीं पांडुरंगपंतांची ओळख झाली व तेथें त्यांना प्रवेश मिळाला.

तात्या टोपे यांच्या जन्मानंतर लवकरच म्हणजे चार वर्षांनींच इ. स. १८१८ या वर्षी पेशवाईचा अंत होऊन शेवटचे बाजीराव वार्षिक आठ लाखांचें वेतन स्वीकारून ब्रह्मावर्ती प्रयाण करते झाले. त्यावेळीं त्यांच्याबरोबर जीं कित्येक महाराष्ट्रीय कुटुंबें तिकडे गेलीं त्यांमध्येंच पांडुरंगपंत टोपे यांचेंहि कुटुंब तिकडे गेलें. त्यावेळीं अल्पवयी असलेले तात्या टोपे हेहि अर्थातच वडिलांबरोबर ब्रह्मावर्ती गेले. ब्रह्मावर्ताला आजदेखील टोप्यांचें एक घराणें विद्यमान आहे.

तात्यांच्या वडिलांना बाजीरावसाहेबानीं ब्रह्मावर्ती आपल्या धर्मादाय खात्यावर मुख्य अधिकारी म्हणून नेमलें. तेथें त्यांनीं त्या खात्याची चोख व्यवस्था ठेवली होती.

तात्यांचें सर्व बालपण ब्रह्मावर्तासच गेलें. तेथें त्यावेळीं त्यांचे जे संवगडी व सहाध्यायी म्हणून होते ते सर्वच पुढें विख्यात पुरुष निपजले.

त्यावेळच्या ब्रह्मावर्ताच्या वातावरणांत कांहीं एका अद्वितीयतेचें वातावरण संचरलें होतें असें दिसतें. कारण, पुढें ज्या विख्यात ऐतिहासिक व्यक्ती झाल्या त्यांच्यापैकीं कितीतरी जण ब्रह्मावर्तांत त्यावेळीं आपल्या बाळलीला करण्यांत गर्क झाले होते.

## नानासाहेब पेशवे

१८५७ च्या घटनेंतील मुख्यांपैकीं एक सूत्रधार नानासाहेब यांचा जन्म इ. स. १८२४ या वर्षी पुण्याजवळील कर्जत तालुक्यांतील वेणु या गांवीं झाला. म्हणजे तात्या टोपे हे नानासाहेबांपेक्षां दहा वर्षांनीं वडील

होते. नानासाहेबांच्या वडिलांचें नांव माधवराव नारायण भट असें होतें व आईचें नांव गंगाबाई होतें. हें भट घराणें व पेशव्यांचें मूळ भट घराणें हीं घराणीं अगदीं जवळचीं होतीं. पुढें माधवराव यांच्या मनांत परागंदा झालेल्या बाजीरावाकडे ब्रह्मावर्ताला जाण्याचें आलें. त्याप्रमाणे नानासाहेब हे २।३ वर्षांचें असतां, माधवराव हे वेणु गांवाहून ब्रम्हावर्ती गेले. तेथें बाजीरावांनीं त्यांचें योग्य प्रकारें आदरातिथ्य करून त्यांना तेथेंच ठेवून घेतलें. नानासाहेबांची बालवयांतहि असलेली सतेज व गौरवर्ण मुद्रा पाहून, बाजीरावांना त्यांचा फार लळा लागला व बाजीरावांनीं नानांना आपल्या मांडीवर दत्तक घेण्याचें निश्चित करुन, थोड्याच म्हणजे १८२७ या वर्षीच नानांना सविधी दत्तक घेतलें. अशा रीतीनें हा ऐतिहासिक समारंभ पार पडला व नाना हे त्या थोर पेशवेपदाचे यथायोग्य अधिकारी झाले.

त्याचप्रमाणें नानांचे पहिल्या घरचे वडील बंधु बाबाभट हेहि जवळ जवळ तात्या टोप्यांच्याच वयाचे होते. तेहि त्या ब्रह्मावर्ताच्या गंगातीरावरील वाळवंटांत ह्यापुढें विख्यात होणाऱ्या भावाबरोबर व संवगड्यांबरोबर खेळत बागडत होते. हे बाबाभट पुढें सत्तावनच्या समरयज्ञांत एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून गणले गेले. व त्यांनीं अनेक महत्त्वाचीं कार्यें केलीं.

श्रीमंत बाजीरावांनीं एकंदर तीन पुत्र दत्तक घेतले होते. नानासाहेब, दादासाहेब व बाळाराव. यांपैकीं दादासाहेब हे लवकरच म्हणजे बाजीरावांच्या आयुष्यांतच मरण पावले. तेव्हां त्यांच्या पत्नी रोहिणीबाई यांनीं आपल्या मांडीवर रावसाहेब या नांवाचा एक पुत्र दत्तक घेतला. श्रीमंत बाळाराव हे १८५७ च्या रणधुमाळीच्या आरंभापासून नानांचे मुख्य सेनापति होते व ते नानासाहेबांच्या भाग्याच्या भरतींत, तसेंच दुर्भाग्याच्या ओहोटींत अखंड व एकनिष्ठपणें नानांचे पाठीराखे होते. ते नानासाहेबांबरोबर नेपाळांत गेले व तेथें अंतीं एका चकमकींत धारातीर्थी पतन पावले.

## रावसाहेब पेशवे

त्याचप्रमाणें नानांचे पुतणे रावसाहेब हेहि यावेळीं आपल्या बाललीला याच ब्रह्मावर्तीच्या गंगाघाटावर वाळवंटांतून आणि राजप्रासादांतून

करीत होते. हेहि पुढें १८५७ मध्यें रणपंडित म्हणून प्रसिद्धीस आले व विशेष म्हणजे यांचा जीवनप्रवाह व तात्या टोप्यांचा जीवनप्रवाह हे गंगायमुनांच्या जीवनप्रवाहाप्रमाणें १८५७ च्या उत्तरार्धांत संमिश्र होऊन गेलेले पुढें आपल्याला दिसतील.

याप्रमाणें पेशवे कुलांतील हीं तीन बालकें – नाना, बाळा व राव – यावेळीं ब्रम्हावर्ताच्या राजवाड्यांत एकत्र क्रीडा करीत होतीं. आणि ब्रह्मावर्ताच्या या बालकांमध्यें आणखी एक बिजली चमकत होती.

## महाराणी लक्ष्मीबाई

काशी क्षेत्रांत बाजीरावांचे बंधु चिमाजी अप्पा पेशवे हे कांहीं वेतन घेऊन आपला काळ कंठीत होते. त्यांच्या पदरीं मोरोपंत तांबे या नांवाचे एक आश्रित होते. त्यांच्या पत्नीचें नांव भागीरथीबाई. यांना इ. स. १८३५ च्या ११ नोव्हेंबरला एक कन्यारत्न झालें. — आणि खरोखरच तें कन्यारत्न ठरलें,— केवळ भागीरथीबाईंच्या घरचेंच नव्हे, परंतु प्रत्यक्ष भारतीमातेच्या घरचें तें एक दैदीप्यमान रत्न ठरलें.— इतकेंच काय,– परंतु इतिहासदेवतेच्या शिरोभागींही विराजमान होणारें असें तें रत्न ठरलें. त्या कन्यारत्नाचें नांव मातापित्यांनीं मनुबाई ठेवलें. मनुबाईच्या जन्मानंतर तीनचार वर्षांनीं मोरोपंत तांबे सहकुटुंब सहपरिवार ब्रह्मावर्ताला बाजीरावांकडे राहावयास आले. तेथें या मनुबाईच्या अद्वितीय रूपगुणचातुर्यानें ती मुलगी सर्वांना अतिशय प्रिय झाली व मोरोपंत–भागीरथीबाईंची ही मनु, बाजीरावांच्या राजप्रासादाची छबेली बनली. तिला सर्वजण छबेली म्हणूं लागले. त्यानंतर हीच ब्रह्मावर्ताच्या राजवाड्याची छबेली ज्यावेळीं झांशीच्या सिंहासनाची स्वामिनी झाली त्यावेळीं ती 'महाराणी लक्ष्मीबाई' बनली. आणि अंतीं जेव्हां ही महाराणी लक्ष्मीबाई भारतभूच्या समरक्षेत्रामध्यें अद्वितीय पराक्रमानें तळपली त्यावेळीं ती भारतमातेकडून 'झांशीची वीज' म्हणून नामाभिधान पावली!

ही मनुबाई, ही छबेली, ही महाराणी लक्ष्मीबाई व ही झांशीची वीज, त्यावेळी वर वर्णन केलेल्या बालकांमध्येंच आपल्या बाल्याच्या मधुर लीला करीत होती.

हीं सर्व लहानमोठीं बालकें त्यावेळीं एकत्र खेळ खेळत होतीं. एकत्र रामायण–महाभारताचीं वीररसभरित पुराणें ऐकत होतीं, एकत्रच पंतोजीपासून शाळेंतील विद्या शिकत होतीं व एकत्रच अध्यापकापासून शस्त्रास्त्रविद्या हस्तगत करीत होतीं.

भालाफेंक, तरवार, पट्टा, घोड्यावरची दौड इत्यादि प्रकारची युद्धविषयक विद्या सर्व कुमारांबरोबर अगदीं बरोबरीच्या नात्यानें लक्ष्मीबाईनेंहि अधीत केली होती; इतकेंच नव्हें, परंतु ती त्यांत प्रवीण झाली होती.

आणि तात्या टोपेदेखील याच ब्रम्हावर्ताच्या राजप्रासादाच्या आखाड्यामध्यें आपल्या सर्व विद्या संपादीत होते.

एकत्रच कुटुंबाच्या छत्राखालीं हीं किती नवरत्नें निर्माण झालीं! आणि म्हणूनच आम्ही या प्रकरणाच्या आरंभीं म्हटलें आहे कीं, त्यावेळीं ब्रह्मावर्ताचें वातावरणच एक प्रकारच्या अद्वितीयतेनें भरलें होतें.

नानासाहेब हे पहिल्यापासूनच थोरपणाच्या लक्षणांनीं युक्त होते. त्यांतच पेशव्यांच्या युवराजपदाचे अधिकारी झाल्यानें त्यांची सर्व ब्रम्हावर्ताच्या त्या छोट्या राज्यांतील अखिल प्रजेवर छाप पडत असे. ज्यावेळीं त्यांना त्यांच्या थोरपणाची खरी योग्यता कळूं लागली व ज्यावेळीं त्यांना भविष्यकाळाचीं मधुर स्वप्नें पडूं लागलीं,त्यावेळीं त्यांनीं आपल्या या सर्व कर्तृत्वशाली व तेजस्वी संवगड्यांना त्याची कल्पना व शिकवण दिली असली पाहिजे. नाहींतर या अर्भकांचीं पुढें ज्यावेळीं मोठमोठीं कर्तृत्वशाली माणसें बनलीं त्यावेळीं त्यांच्यामध्यें दिसून आलेली एकात्मकता व एकसूत्रता दिसून आली नसती. त्यावेळच्या सर्वसामान्य परंपरेप्रमाणें म्हणजे अशीं दृश्यें दिसत असत कीं, छोटेछोटे जहागीरदार वा संस्थानिक, वा मोठींमोठीं राजघराणी, हीं आपापसांत, त्या राज्यासाठीं वा जहागिरीसाठीं सारखे कलह करीत असावयाचे, बंधूबंधूंमध्यें वारसासंबंधीं तंटे उत्पन्न व्हावयाचे व त्यांचीं भांडणें कंपनीसरकारकडे जावयाचीं. आणि कंपनीसरकारनें त्या लोण्याच्या गोळ्याच्या भांडणाप्रमाणें सर्वच लोणी आपण भक्षण करून असल्या भांडखोरांना कफल्लक करून ठेवावयाचें. अशा रीतीनें जिकडेतिकडे वजबजपुरी माजलेली दृष्टीस पडत होती.

परंतु, ब्रम्हावर्ताच्या राजवाड्यांत मात्र ही बजबजपुरी वा हे कलह मुळींच दिसून आले नाहींत. नानासाहेबांना प्रमुख वारसाचा अधिकार मिळाल्यावर बाळाराव व रावसाहेब यांनीं कोणीहि कधीं असंतोष दर्शविला नाहीं; इतकेंच नव्हें तर ते सर्व त्यांची सेवा लक्ष्मण, भरत यांसारखीच करीत असलेले आढळून येतात. आणि याचें कारण हेंच कीं, नानासाहेबांच्या अंगीं आपल्या अधिकाराची, आपल्या विचारांची, आपल्या आकांक्षांची छाप आपल्या सर्व परिवारावर पाडण्याची शक्ति होती. म्हणूनच ब्रम्हावर्ताच्या राजप्रासादामधील बहुतेक सारे सेवक व आश्रित १८५७ च्या उठावणीमध्यें नानासाहेबांच्या कक्षेमध्यें फिरून यथाशक्ति आपापलें काम करीत होते.

आणि तात्या टोपे तर त्यांच्यावर नितांत भक्ति करणारे होते. सेवक तात्या-टोपे यांचें प्रथम आयुष्य व त्या आयुष्यांतील सर्व कर्तृत्व, हें नानासाहेबांच्या आयुष्याशीं व कर्तृत्वाशीं अगदीं समरस होऊन गेलें होतें—इतकेंच नव्हें तर या वर वर्णन केलेल्या सर्वच ऐतिहासिक व्यक्तींचें जीवनकार्य व कर्तृत्व हीं एकमेकांशीं मिळून गेलीं होतीं. एकाच गाभ्यांतून उत्पन्न झालेलीं हीं सुवासी फुलें होतीं. म्हणून त्यांतील एकाचा माग काढण्याचा प्रयत्न करितांना अथवा त्याच्या सुगंधाचा आस्वाद घेतांना इतर फुलांचाहि माग काढावा लागतो व इतरांचेहि सुगंध अवघ्राण करावे लागतात. त्याचप्रमाणें या ब्रह्मावर्ताच्या मानवी उद्यानांतील गोष्ट आहे.

आणि म्हणूनच तात्या टोप्यांचें बालपणींचें आयुष्य निरीक्षण करतांना हा सर्व थोर परिवार आपल्याला पहावा लागला.

इतकेंच नव्हें तर तात्यांच्या पुढील आयुष्यांतहि त्यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध नानासाहेबांच्या आयुष्याशीं व उत्तरार्ध झांशीच्या महाराणी व रावसाहेब पेशवे यांच्या आयुष्याशीं निगडित झालेला आपल्याला आढळून येईल.

तात्या टोपे हे मोठे भव्य, सुस्वरूप व अधिकारी मुद्रेचे प्रथमपासूनच दिसत असत. लहानपणी त्यांनीं वरील सर्व थोर व्यक्तींबरोबर त्यांच्या-सारखेंच सर्व शिक्षण घेतलें होतें व नानासाहेबावर त्यांची अखंड एकनिष्ठा असल्यानें ते नानांचे मुख्य मंत्री प्रथमपासूनच बनले होते.

अशा रीतीनें आपल्या चरित्रनायकाचें बाल्य व तारुण्यापर्यंतचें आयुष्य व्यतीत झालें. नंतर ते पुढील कर्तव्यक्षेत्रांत कसे घुसले हें पहाण्याच्या आधीं तें त्यांचें विवक्षित कर्तव्यक्षेत्र प्रथम उत्पन्न कसें झालें हें पहाणें अवश्य आहे. म्हणून पुढील प्रकरणीं आपण त्याचाच विचार करूं व हें प्रथम प्रकरण येथेंच आटोपतें घेऊं.

---

# प्रकरण २ रें.

## १८५७ च्या क्रांतीचीं पूर्व कारणें व तिचा स्फोट

ज्या युद्धाच्या होमकुंडांत आपले चरित्रनायक तात्या टोपे यांनीं अनेक आहुती देतां देतां अंती आपला देहहि अर्पून पूर्णाहुति केली तें युद्धाचें होमकुंड कां व कसें पेटलें गेलें यासंबंधीं विहंगम दृष्टीनें थोडें विवेचन करणें अवश्य आहे. म्हणजे त्यायोगानें तात्या टोप्यांच्या ध्येयासंबंधीं व त्यांच्या प्रयत्नांच्या व्यापकपणासंबंधीं पूर्ण कल्पना येईल.

इ. स. १७५७ मध्यें क्लाइव्हनें प्लासीची लढाई जिंकली, त्यावेळेपासून–इंग्लिशांच्या प्रथम व्यापार करण्याकरितां स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीला सिंहासनस्थापनेचे डोहाळे होऊं लागले. त्यावेळेपासून या व्यापारी कंपनीला आपलें तागडें सुरक्षित ठेवण्याकरितां हिंदी सत्ताधीशांच्या तरवारीच्या नाचावर अवलंबून रहाण्याचें कारण नाहीं, असें वाटून त्यांनीं आपल्या स्वतःच्या कमरेच्या तरवारीसच हात घातला व मोठ्या चाणाक्षपणानें परंतु, अत्यंत चिकाटीनें या तरवारीच्या सत्तेखालीं हिंदुस्थानचें राज्यासन ओढण्याचा प्रयत्न चालू केला.

मद्रास व बंगालकडे त्यांना तेथील मुसलमानी सत्तेला उखडून टाकण्यास या तरवारीचा क्वचित् काळीं उपयोग करावा लागला. तेथील सत्ता मऊ आणि भुसभुशीतच असल्याकारणानें, या ब्रिटिश कंपनीनें केवळ डावपेंचाच्या व भेदनीतीच्या कोपरानेंच त्या खणून काढिल्या व अल्पावधींतच ते बंगाल, बिहार, ओरीसा, त्याचप्रमाणें उत्तरसरकार व अर्धाअधिक मद्रास

इलाखा इतका विस्तृत टापू आक्रमून बसल्या. परंतु, त्याच्यापुढें त्यांना मराठी साम्राज्याचा खडक सर्वत्र भेटून दक्षिणेंत अर्काटकडे व उत्तरेंत दिल्ली-कडे त्यांचें कोपर हिंदी राजसत्ता खणतां खणतां फुटूं लागलें व मग ते लगेच सावध होऊन कोपराऐवजीं आपली तरवार शोधूं लागले. पानिपतच्या लढाई-नंतर कांहीं अल्पकाळ, मराठ्यांच्या साम्राज्याचें बळ जरा विगलित झाल्यानें इंग्रजांच्या साम्राज्यवाढीला तो एक शुभशकूनच झाला असें इंग्र-जांस वाटूं लागलें. परंतु, अल्पकाळांतच थोरल्या माधवराव पेशव्यांच्या प्रौढ प्रतापापुढें मराठी साम्राज्याचे सर्व शत्रू पुन्हां तेजोहीन बनले व त्यामुळें इंग्रजांना मोटें जड वाटूं लागलें.

अल्पावधींतच मराठ्यांनीं पूर्वेचा निजाम, दक्षिणेचा हैदर, उत्तरेचा रोहिला व दिल्लीचा मोगल बादशहा यांना अनेक युद्धांत त्यांची हड्डी नरम करून, व त्यांचा दम उखडून टाकून हतबल केलें व भाऊसाहेबांच्या घणानें चूर्ण होऊन सत्ताहीन होत आलेलें दिल्लीचें सिंहासन पुनरपि मराठी भाल्यांच्या आश्रयाला आलें. तेव्हां ब्रिटिश कंपनीला अत्यंत वैषम्य वाटून या मराठी साम्राज्याच्या मुळालाच घाव घालावा या इच्छेनें सुराजउद्दौला व मिर-जाफराच्या वेळचा कलकत्त्याचा डाव त्यांनीं मराठी साम्राज्याचे कर्ण-धार जे पेशवे त्यांच्या पुण्याच्या पटावरच खेळण्याचा चंग बांधला. मात्रा-गमनी मिरजाफर जरी त्यांना राघोबाच्या रूपानें मिळाला, तरी दुर्बल सुराजउदौला मात्र त्यांना मिळाला नाहीं. त्या दुर्बल सुराजउद्दौ-ल्याच्या जागीं त्यांना महादजी, हरिपंत फडके अशा रणधुरंधरांचें वज्र-कठोर खड्ग भेटलें व नाना फडणविसासारख्या समर्थ मुत्सद्याशीं त्यांची गांठ पडली. यामुळें त्यांचें कुटिल नीतीचें ढोपर तर रक्तबंबाळ झालेंच परंतु, त्यांची तरवारहि पहिल्याच तडाख्याला वडगांवीं मोडली व त्यानंतरहि १७८२ च्या सालबाईच्या तहापर्यंत अनेक वेळेला, अनेक ठिकाणीं ती हतप्रभ झाली. आणि पुढें वीस वर्षेपर्यंत इंग्लिशांना आपल्या साम्राज्य तृष्णेस तिलां-जुलि द्यावी लागली.

१७५७ सालीं प्लासीच्या रणांगणावर विजयी होऊन उभ्या राहि-लेल्या क्लाइव्हला हिंदुस्थानमधल्या ब्रिटिश साम्राज्यसत्तेचें जें स्वप्न प्रतीत

झालें होतें तें दीर्घकालपर्यंत केवळ स्वप्नावस्थेंतच राहिलें. क्लाइव्हचा आत्मा मरणोत्तरकाळीं मराठ्यांनीं ब्रिटिश सत्तेची केलेली ही मुस्कटबंदी पाहून निराशेनें किंचाळत उठला असेल.

अशा रीतीनें ईस्ट इंडिया कंपनीच्या आसुरी साम्राज्यतृष्णेला पडलेला शोष इ. स. १८०० सालापर्यंत टिकून राहिला व तोंपर्यंत मराठी साम्राज्यानें त्यांच्या डोळ्यांदेखत व त्यांच्या छातीवर दिल्लीपदपादशाही आपल्या तरवारीच्या संरक्षणाखालीं राववून घेतली. परंतु इ. स. १८०० सालीं मराठी साम्राज्याचे कर्णधार नाना फडनवीस व खड्गधार महादजी शिंदे, हरीपंत फडके आदि सर्व कर्ते महापुरुष आगेंमागें मृत्युमुखीं पडन मराठी साम्राज्य पोरकें झालें. व मग पुन्हां प्लासीच्या रणांगणांत उत्पन्न झालेली कंपनीसरकारची साम्राज्यमहत्त्वाकांक्षा मराठ्यांच्या या कर्त्या पुरुषांच्या मरणोत्तर, त्यांच्या स्मशानभूमींतून पुनरपि उत्थित झाली. दुसऱ्या बाजीरावाच्या दौर्बल्याच्या जलानें ती पल्लवित झाली व अंतीं १८०२ या वर्षी वसईच्या तहानें तिला पुनर्जन्मच नव्हे तर चिर आयुष्यहि प्राप्त करून दिलें. यापुढें मात्र सामान्य असलेली ईस्ट इंडिया कंपनी 'कंपनी सरकार' बनली व १८१८ सालीं दुर्बल बाजीराव पेशव्यांचा पराभव करून तें 'कंपनी सरकार' हिंदुस्थानचें 'सम्राट्पद' पावलें. येथपासून इंग्लिशांच्या सत्तेचा मार्ग निष्कंटक झाला. हिंदुस्थानांतल्या अखिल राजेरजवाड्यांना ब्रिटिश सत्तेपुढें प्रतिकार करण्याचें सामर्थ्य तर राहिलेंच नाहीं, परंतु कंपनी सरकारच्या त्या डामडौलानें व राजकारणकुशलतेनें प्रतिकार करण्याची त्यांना इच्छाहि उत्पन्न झाली नाहीं. मराठी साम्राज्याचा खडक असा नैसर्गिक घटनांचा सुरुंग लागून उडून गेल्यानंतर ब्रिटिशसत्तेचा लोंढा अप्रतिहत वेगानें हिमाचलापासून तों कामोरीनपर्यंत सर्व राजे आणि त्यांची राज्यें सुखेनैव आक्रमण करीत तुडवीत बुडवीत पसरत गेला.

१७५७ नंतर कांहीं वर्षांपासून जवळ जवळ ४० वर्षे ईस्ट इंडिया कंपनीची मुलूख खाण्याची भूक मराठ्यांनीं दाबून टाकली होती. ती आतां त्या पुराणांतरींच्या बकासुराच्या भुकेपेक्षांहि अनेक पटीनें वाढली. व तिच्या शमनार्थ नानातऱ्हेचे बरेवाईट मार्ग आचरून त्यांनीं ती भक शांत करण्याचा

प्रयत्न चालविला. परंतु, या प्रयत्नांत त्यांची भूक शांत न होतां उलट ती अधिकाधिकच वाढूं लागली व त्यामुळें हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यां-पासून तों सामान्य प्रजाजनापर्यंत सर्वांच्या मनांतील शांति नष्ट झाली; जिकडे तिकडे असंतोषाचें पीक पेरलें जाऊं लागलें. हें कसकसें झालें याची त्रोटक टिपणी पुढील घटनेचें स्वरूप ध्यानांत येण्याकरतां दिग्दर्शित केली पाहिजे.

(१) इ. स. १८१८ सालीं पेशव्यांची सत्ता नष्ट करण्याकरतां मोठ्या मानभावीपणानें सातारच्या प्रतापसिंह महाराजांना इंग्रजांकडून असें भास-विण्यांत आलें कीं, सातारच्या विरुद्ध पेशव्यांनीं बंड केलें, तें मोडण्याकरतांच आम्ही सातारला सहाय्य करीत आहोंत व पेशव्यांना नष्ट करीत आहोंत. पेशव्यांचा प्रदेश हस्तगत करून घेतांना इंग्रजांनीं जी द्वाही फिरविली ती या मानभावीपणाचें पूर्ण प्रत्यंतर आहे. ती द्वाही अशी:—'राज्य छत्रपतींचें व कारभार कंपनी सरकारचा!' भोळे बिचारे प्रतापसिंह महाराज या कुटिल नीतीला बळी पडले व त्यांच्या नांवाच्या बळावर पेशव्यांचें इंग्रजाकरवीं निर्दलन झाल्यावर इंग्रजांजवळ पेशव्यांचा प्रदेश सातारचे महाराज परत मागूं लागले! परंतु, पेशव्यांचा प्रदेश गिळंकृत केल्यावर कंपनी सरकारला त्या फिरविलेल्या द्वाहीची कुठली आठवण रहाणार? सर्व महाराष्ट्र कंप-नीचा झाला व महाराज प्रतापसिंहाला सातारचे एक लहानसे संस्थानिक त्यांनीं बनवून ठेवलें. आणि त्याहि संस्थानाच्या कारभारांत ज्यावेळीं प्रतापसिंह जरा तेजस्वीपणा दाखवूं लागले त्यावेळीं इंग्लिशांच्या विरुद्ध कट करण्याच्या आरोपावरून एकाद्या सामान्य प्रजाजनाप्रमाणें त्यांना गादी-खालीं ओढून इ. स. १८३९ या वर्षी त्यांना व त्यांचे सेनापति बाळासाहेब भोसले यांना काशीला नेऊन अत्यंत अपमानास्पद रीतीनें बंदींत ठेवलें. त्यानंतर त्यांचे बंधु अप्पासाहेब ह्यांना कांहीं वर्षे सातारचें हें निर्जीव संस्थान उपभोगतां आलें. परंतु, ते इ. स. १८४८ या वर्षी निपुत्रिक होऊन वारले. त्यांनीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेतला होता. परंतु, आतां या कंपनी सरकारच्या 'न्याया'च्या सत्ताकालांत पूर्वीचे सर्व निर्बंध व शास्त्र-नियम बदलून जाऊं लागले!

कारण, याचवेळीं म्हणजे इ. स. १८४८ (व्या वर्षी कंपनी सरकारच्या राज्यकारभारावर लॉर्ड डलहौसी या नांवाचा एक पुरुष गव्हर्नर जनरल म्हणून नेमला जाऊन इकडे आला. तो अत्यंत चतुर, समर्थ, महत्त्वाकांक्षी परंतु उलटया काळजाचा, कपटनीतीचा, वचनें मोडणारा, न्यायान्याय न पाहणारा असा होता. तो आला तेव्हां वस्तुतः कंपनीचें साम्राज्य साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेलें होतें. परंतु, त्याला तें अगदीं सलग, एकजिनसी एकरसी व एकरंगी पाहिजे होतें. म्हणून त्यानें वाटेल त्या हीन मार्गाचें अवलंबन करून व तें करतांना हिंदी राजेरजवाडयांचीं व प्रजेचीं अंतःकरणें करपून टाकून, अनेक राज्यें व जहागिरी कंपनीच्या घशाखालीं घातल्या. त्याला कारणें त्यानें निश्चित करून टाकलीं; कुणा राजाला राज्य चालवितां येत नाहीं, कुणाला उधळेपणाची संवय फार, कुणाला औरस संतान नाहीं, कुणाचा दत्तकविधि योग्यप्रकारें झाला नाहीं, असल्या प्रकारानें त्यानें सर्व लहानमोठया राज्यांवर वरवंटा फिरविला.

वरील सूत्राप्रमाणें सातारच्या अप्पासाहेबांना औरस संतान नसल्यानें व त्यांनीं केलेला दत्तकविधि कंपनीनें अमान्य केल्यानें, छत्रपती शिवाजी महाराजांचें हें सातारचें आधींच निष्प्रभ झालेलें सिंहासन अंतीं १८४८ या वर्षीं नष्ट झालें व त्यांचा प्रदेश कंपनीसरकारनें मिटक्या मारीत गट्ट केला.

(२) आणखी एक संतापजनक दंडेली तंजावरच्या मराठी राज्यासंबंधीं करण्यांत आली. हें मराठी राज्य शहाजी महाराजांपासून चालत आलें होतें. येथेंच राजाराम महाराजांच्या काळीं वनवासी मराठी राज्याचा भगवा झेंडा कांहीं काळ आश्रय घेत होता. तें मराठयांना अत्यंत अभिमानास्पद असलेलें राज्य तेथील राजा निपुत्रिक मेला या कारणानें डलहौसीनें गिळंकृत केलें! वास्तविक कंपनी सरकारचा व या राज्याचा समानत्वाचा संबंध होता. तेव्हां डलहौसीला त्याच्या वारसाच्या संबंधीं कोणताहि चोंबडेपणा करण्याचें कारण नव्हतें. परंतु, केवळ पाशवी सामर्थ्यानें धुंद बनून, दक्षिणेंतील हें मराठयांचें अनेक शतकांचें राज्य कंपनी सरकारनें उदरस्थ केलें.

(३) नागपूरकर भोसले हे मराठमंडळांतील एक प्रमुख सभासद. त्यांच्या वंशातील अंतिमचे राजे तिसरे रघूजीराव. हे १८५३ या वर्षी वारले. त्यांना औरस संतान नव्हतें. लगेंच कंपनीचें फावलें. डलहौसीची काकदृष्टि नागपूरवर पडली व तें विस्तृत नागपूरचें राज्य डलहौसीच्या या स्वाहाकारांत गडप झालें! रघूजीचा दत्तक अमान्य ठरला! त्यावेळीं अशी परिस्थिति झाली होती कीं, कुणाहि संस्थानिकाला औरस पुत्र नसला कीं, कंपनीसरकार त्याचा औरस पुत्र विनबोभाटपणें होत असे व त्याचें राज्य गिळंकृत करीत असे. आणि नागपूरला तर याहीपेक्षां अधिक अमानुषपणा डलहौसीनें केला. त्यांनीं नागपूरच्या राजवाड्यांत गुप्त धन शोधून काढून तें लुटून नेलें. राण्यांचें जडजवाहिर बलात्कारानें घेऊन तें उघड बाजारांत विकून त्याचा पैसा केला! नागपूरच्या धनकनकसंपन्न राजकुलाला नागवून, त्यांच्या आयत्या मिळालेल्या धनाच्या राशीवर डलहौसीनें आपली हौस पुरवून घेतली.

(४) त्याचप्रमाणें पेशव्यांचे सरदार रघुनाथ हरी नेवाळकर या समरपंडितानें पेशव्यांच्या आज्ञेनें इ. स. १७५७ सालीं स्थापन केलेलें झांशीचें संस्थान, त्यावेळीं त्यांचे वंशज गंगाधरराव यांच्या सत्तेखालीं नांदत होतें. त्यांची पत्नी म्हणजेच सुविख्यात झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई होत. हे गंगाधरपंत इ. स. १८५३ मध्यें मृत्युवश झाले. यांनाहि औरस संतान नव्हतें. परंतु त्यांनीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दत्तक पुत्र घेतला होता. तरीहि नित्याप्रमाणें डलहौसीनें तो दत्तक अनधिकारी ठरवून झांशीचें राज्य स्वाहा केलें व झांशीच्या अधिष्ठात्री देवतेला–महाराणी लक्ष्मीबाईला–अशा रीतीनें दुखवून नागिणीप्रमाणें डवचून दिलें.

(५) दुसरे बाजीरावांनीं स्वराज्यावर तिलांजुलि सोडून दरवर्षी ८ लाख रुपयांच्या बदल्यांत ब्रह्मावर्तीं स्वस्थ बसून, निर्जीव अन्न खाऊन आयुष्य घालविण्याचें मान्य केलें. १८१८ वर्षापासून तों १८५१ वर्षापर्यंत कोणाहि सत्ताधारी व तेजस्वी पेशव्याला लाधलें नाही इतकें आयुष्य या सत्ताहीन व तेजोहीन पेशव्याला लाधलें व अंतीं १८५१ व्या वर्षी ब्रह्मावर्तीं त्यानें देह टेविला. त्यानंतर त्यांना मिळत असलेलें ८ लाखांचें वेतन

त्यांचे दत्तकपुत्र म्हणजेच १८५७ च्या क्रांतियुद्धाचे मुख्यांपैकीं एक सूत्रधार नानासाहेब पेशवे, यांना देण्याचें डलहौसीनें एकदम बंद केलें. आणि अशा रीतीनें साम्राज्याचें वैभव उपभोगिलेल्या पेशवे घराण्याला एका रंकाच्या श्रेणीला आणून बसविलें ! नानासाहेबांच्या हृदयाला स्वराज्यघाताचें शल्य बोंचतच होतें–त्यांतच या अन्याय्य व उर्मट वर्तनानें त्यांचें मानी मन भडकून उठलें.

(६) याचप्रमाणें पंजाबचें रणजितसिंहाचें प्रबल राज्य, त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या सरदारांमध्यें व त्याची पत्नी महाराणी जिंदा यांच्यामध्यें वैर लावून त्याचा औरस अल्पवयी पुत्र महाराजा दिलीपसिंग याला पदच्युत करून, अनेक कुटिल कारस्थानांनीं डलहौसीनें इ. स. १८४९ या वर्षीं नष्ट केलें व सबंध पंजाब कंपनीच्या प्रदेशाला जोडला. त्या पंजाबच्या सिंहाचें प्रसिद्ध सिंहासन व मुगुटांतील दैदीप्यमान कोहिनूर इंग्रजांच्या हस्तगत झाला !

(७) नंतर त्यानें एक गुंडगिरीचें युद्ध उत्पन्न करून ब्रह्मदेशाचा अर्धा भाग गिळंकृत केला ! एका शेफर्ड नांवाच्या इंग्रजी व्यापाऱ्यानें एका ब्रह्मी माणसाचा खून केला. त्यासंबंधीं ब्रह्मी अधिकाऱ्यांनीं भीत भीत त्या व्यापाऱ्याला केवळ ९९९ रु. दंड केला! त्यामुळें इंग्रजांचा अपमान झाला! तेवढ्याकरतां त्या ब्रह्मी अधिकाऱ्याला काढा व आमचे पैसे ९९९ रु. परत करा असा उद्दाम निरोप ब्रह्मदेशाच्या राजास डलहौसीनें पाठविला. तो दुर्बल राजा यालाहि मान्य झाला; परंतु, कोठें एका इंग्रज अधिकाऱ्याला १५ मिनिटें उन्हांत उभें रहावें लागलें एवढ्याच निमित्तानें डलहौसीनें स्वारी पाठवून दक्षिण ब्रह्मदेशाचा लचका तोडला !

(८) नेपाळ व भूतान या दोन स्वतंत्र संस्थानांत असलेल्या सिकिम संस्थानचाहि कांहीं भाग अशाच कांहीं क्षुल्लक निमित्तावरून कंपनी सरकारनें गडप केला. त्याच भागामध्यें दार्जिलिंग हें सुंदर वारापाण्याचें ठिकाण होतें. व त्याच्याच आमिषानें ही कलागत उकरून डलहौसीनें काढली होती.

(९) त्याचप्रमाणें निजामापासून तैनाती फौजेचा खर्च अनेक वर्षांचा तुंबला होता, या निमित्तानें त्याच्या फेडीकरतां म्हणून वऱ्हाडप्रांत तोडून

घेतला. यामुळें निजाम अत्यंत दु:खी झाला. परंतु, कंपनी सरकारच्या सामर्थ्याच्या भयानें तो गोगलगाय बनला.

(१०) दिल्लीच्या मोंगल बादशाहीचा अंतिमचा वंशज बहादुरशहा याची राजत्वाची सर्व सत्ता संपुष्टांत आणली गेली होती व त्याला वार्षिक नेमणूक करून देण्यांत आली होती. त्याचे बादशाहीचे सर्व मानसन्मान नष्ट करण्यांत आले व इंग्रज अधिकारी त्याच्याशीं वरिष्ठाच्या नात्यानें वागूं लागले. त्याला बरींच मुलें होतीं. त्यांच्यामध्यें वैमनस्यें उत्पन्न झालीं व त्याचा लाभ डलहौसीनें घेऊन 'बादशहा' ही पदवीहि काढून घेण्याचा व दिल्ली नगरींतून त्याची उचलबांगडी करण्याचा डाव टाकला. वृद्ध बहादुरशहाची तरुण पत्नी झिन्नतमहाल हिला व इतर बादशहाच्या अन्य हितचिंतकांना ही गोष्ट शल्याप्रमाणें बोचली; व त्यांचीहि मनें कंपनी सरकारच्या विश्वासघाती व उन्मत्त धोरणानें आंतल्या आंत जळूं लागलीं.

(११) अयोध्येच्या नबाबांच्या घराण्याचीहि कंपनी सरकारनें अशीच दुर्दशा उडविली. त्या नबाबांना प्रथम स्वत:ची सेना चाकरीस ठेवावयास लावलें व त्यांना परतंत्र आणि निर्बल करण्यांत आलें. मग अमानुषपणें त्यांच्याजवळून निरनिराळ्या रीतीनें निरनिराळ्या वेळीं त्यांच्या राज्यांतील प्रदेश व धनागारांतील अगणित धन यांची लूट चालविली. अयोध्येच्या बेगमेजवळून तिला अत्यंत क्रूरतेनें छळून वॉरन हेस्टिंग्जनें अगणित द्रव्य लुटलें होतेंच. इ. स. १८४७ व्या वर्षीं शेवटचा नबाब वाजीदअल्लीशहा हा या नामधारी गादीवर बसला. तो अत्यंत व्यसनी, अयोग्य व दुर्बल होता. त्यामुळें राज्यांत अंदाधुंदी माजली. तेव्हां डलहौसीच्या राज्य गिळंकृत करण्याच्या हौशीला ऊत आला व त्यानें इ. स. १८५६व्या वर्षीं अयोध्येचें राज्य कंपनी सरकारच्या राज्यांत पचवून टाकलें. नबाबाला पदच्युत करून त्यास कलकत्ता येथें बंदिवान करून ठेवलें.

अशा रीतीनें ह्या ७।८ वर्षांच्या कालांत डलहौसीनें अनेक अत्याचार केले. एकाद्या अधाशी माणसाप्रमाणें त्यानें हिंदुस्थानांत आल्यापासून सारखा राज्यें खाण्याचा सपाटा लावला. एकादा नरमांसभक्षक राक्षस,

निर्बल माणसांच्या समूहांत सोडल्यावर, जसा तो भराभर माणसेंची माणसें उचलून तोंडांत टाकतो, त्याप्रमाणें डलहौसीनें हिंदुस्थानांत येतांच येथील दुर्बल राजांचीं राज्येंचीं राज्येंच खाण्याचा सपाटा लावला. एवढा मोठा प्रदेशभक्षक मानव इतिहासामध्यें क्वचितच आढळून येईल. शिकंदर, नेपोलियन वगैरे जगज्जेत्यांनीं देशचे देश जिंकले हें खरें; परंतु, डलहौसीनें तरवारीस मुळींच हात न घालतां, कापटयाच्या कुटिल नीतीच्या सुरीनेंच घाव घालून, हिंदुस्थानांतील प्रतिकाररहित झालेलीं राज्यें भक्षण केलीं. आणि योगायोग तरी काय विलक्षण कीं, त्याच्या सत्ताकालांतच हे इतके संस्थानिक मेले ! व तेहि बहुशः औरस संतति न होतां मेले! यमानें आणि ब्रह्मदेवानें डलहौसीला पूर्वीं पुराणांतरीं वर्णन केलेल्या राक्षसांप्रमाणें कांहीं वरदान केलें होतें कीं काय, आणि त्या वरदानांत यमानें राजेलोक मारण्याचें व ब्रम्हदेवानें त्यांना औरस पुत्र न देण्याचें ठरविलें होतें किंवा याहून कांहीं निराळेंच गौडबंगाल होतें तें परमेश्वरास माहीत!

याप्रमाणें आसेतु हिमाचलापर्यंत डलहौसीनें असंतुष्ट, संतप्त, अन्यायानें चिडून गेलेल्या राजेरजवाडयांचें पीक उत्पन्न केलें. व त्यामुळें ठिकठिकाणचीं असंतुष्ट व क्रुद्ध अंतःकरणें या अन्यायाचा प्रतिशोध कसा करावा याची विवंचना करूं लागलीं. परंतु, निरनिराळ्या ठिकाणीं विस्कलितपणें अशी विवंचना चालून ती फलदायी होत नाहीं, असें ब्रह्मावर्तचे नानासाहेब पेशवे यांना वाटून, त्यांनीं या उन्मत्त झालेल्या कंपनी सरकारला उखडून टाकण्याकरितां एक प्रचंड कट करण्याची कल्पना काढली, व त्यास अनुसरून झांशीची राणी, दिल्लीचे असंतुष्ट झालेले शाहजादे, लखनौचे चेतलेले मुल्ला मौलवी, जगदीशपूरचे दुखावले गेलेले प्रबल जमिनदार कुवार सिंह, अमरसिंह, पेशवे कुलांतले बांदेवाले नबाब—जे थोरल्या बाजीरावांना मस्तानीपासून झालेल्या समरविख्यात समशेरबहाद्दराचे वंशज होते—आणि अन्य अनेक असंतुष्ट व अन्यायानें चिडलेल्या जहागिरदार, सरदारांना या प्रचंड कटांत गोंवून कंपनी सरकारला, तिच्या आसुरी अधिकारलालसेसाठीं शासन करण्याचे प्रयत्न सुरू केले. सर्वांनीं मिळून देशाधर्माकरतां प्रचंड युद्ध पुकारावें व त्यामध्यें कंपनी सरकारनें लादलेलें पारतंत्र्य झुगारून द्यावें

असें ठरलें व त्याच्या सिद्धीकरतां अत्यंत तांतडीनें, परंतु अत्यंत गुप्तपणें प्रयत्न सुरू झाले. आणि या कटाच्या सूत्रचालकांनीं कंपनीसरकारचें हिंदी सैन्यच आपल्या पक्षाला वळवून घेण्याचें निश्चित केलें. कारण, कंपनी सरकार हे सर्व अन्याय करतें व पचवितें तें कुणाच्या बलावर? अर्थात् सैन्याच्या बलावर! हे सर्व आसुरी अन्याय व अत्याचार डलहौसीनें कंपनी सरकारच्या नांवानें केले. मग त्याच सैन्याचा आधार पोखरून काढून, जर ह्या कंपनी सरकारवर आघात केला, तर हें सरकार तेव्हांच कोलमडून पडेल असें त्या वेळच्या नानासाहेबादि क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांस वाटलें. व या कंपनीच्या सैन्यांतहि अधिकांश सैन्य एतद्देशीय व धर्मपरायण अशा मुसलमान व पुरभय्ये आदिक हिंदू लोकांचेंच होतें. तेव्हां त्या सैन्यालाच प्रथम त्यावेळच्या कटवाल्यांनीं आपल्या पक्षाला मिळवून घेण्याचा प्रयत्न केला व त्यांना याचें ज्ञान देण्याकरतां अनेक गोसावी, बैरागी, तसेंच मुल्लामौलवी सैन्याच्या गोटागोटांतून हिंडूं लागले; आणि कंपनी सरकारच्या भयंकर कृत्यांचें, त्यांच्या भयंकर जिव्हांनीं त्यांनीं वर्णन सुरू केलें.

याच वेळीं ख्रिस्ती मतप्रसाराला अनुकूल असें धोरण कंपनी सरकारचें दिवसेंदिवस प्रतीत होऊं लागलें. ख्रिस्ती मिशनऱ्यांचीं जाळीं सर्वत्र पसरूं लागलीं. तसेंच तुरुंगामधील बंदीजनांना स्वतःच्या घरचीं भांडीं देण्याची बंदी करण्यांत येऊन त्याजागीं बंदिशाळेंतील कथलाचीं निषिद्ध मानलेलीं भांडीं पुरविण्याची आज्ञा करण्यांत आली. असल्याच तऱ्हेच्या लहानमोठ्या गोष्टी घडून सामान्य जनतेचीं मनेंहि कंपनी सरकारच्या सत्तेविरुद्ध प्रक्षुब्ध झालीं व जिकडे तिकडे क्रांतिकारक विचारांचे प्रबल वारे–विषेशतः उत्तर हिंदुस्थानच्या राजकीय वातावरणांत गुप्तपणानें परंतु अनिवार्यतेनें वाहूं लागले.

इतक्यांत एक प्रकारचीं नवीं काडतुसें कंपनी सरकारनें सैन्यांत चालू केलीं. या काडतुसांना गाईची व डुकराची चरबी लावलेली आहे असें प्रामाणिकपणें सर्व सैन्यांतील शिपायांना वाटूं लागलें. व त्यामुळें हिंदू व मुसलमान हे दोघेही खवळून गेले. हां हां म्हणतां ही वातमी सर्व हिंदुस्थानभर पसरली व क्रांतिकारकांनींहि तिचा प्रसार झपाट्यानें करवून बहुतांश

देशी सैन्यें आपल्या क्रांतीच्या प्रयत्नास अनुकूल करून घेतलीं. ठिकठिकाणच्या सैन्यांमध्यें युरोपियन अधिकाऱ्यांसंबंधीं तुच्छपणा, निर्भयता, व स्वत:विषयीं अभिमान अशा वृत्ती दिसून आल्या. सामान्य जनतेंतहि पूर्वींचा युरोपियन लोकांसंबंधींचा व कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांसंबंधींचा धाक नाहींसा झाला व नगरानगराच्या बाजारांतून ज्यावेळीं युरोपियन स्त्री–पुरुष दृष्टीस पडत, त्यावेळीं लोकांची ही अनावरतेची प्रवृत्ति त्यांच्या प्रत्ययास येऊं लागली. सैन्यांतील शिपायांना वेतन, भत्ता आदिक देण्याच्या संबंधांतहि निष्ठुर मनाच्या डलहौसीच्या वेळीं फारच कंजुषपणा दाखविण्यांत आला. त्यामुळें देशी सैन्य अधिकच रुष्ट झालें. आणि या सर्व कारणांव्यतिरिक्त देशाची व धर्माची प्रीति त्यांच्या अंत:करणांत उद्भूत झाली. हें प्रमुख कारण क्रांतीच्या प्रयत्नास चालना मिळण्यास घडलें. नाहींतर, तोंपर्यंत कमी कां अपमान हिंदी लोकांचे झाले होते? कमी कां द्रव्यशोषण कंपनी सरकारनें हिंदुस्थानांतून केलें होतें? परंतु, लोकांमध्यें जोंपर्यंत दासवृत्ति वागत होती, तोंपर्यंत त्यांना या अन्यायांची व अपमानांची जाणीवच होत नव्हती. परंतु ती जाणीव एकदां उत्पन्न झाल्यामुळें मग या अन्यायांची, या मानखंडनेची, या द्रव्यापहारणाची चीड व सात्त्विक संताप सैनिकांच्या मनामध्यें व जनतेमध्यें उत्पन्न झाला. आणि एकदां मनामध्यें असा सात्त्विक संताप उत्पन्न झाला म्हणजे मग, अर्थातच तेथें मागून प्रतिकाराची स्वाभिमानी वृत्ति जागृत होत असते. त्याचा लाभ त्यावेळच्या नानासाहेबप्रभृति क्रांतिकारकांच्या कुशल पुढाऱ्यांनीं घेऊन एक प्रचंड संघटना निर्माण केली; कीं जिच्या दुर्दांत धडकीसरशी कांहींकाल तरी ब्रिटिशांची हिंदुस्थानांतील सत्ता आमूलाग्र हदरून जाऊन उन्मळून पडण्याच्या बेतांत आली.

अशा परिस्थितींत लॉर्ड डलहौसीनें इ. स. १८५६ व्या वर्षी हिंदुस्थानांतील कारभार संपवून इंग्लंडला प्रयाण केलें. परंतु त्याच्यापुढें आलेल्या लॉर्ड कॅनिग ह्या गव्हर्नर जनरलला कंपनीनें केलेल्या पूर्वींच्या अगणित पातकांचा झाडा घ्यावयाचा समय आला. त्या समयाला १८५७च्या प्रचंड क्रांतियुद्धाचें विराट स्वरूप प्रतीत होऊन त्यानें सर्व जग क्षणमात्र दिपून गेलें. या क्रांतियुद्धाची पहिली ठिणगी ता. २९ मार्च १८५७ या दिवशीं उडाली.

ज्याप्रमाणें गेल्या महायुद्धाचा वणवा सर्व्हियामध्यें झालेल्या आस्ट्रि-याच्या राजपुत्राच्या खुनानें चेतविला गेला, त्याचप्रमाणें १८५७ च्या क्रांति-युद्धाचा वणवा ता. २९ मार्च १८५७ या दिवशीं मंगलपांडे यांच्या उठा-वणीनें चेतविला गेला.

वर वर्णन केलेल्या नव्या काडतुसांचा प्रथम प्रयोग बराकपुरच्या १९ व्या पलटणीवर करण्याचें कंपनी सरकारनें ठरविलें. परंतु, त्या पलट-णींतील शिपाई आधीच धर्माभिमानानें पेटून गेले होते. त्यांनीं गोऱ्या अधिकाऱ्यांच्या समक्ष व त्यांच्या धमकीला भीक न घालतां तीं धर्मबाह्य काडतुसें न वापरण्याचें निक्षून सांगितलें. त्यामुळें गोरे अधिकारी चकित झाले व मग त्यांना ह्या अवज्ञेचा क्रोध अनावर झाला. त्यांनीं ही पलटण निःशस्त्र करून मोडून टाकण्याचें ठरविलें. ही बातमी पसरतांच मंगलपांडे या नांवाच्या एका स्वदेशाभिमानी व स्वधर्माभिमानी शिपायाचें पित्त खव-ळलें. हा अत्यंत शूर शिपाई होता. तो उघडपणें शस्त्र उपसून गोऱ्या-अधिकाऱ्यांना शासन करण्याकरितां निघाला. त्यानें इतर हिंदी शिपायां-नाहि आव्हान केलें. परंतु, त्याच्या साह्यास कोणी आलें नाहीं. तरीहि त्यांच्या अंतःकरणांत मंगलपांड्यासंबंधीं, त्याच्या देशभक्तीसंबंधीं, त्याच्या धाडसासंबंधीं आदर वाटत होता, म्हणून त्याला अडथळाहि कोणी केला नाहीं. मंगलपांडे तडक गोऱ्या अधिकाऱ्यांच्या रहात्या जागेकडे धावून गेला. वाटेंत एक गोरा अधिकारी त्याला दिसला. मंगलपांड्याचें रक्त खवळलें व त्यानें त्याच्यावर गोळी झाडली. १८५७ च्या क्रांतियुद्धाची ही पहिली गोळी उडाली ! व ती क्रांतिपक्षाच्या एका सैनिकानें उडविली. आजपर्यंत कंपनी सरकारनें व डलहौसीसारख्या तिच्या उन्मत्त अधिकाऱ्यांनीं जे अनेक अपमान हिंदी राजांचे व प्रजेचे केले होते, जो असह्य मानभंग त्यांनीं जवळजवळ अर्धशतकपर्यंत चालविला होता, त्या सर्व कर्मांचा विपाक या मंगलपांड्याच्या पहिल्या गोळींत जणुं समाविष्ट झाला होता. आज-पर्यंतच्या त्या अनेक मूकसंतापांची, शिव्याशापांची परमावधी होऊन, त्यांनींच जणु प्रत्यक्ष, मंगलपांड्याच्या गोळीच्या रूपानें पहिली आरोळी फोडली! यानंतर मंगलपांड्यावर २–४ गोरे अधिकारी तुटून पडले. मंगलपांड्यानें

तरीहि शौर्यानें त्यांपैकीं दोघांना मर्मान्तिक घायाळ केले.—परंतु अंतीं निरुपाय होऊन त्यानें स्वतःवर एक गोळी झाडली. परंतु, तिनें तो मेला नाहीं. नंतर त्याला पकडण्यांत आलें, त्याची चौकशी झाली व त्याला फांशीची शिक्षा देण्यांत आली!

ता. ६ एप्रिल १८५७ या दिवशीं मंगलपांड्याला सर्व शिपायांदेखत फांसावर चढविण्यांत आलें. मंगलपांडे मेला—परंतु,त्याच्या मरणानें गोऱ्या अधिकाऱ्यांच्या अपेक्षेप्रमाणें देशी सैनिकांच्या हृदयांत भयाची धडकी भरण्याऐवजीं त्यांचीं हृदयें क्रोधानें प्रदीप्त झालीं. आंतून आंतून ते मंगलपांड्याला धन्यवाद देऊं लागले, त्याचा आदर करूं लागले, त्याच्या स्वार्थत्यागाचे, धाडसाचे, स्वदेश व स्वधर्मभक्तीचे पोवाडे गाऊं लागले व त्याला हुतात्मा म्हणून वंदूं लागले. स्वतःला त्याच्याइतकें धाडस नाहीं म्हणून मनांत खंती करूं लागले—आणि या सर्वांचा जो अंतिमचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सर्व हिंदी सैन्यांतले सैनिक अस्वस्थ झाले. प्रतिदिनिं कांहींना कांहीं बंडखोरीच्या घटना निरनिराळ्या ठिकाणीं घडूं लागल्या. कोठें गुप्त कट उघडकीस आले, कोठें कटवाल्यांना शिक्षा झाल्या. सर्व राजकीय वातावरण कुंद झालें. लोकांच्या नयनांतून तिरस्कार, तुच्छता, स्वाभिमानाची चमक प्रतीत होऊं लागली. तोंडांतुन कंपनी सरकारची निंदा, गोऱ्या अधिकाऱ्यांच्या अरेरावी वर्तनासंबंधीं निषेध व एकंदर कंपनीच्या सत्तेला शिव्याशापांचा वर्षाव लोक वर्षू लागले.—आणि लोकांचे हात, जे आजपर्यंत साहेबाला सलाम करण्यास वळवळत असत त्रेच लोकांचे हात, आज त्याच साहेबांना शासन करण्याकरितां शस्त्रास्त्रांना पकडण्यास चुळबुळूं लागले. आणि अंतीं एक महिन्यानें म्हणजे ता. १० मे १८५७ या दिवशीं मीरत येथें प्रत्यक्ष उठावाची आग पेटून तेथील पलटणीनें उघड रीतीनें क्रांतीचा झेंडा मोठ्या हटातटानें उभारला.

वास्तविक क्रांतिकारकांच्या नेत्यांनीं क्रांतीच्या उठावणीचा दिवस ३१ मे १८५७ हा ठरविला होता व त्या दिवशीं एकसमयावच्छेदेंकरून सर्व उत्तर हिंदुस्थानांत व कांहीं दक्षिण हिंदुस्थानाच्याहि भागांत ठिकठिकाणीं उठावणी होणार होती—आणि जर असें झालें असतें, तर इंग्रज इति-

हासकारहि असें म्हणतात कीं, सर्व युद्धाचा रंग पालटून कांहीं निराळीच घटना घडली असती व ती क्रांति यशस्वीहि झाली असती. परंतु, तसें झालें नाहीं. आधींच ता. १० मेला मीरतला धडाका उडाला व जिकडे तिकडे एकच हलकल्लोळ माजला.

मीरतचे क्रांतिवाले शिपाई मीरतला बंड करून उठले आणि लगेच त्यांनीं रात्रीच्यारात्रीं वायुवेगानें चाल करून दुसऱ्या दिवशीं प्रभातकाळीं ३६ मैल लांब असलेली दिल्ली गांठली. ता. ११ ला दिल्लीच्या मोंगल बादशहाला हस्तगत करून घेऊन या बंडाला एक महत्त्वाची अधिष्ठात्री देवता मिळवून दिली—झालें, जिकडेतिकडे एकच घोषणा सुरू झाली कीं, कंपनी सरकार बुडालें व स्वदेशी सरकार चालू झालें.

अशा रीतीनें अनेक घटनांच्या समवायानें हें १८५७ चें क्रांतियुद्ध सुरू झालें. व त्याच क्रांतियुद्धांत आपले चरित्रनायक स्वातंत्र्यसेनापति तात्या टोपे यांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ करून ही क्रांति विजयी करण्याकरितां व परक्या कंपनीसरकारला नष्ट करण्याकरतां व जवळ एक शिपाई उरेपर्यंत हटातटानें, जवळ जवळ दोन वर्षें युद्ध चालविलें.

अशा रीतीनें तात्या टोपे यांनीं जें कार्य हातीं घेतलें होतें, त्याची ही रूपरेषा वाचकांनीं लक्षांत ठेवली पाहिजे, म्हणजे तात्या टोपे यांचा प्रयत्न केवढा अचाट होता, त्यांचें ध्येय किती विशाल होतें, त्यांची निष्ठा किती जाज्वल्य होती व त्यांची चिकाटी किती अगम्य होती हें नीटपणें ध्यानीं येईल.

विहंगम दृष्टीनें आपण १८५७ च्या क्रांतियुद्धाचें सर्व क्षेत्र आतांपर्यंत अवलोकन केल्यावर पुढच्या भागापासून प्रत्यक्ष तात्या टोप्यांच्या चरित्राचा रोमहर्षण भाग निरीक्षण करूं.

## प्रकरण ३ रें.

# कानपूरची क्रांति व पेशवाईचें पुनरुज्जीवन.

गेल्या प्रकरणांत कथन केल्याप्रमाणें क्रांतीचा वणवा क्रांतिकारकांनीं प्रथम निश्चित केलेल्या दिवसाच्या–३१ मेच्या–आधींच अकस्मात् ता. १० मेलाच पेटविला. व ता. ११ मेला दिल्लीनें पेट घेऊन मोंगल बादशहा त्यांत मिळाला. या अघटित घटनेनें हिंदुस्थानमधील ब्रिटिश कंपनीच्या सत्तेला एक विजेचा धक्का बसला व कांहीं कांहीं अहंमन्य गोऱ्या अधिकाऱ्यांना तर ही गोष्ट अशक्यप्रायच वाटूं लागली–इतक्या गुप्त रीतीनें ५७ च्या क्रांतीच्या नेत्यांनीं त्यांची संघटना चालविली होती.–परंतु, ज्यावेळीं हजारों बंडखोर दिल्लीला प्रगटपणें क्रांतीचा ध्वज उभारून बादशहाच्या नांवानें प्रत्यक्ष सत्ता चालवूं लागले, त्यावेळीं मात्र सर्वांच्या डोळ्यावरचें भ्रमाचें पटल दूर होऊन जो तो या अद्भुत घटनेकडे चकित अंतःकरणानें पाहूं लागला.

५७ च्या बंडाळीच्या काळांत अनेक ठिकाणीं उठावण्या झाल्या. अनेक नगरें, अनेक प्रांत, अनेक पलटणी क्रांतीचे झेंडे घेऊन उठल्या; परंतु क्रांतीची उठावणी केल्यावर ती क्रांति चिरस्थायी करणें व हिसकावून घेतलेली सत्ता व्यवस्थित करून त्याचें एक सरकार बनविणें ही गोष्ट फारच थोड्या ठिकाणीं झाली. बाकीच्या ठिकाणीं सैन्याच्या अथवा लोकांच्या क्षोभानें उठावण्या झाल्या. सांपडले तितक्या गोऱ्या लोकांच्या कांहीं ठिकाणीं कत्तली उडाल्या; जाळपोळ, लूटमार झाली व मग योग्य पुढाऱ्यांच्या अभावीं सर्व क्रांतिकारक दिल्लीकडे चाल करून जाऊं लागले. परंतु, अशानें कंपनी सरकारचीं अनायासेंच अनेक व्यवधानें बंद पडलीं व त्यांना विवक्षित ठिकाणांवरच आपलें सामर्थ्य केंद्रीभूत करतां आलें. त्यामुळें क्रांतीचा झगडा सातत्यानें असा तीन चार ठिकाणींच झगडला गेला.

त्यांपैकीं दिल्लीचें युद्ध ता. ११ मेला सुरूं झालें व सुमारें चार महिने तें टिकून, ता. २० सप्टेंबर १८५७ या दिवशीं इंग्रजांनीं दिल्ली जिंकून घेऊन मोंगल बादशहाला बंदीवान केला.

दुसरी लखनौची उठावणी ता. ३० मे १८५७ ला झाली व जवळ-

ग्रंथ संग्रहालय
४८३७

जवळ ८–१० महिने तेथें क्रांतिकारकांच्या व कंपनी सरकारच्या अनेक झटापटी होऊन ता. २१ मार्च १८५८ या दिवशीं तेथील क्रांतिकारकांचा पूर्णपणें मोड झाला.

तिसरी जगदीशपूरची उठावणी ता. २७ जुलई १८५७ या दिवशीं, ८० वर्षांचे वृद्ध भीष्माचार्य कुंवरसिंह व त्यांचे पराक्रमी बंधु अमरसिंह यांनीं सुरूं करून सारा बिहार प्रांत पेटवून दिला. आणि ता. १३ आक्टोबर १८५८ या दिवसापर्यंत म्हणजे एका वर्षावर हा क्रांतीचा झगडा अत्यंत निकरानें चालवून अनेक वेळां इंग्रजांचा पराभवहि केला. परंतु, अंतीं कुंवरसिंह वीरोचित मरण पावले आणि अमरसिंह सर्व मानवी प्रयत्न करून ते निष्फळ झाल्यावर नेपाळकडे निघून गेले व अशा रीतीनें येथील क्रांतीचा प्रयत्न विफल झाला.

या सर्व ठिकाणच्या क्रांतीच्या उठावणीपेक्षां अधिक काळ टिकलेली, अधिक संघटित असलेली व अधिक पद्धतशीर सत्तास्थापनेचा प्रयत्न केलेली क्रांतिकारकांची उठावणी म्हणजे कानपूर व झांशी येथील होय. या दोनहि उठावण्या जुळया भावंडाप्रमाणेंच होत्या व एकमेकांशीं निकट सहकार्य करून त्या चालल्या होत्या. या ठिकाणीं अत्यंत नामांकित, चतुर, शूर व धाडसी पुढारी क्रांतिकारकांना लाभले व म्हणूनच येथील क्रांतिकारकांचा पूर्ण पराभव करण्यास, कंपनीच्या साऱ्या सैन्याला जवळ जवळ दोन वर्षें झगडावें लागलें. ता. ४ जून १८५७ या दिवशीं कानपूरला मध्यरात्रीं उठावणी झाली व ता. ७ एप्रिल १८५९ या दिवशीं मध्यरात्रींच क्रांतीचे अंतिमचे सेनापति तात्या टोपे हे विश्वासघातानें एका अरण्यांत पकडले गेले.

अशा रीतीनें क्रांतीच्या या कानपूरच्या शाखेनेंच अधिकांत अधिक काळ हिंदुस्थानच्या राजसत्तेकरतां कंपनीसरकारशीं स्पर्धा केली. सर्व ठिकाणचे क्रांतीवाले सारख्याच शौर्यानें लढले यांत शंका नाहीं. परंतु, निरनिराळ्या ठिकाणच्या पुढाऱ्यांच्या कर्तृत्वावर सैनिकांच्या शौर्याचें चीज अवलंबून असतें. त्याप्रमाणें कानपूर–झांशी येथील कुशल पुढाऱ्यांच्या नेतृत्वानें याच शाखेचें दमन करणें इंग्रजांस फार कठीण व जिवावरचें गेलें.

आपले चरित्रनायक तात्या टोपे यांचा संबंध क्रांतीच्या याच शाखेशीं निगडित झाल्यानें आपल्याला आतां त्याचाच इतिहास कथन केला पाहिजे

कानपूर–झांशीच्या क्रांतियुद्धाचें महत्त्व लक्षांत यावें, म्हणून आतांपर्यंत आवतींभोंवतीं चाललेल्या युद्धाच्या वणव्याचें संकलित दिग्दर्शन केलें. आतां प्रत्यक्ष कानपूरच्या वृत्तांताचें कथन करूं.

कानपूर हें गंगेच्या कांठीं आधुनिक काळीं वसलेलें एक नगर आहे. हें ठिकाण कंपनी सरकारच्या सैन्याचें एक मोठें महत्त्वाचें ठिकाण होतें. व त्यावेळीं म्हणजे १८५७ या वर्षीं येथें कंपनी सरकारच्या क्रमांक ५४ व ५६ च्या पायदळ व घोडदळाच्या पलटणी रहात होत्या. या सर्व पलटणींतील एकंदर सैनिकांची संख्या तीन हजार होती. येथें गोरे लोकहि सर्व मिळून एकंदर ३०० पर्यंत होते.

कानपूरपासून जवळच ब्रह्मावर्त अथवा बिठुर या नांवाचें एक स्थान आहे. त्या ठिकाणीं दुसरे बाजीराव पेशवे यांना राज्यच्युत केल्यानंतर कंपनी-सरकारनें आणून ठेविलें होतें हें पहिल्या प्रकरणांत आपण पाहिलेंच आहे. तेथेंच नानासाहेब पेशवे यांचें व त्यांच्या सहकारी मित्रमंडळाचें मुख्य स्थान होतें. त्याच ठिकाणीं राज्यक्रांतीची कल्पना जन्माला आली व वाढीला लागली असा पुष्कळ पुरावा युरोपियन लेखकांच्या निरनिराळ्या लिखाणांतून उपलब्ध झाला आहे. या चरित्राच्या लहानशा कक्षेंत ही सर्व चर्चा करणें शक्य नाहीं. म्हणून तो मोह आवरून धरणेंच अवश्य आहे.

दुसऱ्या प्रकरणांत आपण पाहिलेंच आहे कीं, क्रांतिकारकांच्या कटाची खरी पोषक जी मुख्य चळवळ कीं, ठिकठिकाणीं असंतोष उत्पन्न करणें, प्रजेला रंजीस आणणें, तिचा पदोपदीं अपमान करणें, राज्यें गिळंकृत करणें, इत्यादि गोष्टी, त्या आधींच कंपनीसरकारनें व तिचा उद्दाम हस्तक जो लॉर्ड डलहौसी यानें पूर्णपणें करून ठेविल्या होत्या. असा हा ठिकठिकाणीं उत्पन्न झालेला असंतोष सहानुभूतीच्या संवेदनेनें एकजीव करणें व सहकार्याच्या व्यवस्थेनें तो संघटित करणें हीं दोन कार्यें करणारे क्रांतिकारकांचे नेते कोणी-तरी उत्पन्न होण्यास हवे होते. व ते तसले नेते या बिठुरच्या पेशव्यांच्या राजप्रासादांत निर्माण झाले. नानासाहेब पेशव्यांचे वारस अधिकार कंपनीनें धुडकावून लाविल्यावर बिठुरच्या राजप्रासादाचा सर्व रंग बदलून गेला. तेथें निरनिराळ्या क्रांतिकारकांची ये, जा सुरूं झाली. परंतु, हे क्रांति-

कारक आहेत किंवा स्वत: नानासाहेब कांहीं प्रचंड खटपट करीत आहेत याची वार्ताहि कंपनी सरकारला नव्हती. कारण, नानासाहेबांना, बाजी-रावांचें ८ लाखांचें वेतन देण्याचें जरी कंपनी सरकारनें बंद केलें तरी नानांच्या घरचा श्रीमंती पाहुणचार यथेच्छपणें घेण्याचा मात्र कंपनीच्या चाकरांना व अन्य गोऱ्या लोकांना संकोच वाटत नव्हता ! व नानासाहेबहि अत्यंत धूर्तपणानें वागत होते. गोरे अधिकारी आले कीं–व ते नित्यश: येत असत–एकीकडे त्यांना आदरातिथ्यानें व मिष्ट भाषणानें नानासाहेब संतुष्ट टेवीत, परंतु अपमानाचें शल्य त्यांच्या अंत:करणांत सारखें बोंचून दुसरीकडे ते एका प्रचंड गुप्त कटाची घटना करण्यांत दंग झाले होते. ८ लाखांचें वेतन परत मिळविण्याकरतां त्यांनीं अजीमुल्ला या नांवाचा एक चतुर, धाडसी व इंग्र-जांचा द्वेष करणारा गृहस्थ लंडनला पाठविला होता. परंतु, तो निराश होऊन परत आला व परत येतांना रशिया, तुर्कस्थान वगैरे देशांतहि जाऊन आला. झांशीच्या महाराणीशीं तर नानांचें प्रथमपासूनच कारस्थान चालूं होतें, व त्या महाराणी या कटवाल्यांच्या प्रमुख मंडळीपैकीं एक होत्या. त्याच-प्रमाणें दक्षिणेंत सातान्यास रंगो बापूजी या विलायतेहून परत आलेल्या प्रख्यात देशभक्ताशींहि अजीमउल्लाच्या वतीनें कांहींतरी राजकारण चाललें असावें अशा तऱ्हेचे संशय येण्यास कारणें आहेत. अशा रीतीनें अंतस्थ सूत्र-चालना होतां होतां इ. स. १८५७ च्या आरंभीं नानासाहेबांनीं एक दौरा काढून प्रमुख प्रमुख नगरांना त्यांनीं भेटी दिल्या व एकंदर परिस्थितीचें नीट निरीक्षण केलें. नानांच्या या सर्व प्रयत्नांत अजीमउल्लाप्रमाणेंच तात्या-टोपे हेहि एक प्रमुख आणि अत्यंत विश्वस्त असे नानासाहेबांचे मंत्री होते. नानासाहेबांजवळ लहानपणापासूनच तात्या टोपे वाढल्यामुळें त्यांच्या सर्व इच्छा व आकांक्षा नानांप्रमाणेंच बनल्या होत्या. त्याचप्रमाणें नानासाहेब हे पेशवापदाचे अधिकारी म्हणून तात्या त्यांना आपले धनी, आपले सरकार मानीत असत. आणि म्हणून नानांच्या सर्व आरंभींच्या कारस्थानांत तात्यांची सल्ला, तात्यांची सहाय्यता व तात्यांची सेवा ही अनिवार्यतेनें निगडित झाली होती. इतकेंच नाहीं, परंतु विठुरच्या पेशव्यांच्या राजवाड्यांत त्यावेळीं नानासाहेबांचा जो सर्व परिवार होता, त्यांपैकीं सर्व प्रमुख व्यक्ती नाना-

साहेबांच्या या क्रांतीच्या महदुद्योगांत समाविष्ट झाल्या होत्या. नानासाहेबांचे बंधु बाळाराव व पुतणे रावसाहेब, पहिल्या घरचे बंधु बाबाभट त्याचप्रमाणें जळके रामभाऊ या नांवानें प्रसिद्ध असलेले एक आश्रित इत्यादि अनेक बिठुरच्या राजवाड्यांतील परिजन व नातलग पुढें पेटलेल्या क्रांतीच्या युद्धांत शक्य तो पराक्रम करून कामास आले ही गोष्ट पाहिली म्हणजे नानासाहेबांनीं बिठुरच्या पेशव्यांचा दुसऱ्या बाजीरावांच्या कालीं असलेला विलासी राजवाडा, त्यांच्या मरणोत्तर कसा क्रांतिकारकांच्या कारस्थानांचें आश्रयस्थान केला होता हें पूर्णपणें ध्यानीं येतें.

अशा रीतीनें तात्या टोप्यांचे प्रथमचे सर्व प्रयत्न कानपूरच्या उठावणींतच निगडित व समरस झाल्यानें कानपूरच्या उठावणीचा इतिहास आपल्याला पहाणें अवश्य आहे.

मीरतला ता. १० मेला अकस्मात् उठावणी झाली व लगेच ता. ११ ला दिल्ली बंडवाल्यांनीं हस्तगत करून निश्चितपणें बंडास सुरवात झाली. ही वातमी हां हां म्हणतां कानपूरच्या सैन्यांत व ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांत समजली. त्यावेळीं कानपूरच्या सैन्यांत अंतस्थ मनोवृत्तींची खळबळ होण्यास आरंभ झाला. व ती खळबळ अनेक वेळेला, अनेक निमित्तानें गोऱ्या अधिकाऱ्यांना प्रतीतहि झाली. यावेळीं कानपूरच्या सैन्यावर सर ह्यू व्हीलर या नांवाचा एक ५४ वर्षें वयाचा सैनिक म्हणून चाकरी केलेला वृद्ध सेनानायक प्रमुख अधिपति होता. त्यानें ही मीरतची, दिल्लीची व अन्य ठिकाणची भयप्रद बातमी ऐकून कानपूरच्या गोऱ्या लोकांच्या बचावाकरितां तांतडीनें त्यांच्या सैन्याच्या तळावरच रुग्णालयाच्या भोंवतीं एक चार फूट उंचीचा लहान तट बांधला व त्याच्या आंत सर्व इंग्रज मुलें माणसें आणून ठेविलीं. या तटबंदीला पाहून बिथरलेले शिपाई थट्टेनें निराशेचा किल्ला म्हणून संबोधीत असत !

इकडे कानपूरला जरी अशी खळबळ शिपायांच्या मनोवृत्तींत होत होती, तरी इकडे जवळच असलेल्या ब्रह्मावर्ताच्या राजाच्या राजवाड्यांत मात्र बाहेरून अगदीं शांतता प्रतीत होत होती. परंतु, नानासाहेबांनीं तात्या टोपे आदि सर्व कार्यकर्त्यांना एकत्र बोलावून या आकस्मिक

झालेल्या स्फोटासंबंधीं व पुढील धोरणाविषयीं विचार केला. व पुढ कांहीं काल क्रांतिकारकांची उठावणी कसकसा रंग धारण करते याचें निरीक्षण करून मग योग्य काळीं आपणहि आपलें खड्ग निष्कोषित करावयाचें असें धोरण निश्चित करण्यांत आलें. हा निर्णय झांशीलाहि कळविला गेला असला पाहिजे. कारण, कानपूर जसें ४ जून १८५७ पर्यंत शांत होतें, तशीच झांशीहि ४ जूनपर्यंत शांतच होती व ४ जूनला कानपूरनें युद्धाची आरोळी नानासाहेबांच्या आधिपत्याखालीं ठोकतांच झांशीहि ता. ७ जून १८५७ ला गर्जून उठली व तेथें स्वराज्याची द्वाही फिरली.

विठूरच्या राजवाड्यांतील लोक ज्या योग्य कालाची वाट पहात होते तो योग्य काल लवकरच आला, व तोहि मोठ्या चमत्कारिक रीतीनें आला ! कानपूरला शिपायांच्या शिबिरापासून कांहीं अंतरावर कंपनी सरकारचें धनागार होतें. त्यांत बारा लक्ष रुपये भरले होते. त्याचें रक्षण कसें करावें याची चिंता सर व्हीलरला पडली. तेव्हां त्यानें कलेक्टर हिंडर्सन याच्याशीं विचार करून एक सुंदर युक्ति शोधून काढली ! ती युक्ति म्हणजे विठूरच्या पदच्युत झालेल्या व सर्वस्वाला कंपनीकडून वंचित केल्या गेलेल्या पूर्वसत्ताधीश नानासाहेबाला यावेळीं सहाय्याला बोलवावें ही होय· नानासाहेबांच्या बाह्य वर्तनानें त्यांचें अंतरंग या कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळलें नाही. बाहेर अत्यंत रंगेल दिसणाऱ्या ह्या तरुण राजविलासी राजपुत्राच्या अंतरंगांत रणरंग उसळत असेल अशी कल्पनाहि त्यांना शिवली नाहीं! व त्यांचें हें वाटणें त्या वेळीं अनाठायीं होतें असें तरी कोण म्हणेल ? कारण, प्रत्यक्ष दुसऱ्या बाजीरावाचेंच उदाहरण नव्हतें कां त्यांनीं पाहिलें? समर्थ मराठी साम्राज्याच्या सिंहासनावरून त्याला हिसडून काढून दूरच्या एका उदास-वाण्या विठूरला फेंकून दिलें, तरीहि ज्याच्या चित्तवृत्ती क्षुब्ध झाल्या नाहींत, व त्या विठूरच्या गंगा-घाटावरच ज्यांनीं स्नानसंध्येची बैठक थोडी थोडकी नव्हे तर तेहतीस वर्षे जमवून दिली, इतकेंच नव्हें तर पंजाबच्या शूर शिखांशीं ज्या वेळीं कंपनी सरकारचें युद्ध चाललें होतें त्या वेळीं त्या देशबांधवांच्या पायांतच पारतंत्र्याच्या बेड्या ठोकण्यास सहाय्य व्हावें म्हणून कंपनी सरकारला लाखों रुपयांचें ऋण ज्यानें संतोषानें दिलें त्या दुसऱ्या

बाजीरावाचें उदाहरण त्यांच्या समोर नव्हतें कां? मग झालें तर! हा नानासाहेब त्यांचाच मुलगा. तोहि कंपनी सरकारच्या या संकटाच्या वेळीं बापाचें ब्रीद स्मरून त्यांच्या सहाय्याला नाहीं कां धावणार? अशाच तर्कशास्त्राच्या आधारावर सर ह्यू व्हीलरनें बिठूरला नानासाहेबांना सहाय्यार्थ पाचारण धाडलें! बिठूरच्या क्रांतिकारकांना जो अनुकूल काल पाहिजे होता, तो हा असा चालून आला! आणि किती विपरीत रीतीनें चालून आला!

अशा रीतीनें आकस्मिकपणें कंपनी सरकारकडून ब्रह्मावर्ताच्या राजाला सहाय्यार्थ बोलावणें येतांच नानासाहेबांनीं तें अत्यंत तत्परतेनें मान्य केलें. ज्या हिंदुस्थानच्या सत्ताधारी पेशव्यांच्या नुसत्या भृकुटीभंगाबरोबर लाखों लोकांच्या सेना कधीं उदगीर, तर कधीं हैदरवर, कधीं रोहिल्यावर, तर कधीं दिल्लीवर रणधुमाळी करीत धावून जात, त्याच पेशव्यांच्या वंशजाजवळ १८५७ सालच्या मे महिन्याच्या २० व्या तारखेला ज्या वेळीं सर ह्यू व्हीलरचें बोलावणें आलें, त्या वेळीं केवळ ३०० पायदळ व घोडदळ मिळून सैन्य जमूं शकलें व दोन तोफाहि वर निघाल्या! परंतु, तेवढ्याच लोकांनिशीं नानासाहेबांनीं कानपूरला जाण्याचा निश्चय केला. त्या वेळीं कदाचित् त्यांच्या मनःश्चक्षूपुढें त्यांच्या ह्या हीनबलतेचें चित्र अधिक भयानकपणें उभें राहिलें असेल! असेंच मागें भारतस्वातंत्र्यप्रेमी पण एकदां संकटग्रस्त झालेल्या छत्रसालानें थोरल्या बाजीरावांजवळ सहाय्य मागितलें होतें. त्या वेळीं हजारों सैनिकांसह त्यांनीं त्याच्या मोचनाकरितां धांव ठोकली होती, हेंहि कदाचित् त्यांना आठवलें असेल व आजची ही तीनशें लोकांची फाटकी सेना पाहून त्यांना अधिकच विषाद वाटला असेल. त्याचबरोबर कदाचित् त्यांनीं असाहि निश्चय केला असेल की, हीच कांहीं शेंकड्यांची सेना मी हजारोंची करीन व तें गेलेलें मराठी साम्राज्याचें वैभव परत मिळवीन.

अशी ही सेना व २ तोफा घेऊन नानासाहेब पेशवे तात्या टोपे आदि त्यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांसह ता. २२ मे १८५७ या दिवशीं कानपूरमध्यें प्रविष्ट झाले व इंग्लिश सैन्यामध्येंच त्यांनीं आपला तळ दिला. नानासाहेब, तात्या टोपे यांच्यासह आपल्या सहाय्याला आले हें पाहून कलेक्टर हिंडर्सन यांनीं नानांचे व तात्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानले.

नानासाहेब व त्यांचे उजवे हात तात्या टोपे यांनीं आपलें कारस्थान इतक्या चतुरतेनें गुप्त ठेविलें होतें हें पाहून एक इंग्रज इतिहासकार म्हणतो- **'मराठी साम्राज्याचा संस्थापक शिवाजी याचें चरित्र नानानें कांहीं उगीच अभ्यासिलें नव्हतें!'**

नानासाहेब कानपूरला आल्याबरोबर त्यांच्यावर सर व्हीलरनें कंपनीचें धनागार संरक्षिण्याचा भार टाकला! व नानासाहेब, तात्या टोप्यांसह त्या धनागाराचें रक्षण करूं लागले. नानासाहेबांच्या सैनिकांचें वेतन देण्याचें काम कंपनी सरकारनें अंगावर घेतलें.

इकडे देशी सैन्यामध्यें नानासाहेब आले ही बातमी हां हां म्हणतां पसरली व त्यांच्या पुढाऱ्यांच्या व नानासाहेबांच्या विश्वासू हस्तकांच्या गुप्तपणें गांठीभेटी होऊं लागल्या. ता. २२मे पासून ता. ३ जूनपर्यंत क्रांतिकारकांचीं कारस्थानें रंगास येत होतीं. मध्यंतरीं इतरत्र चाललेल्या नित्य नव्या बंडाच्या व क्षुब्ध घटनांच्या बातम्या प्रतिदिनीं येऊन कानपूरच्या सैनिकांच्या कानीं आदळंत होत्या. त्यामुळें ते उत्तेजित व उतावळे बनत चालले होते.

कानपूरच्या सैनिकांचा मुख्य प्रतिनिधि सुभेदार टिकासिंग हा होता. शमसुद्दीन या नांवाचा दुसराहि एक प्रमुख मनुष्य होता. नानासाहेबांच्या वतीनें ज्वालाप्रसाद हा सर्व बोलणें करीत होता. अशा रीतीनें नित्य चर्चा व पुढील कार्यक्रम ठरविण्यांत ता. ३ जूनपर्यंत दिवस लोटले. आतां मात्र शिपाई अत्यंत उतावीळ झाले. त्यांचें वर्तनहि उघड उघड कंपनी सरकारच्या विरुद्ध दिवसेंदिवस घडूं लागलें. इतकें कीं, मध्यंतरीं महाराणी व्हिक्टोरिया हिचा जन्मदिवस आला त्या दिवशीं महाराणीच्या सन्मानाप्रीत्यर्थ तोफा वगैरे उडवावयाच्या होत्या. परंतु, सर व्हीलर व इतर सर्व गोऱ्या अधिकाऱ्यांना वाटलें कीं, तोफांच्या आवाजामुळें शिपायी लोक अधिकच बिथरतील म्हणून त्यांनीं त्या दिवशीं तोफा सोडण्याचेंहि बंद ठेवलें.

अंतीं जें व्हावयाचें तेंच झालें. जून महिना लागतांच सर्वत्र कानपूरला विशेष हालचाली सुरू झाल्या. एका संध्याकाळीं प्रत्यक्ष नानासाहेब आपल्या निवडक मंत्र्यांना घेऊन गंगाघाटावर गेले. तेथें शिपायांचे प्रमुख टिकासिंग

वगैरेहि आले होते. ही सर्व मंडळी नावेंत बसून लांबवर गंगाप्रवाहांत जलविहाराला गेली. तेथें दोन तासपर्यंत गूढ कारस्थान झालें. कटवाल्यांचें उठावणीपूर्वीचें हेंच बहुधा शेवटचें कारस्थान असावें.

ता. ४ जूनचा सूर्य उगवला व मावळला. तरी विशेष उत्पात कांहीं झाला नाहीं. रात्र पडली तरीहि सर्वत्र शांतच होतें. मध्यरात्र झाली व कानपूरच्या रणधुमाळीचा दिवस उजाडला. प्रथम घोडदळानें बंडाचा झेंडा उभारला. लगेच पायदळहि सिद्ध झालें. हां हां म्हणतां कानपूरचे सर्व सैनिक कंपनीसरकारविरुद्ध उघडपणें युद्ध पुकारून उठले. ते मग तडक नानासाहेबांच्या गोटाकडे वळले. तेथें नानासाहेबांचे लोक जणुं त्यांची वाटच पहात बसले होते. त्यांनीं त्यांचें प्रेमभरानें स्वागत केलें. नंतर त्यांनीं सर्वांनीं मिळून कंपनी सरकारचें धनागार स्वाधीन करून घेतलें. क्रांतिकारकांची सत्ता अशा रीतीनें कानपूरवर बसत चालली. ता. ५ जूनला कानपूर कंपनी सरकारच्या हातून गेलें. व नानासाहेब पेशव्यांना तेथील क्रांतिकारकांनीं 'राजा' म्हणून अभिवंदन केलें.

नंतर इतर ठिकाणच्या पलटणींनीं कंपनी सरकारविरुद्ध उठतांच जसा दिल्लीचा मार्ग धरला, तसें मात्र कानपूरला घडलें नाहीं. प्रथम कांहीं सैन्य दिल्लीच्या मार्गाला लागलेंहि होतें व ही बातमी ऐकून इंग्रज सेनानी सर व्हीलरला हायसेंहि वाटलें. कारण, मग तो सर्व गोऱ्या लोकांसह अलाहाबादला सुरक्षितपणें जाऊन पोंचणार होता. परंतु, नानासाहेबांसारखा चतुर नायक तेथें लाभल्यानें त्यांनीं त्या सर्व सैनिकांना परत कानपूरला बोलावून कानपुरलाच क्रांतिकारकांचें एक नवीन केंद्र निर्माण केलें. त्यामुळें १८५७ च्या युद्धाचा सर्वच रंग पालटला. .

लगेच नानासाहेब व तात्या टोपे यांनीं सैन्याचे निरनिराळे अधिकारी नेमून दिले. नानासाहेबांनीं इतरहि अवश्य ते प्रबंध लोकांना उन्माद आणणाऱ्या त्या परिस्थितींतहि शक्य तितके केले.

इकडे इंग्रजी गोटांत ही सर्व घटना कळतांच सर व्हीलरनें पूर्वी तयार केलेल्या कोटाच्या आंत सर्व इंग्रज स्त्रीपुरुष व राजनिष्ठ हिंदी सैनिक

जमा करून त्या कोटावर ठिकठिकाणीं तोफा डागल्या. आणि मोठ्या धैर्यानें व शौर्यानें हें ठिकाण लढविण्याचें ठरविलें.

इतक्यांत नानासाहेबानेंहि आपल्या सैन्यास सर व्हीलरवर चढाई करण्याची आज्ञा दिली. व्हीलरच्या त्या लहानशा किल्ल्याला क्रांतिकारकांच्या सैन्याचा वेढा पडला व उभयतांचें युद्ध सुरू झालें.

या वेढ्यामध्यें इंग्रज लोक अत्यंत शौर्यानें, चिकाटीनें व प्रत्यक्ष मृत्यूला जणुं हिणवीत लढले. त्यांचे यावेळीं फार हाल झाले. पाण्याचा तुटवडा पडला, अन्नाचा तुटवडा पडला, परंतु, व्हीलरसारख्या वृद्ध सेनापतीनेंहि अलोट धैर्यानें क्रांतिकारकांशीं झुंज घेतली. क्रांतिकारकांनीं अखंड तोफांचा मारा चालविला. परंतु, प्रत्यक्ष आक्रमण फारसें केलें नाहीं. इंग्रजी सैन्याला रंजीस आणून तो कोट जिकण्याचें धोरण त्यांनीं अंगिकारिलें. इंग्रजांना फार आशा होती कीं, लखनौ किंवा प्रयागहून कांहीं सहाय्य येईल परंतु, तेथेंहि बंडाची आग भडकल्यामुळें सहाय्य येणें अशक्यप्राय झालें.

इकडे नानासाहेबांनीं आपली सत्ता स्थिर करण्याचे सर्व प्रयत्न चालविले. त्यांनीं गांवांत विनाकारण लुटालूट करणाऱ्या गुंडांना शासन केलें व न्यायालय प्रस्थापित केलें, व कानपूरचा एक प्रतिष्ठित गृहस्थ होलासिंग याला न्यायाधीश नेमलें. त्याचप्रमाणें इतर राज्यकारभाराचीं अंगेंहि स्थापित करण्याचे प्रयत्न झाल्याचे अनेक उल्लेख आढळतात.

२३ जून १७५७ हा प्लासीच्या लढाईचा दिवस होता. व त्या वेळीं सर्व शिपायी लोकांमध्यें अशी भविष्यवदंता पसरली होती कीं, बरोबर शंभर वर्षांनीं म्हणजे १८५७ या वर्षी कंपनी सरकारचें राज्य नष्ट होणार. त्याप्रमाणें कानपूरलाहि २३ जून रोजीं क्रांतिकारकांनीं व्हीलरच्या कोटावर फार निकराचा हल्ला केला. इंग्रज सैन्याचा सर्व धीर आतां तुटला होता. बाहेरून सहाय्य येणें अशक्य झालें होतें. जवळची सर्व सामुग्री संपली होती. शेंकडों लोक मृत्युमुखीं व शेंकडों रुग्णशय्येवर पडले होते. पाण्याची टंचाई झाली होती, तरी त्यांनीं अत्यंत शौर्यानें ता. २३ जूनच्या क्रांतिकारकांच्या हल्ल्याला तोंड दिलें. व तो हल्ला परतविला. आणि तरीहि या हल्ल्यानें त्यांची इतकी दुर्दशा उडाली कीं, यापुढें तग धरणें अशक्यप्राय झालें. आणि अंतीं

ता. २५ जूनला इंग्लिशांनीं तहाचें निशाण उभारलें. तात्या टोपे स्वत: आपल्या निवेदनांत सांगतात कीं, 'असें तहाचें निशाण इंग्लिश सेनापतीनें उभारल्याबरोबर युद्ध तत्काळ थांबविण्यांत आलें.'

नंतर इंग्लिशांचे वकील श्रीमंत नानासाहेबांकडे आले व बऱ्याच चर्चेनंतर सामाच्या अटी ठरल्या कीं, इंग्लिश सैन्यानें शस्त्रें खालीं ठेवावयाचीं व मग त्यांना श्रीमंत नानासाहेबांच्या आज्ञेनें प्रयागला सुरक्षित पोंचतें करून द्यावयाचें. याप्रमाणें गंगेंत नावांची वगैरे सर्व सिद्धता झाली.

ता. २७ जूनला इंग्लिशांनीं प्रयागला जाण्याची सिद्धता केली. सतीचोर नांवाच्या घाटावर त्यांच्याकरतां नावा सिद्ध होत्या. घाटांवर कानपूरचे रहिवासी व क्रांतिकारकांचे सैनिक ही मौज पहावयास उभे होते. क्रांतिकारकांचे सेनापति टिकासिंग, अजीमुल्ला व तात्या टोपे हेहि या वेळीं तेथें सर्व व्यवस्था पहात होते. श्रीमंत नाना मात्र शिबिरांतच होते.

अंतीं, सकाळीं ९ वाजतां इंग्लिशांच्या नावा चालू झाल्या. परंतु इतक्यांत कांठावरच्या कांहीं निर्दय बंडखोरांमध्यें चळवळ सुरू झाली. सेनापतींच्या किंवा इतर कोणाच्याहि धाकाला ते मानीनासे झाले. कोणीसा एक बिगुल वाजविला व या क्रूर बंडखोरांनीं नि:शस्त्र इंग्लिशांवर एकच हल्ला चढविला. त्यांच्यावर त्या वेळीं कोणाहि पुढाऱ्यांचा किंवा सेनानायकांचा अधिकार चालू शकला नाहीं. आणि त्या क्रूर शिपायांनीं मन मानेल तसा अत्याचार सुरू केला. प्रत्यक्ष तात्या टोपे यांनीं त्यांच्या चौकशीच्या आधीं जें निवेदन लिहून दिलें, त्यांत स्पष्टपणें म्हटलें आहे कीं:—

'शरण आलेल्या इंग्रजांना त्यांच्या बायकामुलांसह प्रयागला पाठविण्याची नानासाहेबांनीं व मी शक्य तेवढी खटपट केली. परंतु, शिपायी आमच्या कह्यांत राहिले नाहींत. त्यांनीं नदींत उतरून कत्तल करण्यास सुरवात केली. शिपाई कोणालाच त्या वेळीं मानीत नव्हते.'

याप्रमाणें या भयंकर कत्तलीचें कर्तृत्व नानासाहेब किंवा तात्या टोपे यांच्याकडे येऊं शकत नाहीं, असेंच अन्य पुराव्यांनीहि सिद्ध झालें आहे.

अशा रीतीनें या कत्तलीची अमानुष दंगल बंद झाल्यावर मग श्रीमंत नानासाहेब व इतर मंडळी पुढील उद्योगास लागली. कानपूर प्रांतांतून

कंपनी सरकारची सत्ता आतां सर्वस्वी नष्ट झाली होती, व जरी नानासाहेबांना सर्व क्रांतिकारकांनीं आपले राजे म्हणून वंदन केलें होतें तरी त्यांच्या राजेपणास धर्माचें पावित्र्य येण्याकरतां राज्याभिषेकाचा विधि अवश्यच होता. व म्हणून सर्वांच्या मतानें असें ठरलें कीं, विठूरच्या राजप्रासादांत श्रीमंत नानांना सविधि राज्याभिषेक व्हावा. त्याप्रमाणें ता. १ जुलैला श्रीमंत नाना आपल्या सर्व परिवारासह बिठूरला आले व तेथें त्यांना यथाविधि राज्याभिषेक झाला ! १८१८ सालीं विगत झालेली मराठ्यांची गादी पुन्हां येथें गंगाकाठीं उत्थित झाली ! अवनत झालेला जरिपटका पुन्हां बिठूरच्या राजप्रासादावर राजवैभवानें, हजारों सैन्याच्या सैनिक अभिवंदनेंत फडकूं लागला! श्रीमंत नानासाहेबांची अचाट महत्वाकांक्षा तडीस गेली ! केवळ एक कंपनी सरकारचे आश्रित म्हणून मेलेलें अन्न खात पडलेले नानासाहेब आज पुनरपि स्वतंत्र महाराजे बनले ! मराठ्यांचें मृत स्वराज्य आज पुन्हां जिवंत झालें ! तात्या टोपे यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला !

हें मराठेशाहीचें पुनर्जन्म पावलेलें वैभव जरी अल्पमात्रच टिकलें तरी श्रीमंत नानासाहेब हे मूर्धाभिषिक्त राजे म्हणूनच पुढें मेले. स्वराज्य गमावून कंपनीचा आश्रित झालेल्या विगतवैभव पेशव्यांचा पुत्र म्हणून त्यांना मरण आलें नाहीं—तर स्वप्रयत्नानें स्वराज्य मिळवून मूर्धाभिषिक्त राजैश्वर्य संपादिलेल्या राजेपणानें त्यांना मरण आलें ! कंपनीसरकारचा अंतीं जरी जय झाला व म्हणून नानासाहेब लौकिकी भाषेंत जरी बंडखोर ठरले तरी कंपनी सरकारचेंहि अस्तित्व त्यानंतर लगेच नष्ट झालें व त्या ठिकाणीं इंग्लंडच्या राजकुलाची सत्ता सुरू झाली. म्हणजे श्रीमंत नानासाहेब पेशवे व कंपनी सरकार हे जे दोन गडी १८५७ च्या समररंगणांत प्रतिस्पर्धी म्हणून उतरले होते, त्यांनीं एकमेकांना आहत करतां करतां एकमेकांना मरणांतिक आघात केले व दोघेहि अंतीं मरून पडले! मात्र श्रीमंत नानासाहेब जे मेले ते त्यांच्या मस्तकावर राजाचा मुकूट झळकत असतां मेले व कंपनी सरकार जें नामशेष झालें तें त्याचा राजत्वाचा मुकुट महाराणी व्हिक्टोरिया यांनीं हिसकावून घेतला असतां नामशेष झालें ! असा हा एकंदर देखावा या १८५७ च्या प्रचंड स्फोटामध्यें दिसून आला ! असो.

ता. १ जुलईला बिठुरला श्रीमंत नानांना राज्याभिषेक झाल्यावर सर्व मंडळी कानपूरला पुन्हां परत आली. तेव्हां त्यांना वार्ता कळली कीं, प्रयागहून एक गोरी फौज कानपूरवर चालून येत आहे. त्यासरशीं त्या फौजेला अडवून धरण्याकरतां पेशवे सरकारच्या वतीनें सेनापति टिकासिंग यांची रवानगी झाली; व ९ जुलैला टिकासिंग, ज्वालाप्रसाद, श्रीमंत नानासाहेबांचे पहिल्या घरचे वडील बंधु बाबाभट वगैरे प्रमुख मंडळी कूच करून निघाली. त्यांनीं फत्तेपुरला इंग्रजी फौज गांठून नष्ट करण्याचा बेत केला.

तेथें कंपनी सरकारचे सेनापति रेनॉड व हॅवेलॉक यांची व पेशव्यांच्या सैन्याची गांठ पडली. लढाई मोठी निकराची झाली. परंतु अंतीं पेशव्यांच्या सैन्याचा पराभव झाला.

तरीहि या पराजयानें धीर न सोडतां कानपुरहून प्रसिद्ध योद्धा बाळाराव पेशवे यांना इंग्रजांवर धाडण्यांत आलें. ता. १४ जुलैला दोन्ही सैन्यें जवळ भिडलीं व ता. १५ जुलैला लढाई जुंपली. हॅवेलॉक हा मोठा प्रसिद्ध व कसलेला इंग्रजी योद्धा होता. यावेळीं बाळारावांनीं मोठी तडफ दाखविली व युद्धनैपुण्य सिद्ध केलें. हें युद्ध एकसारखें दोन तास चाललें होतें. परंतु अंतीं बाळाराव हरला. इंग्रजांच्या सैन्यांत जी शिस्त, जी चिकाटी, जो एकसूत्रीपणा असे तो क्रांतिकारकांना कधींहि साधला नाहीं व म्हणून त्यांचें शौर्य व धाडस विफल होऊन त्यांना पराभूत व्हावें लागे.

तरी पुन्हां बाळारावानें पांडुनदीच्या पुलावर इंग्रजांशीं दुसरी लढाई दिली. तीमध्यें बाळाराव घायाळ झाले व इंग्रजांना यश मिळालें. इंग्रजांचा सेनापति रेनॉड हाहि घायाळ झाला व दोन दिवसांनीं मरण पावला. ता. १५ जुलैला बाळाराव कानपूरला परत आले. त्यांना अपयश आलें तरी त्यांनीं अचाट पराक्रम दाखविला म्हणून त्यांना 'रणकुशल' ही पदवी पेशवेदरबारांतून अर्पण करण्यांत आली. मग प्रत्यक्ष श्रीमंत नानासाहेब यांनींच सर्व सेनेचें आधिपत्य घेतलें आणि ते सेनापति हॅवेलॉक याच्यावर चालून जाण्याची सिद्धता करूं लागले. इतक्यांत फत्तेपुराहून भयानक बातमी आली कीं, तेथील इंग्रजी सेनेनें तें ठिकाण घेतल्यावर तेथें भयंकर कत्तल केली. या बातमीमुळें कानपूरचे क्रांतिवाले संतापानें अधिकच खवळून गेले व त्याच्या

भरांत त्यांनीं 'बीबीघर' या नांवाच्या एका वाड्यांत बंदींत ठेवलेले सर्व इंग्लिश कैदी स्त्री वा पुरुष असा भेद न ठेवतां एकसहा सर्व ठार केले. याप्रमाणें दोन्हीहि पक्ष मनुष्यांतील सर्व माणुसकी सोडून देऊन एकाद्या क्रूर पशूप्रमाणें पिसाळून जाऊन सांपडेल तेथें एकमेकांचा संहार करीत चालले.

ता. १६ जुलै ( १८५७ ) या दिवशीं खासे श्रीमंत नानासाहेब पेशवे हे पांच हजार सैन्य घेऊन कंपनी सरकारच्या सेनापतीला—हॅवेलॉकला तोंड देण्यास पुढें सरकले. लवकरच दोन्ही फौजांची गांठ पडली. नानासाहेबांनीं मोठ्या चातुर्यानें आपल्या सैन्याचा व्यूह रचला होता. व तोफांची मारगिरीहि चांगली चालली होती. त्यानें इंग्लिशांची फार हानि होत होती. त्यामुळें प्रथम हॅवेलॉकची चाल मंद पडली. तो अत्यंत कसलेला असा समरपंडित होता. परंतु नानासाहेबांची युद्धचतुरता पाहून तोहि प्रथम गोंधळून गेला. परंतु नंतर त्यानें एकदम सरळ विलक्षण धडाक्यानें पेशव्यांच्या तोफावर चालून घेतलें व त्या हस्तगत केल्या. त्यासरशी क्रांतिकारकांचें सैन्य कच खाऊन मागें सरकूं लागलें. नानासाहेबांनीं पुन्हां धैर्यानें अर्धचंद्र व्यूहाची रचना करून हॅवेलॉकचें सैन्य घेऊन कचाटींत आणलें. परंतु क्रांतिकारकांत चिकाटी नसल्यानें नानासाहेबांनीं इतक्या चातुर्यानें उभारलेल्या व्यूहाला भगदाडें पडत गेलीं व अंतीं पेशव्यांच्या सैन्याचा पराभव झाला.

पराभव होतांच शक्य तेवढें आपलें सैन्य घेऊन नानासाहेब ब्रह्मावर्ताकडे मागें हटले व कानपूर नगर ता. १७ जुलै १८५७ ला इंग्लिशांच्या हातांत पडलें. त्यानंतर तेथें पुन्हां कत्तलीस प्रारंभ झाला. यावेळीं क्रांतिकारकांची मृगया होण्याची पाळी होती ! माणसांतील माणुसकी निघून गेल्यावर तो सिंह—व्याघ्रापेक्षांहि भयंकर होतो—कारण त्याला बुद्धि नसते!

श्रीमंत नानासाहेब बिठुरला गेले ही बातमी कळल्याबरोबर हॅवेलॉकनें त्वेषानें तिकडे एक सैन्य दुसऱ्या दिवशीं पाठवून दिलें. परंतु, नानासाहेब गंगापार होऊन त्यांचे परम स्नेही चौधरी भोपाळसिंग यांच्या सहाय्यानें लखनौ प्रांतांतील फत्तेपूर येथें जाऊन पोंचले. यावेळीं त्यांच्याबरोबर त्यांचे मुख्य मंत्री तात्या टोपे हे होतेच. त्याचप्रमाणें पेशव्यांचे बंधू बाळाराव व पुतणे रावसाहेब इत्यादि प्रमुख मंडळीहि त्यांच्याबरोबर होती.

तेथें गेल्यावर सर्व मंडळींना प्रश्न पडला कीं, आतां यापुढें कार्यक्रम कसा आखावा. आतांपर्यंत कानपूरला जमलेल्या सैन्याकडून पेशव्यांनीं तीन चार लढाया लढविल्या. परंतु ता. १६ जुलैला झालेल्या पराभवानंतर सर्व मुख्य सैन्याची पांगापांग झाली होती. ती पांगापांग नाहींशी करून पुन्हां एक दळ उभारणें अवश्य होतें. कारण कांहीं काळ पराभव येतांच अंगीकृत कार्य सोडून देणाऱ्यांपैकीं लेचेपेचे लोक ते नव्हते. विघ्नांनीं वारंवार अव्हान केलें असतांहि स्वीकृत कार्य न सोडणाऱ्या श्रेष्ठ कोटींतील ते पुरुष होते. म्हणून आलेल्या या पराभवांनीं त्यांचें धैर्य न खचतां कंपनी सरकारशीं झुंज घेण्याचाच त्यांचा निश्चय अधिक वाढला व त्या प्रयत्नाला पेशव्यांचा तो वनवासी दरबार लागला.

आजपर्यंत तात्या टोप्यांचें सर्व कर्तृत्व नानासाहेबांच्या कर्तृत्वांतच समरस झालेलें होतें. प्रथम तात्या टोपे हे पेशव्यांच्या राजवाड्यांत केवळ एक कारकून म्हणून काम करीत होते. परंतु, पुढें जसें बिठूरला राजकारण उत्पन्न झालें व बिठूरच्या केवळ भोजनप्रिय कार्यक्रमांत दुसऱ्या बाजीरावांच्या मरणानंतर जेव्हां अंतर पडून, अचाट साहस करण्याच्या आकांक्षेनें ज्यावेळीं श्रीमंत नानासाहेबांचें मन चेतून गेलें, त्यावेळीं तात्या टोप्यांच्या अंगीं असलेल्या शक्तीचा विकास होऊं लागला व ते लवकरच एका कारकुनाच्या पदापासून चढत चढत नानासाहेबांच्या मंत्र्याच्या पदवीपर्यंत चढले व ज्या वेळीं श्रीमंत नानांनीं प्रत्यक्ष युद्धाचें रणशिंग फुंकलें, त्यावेळीं तात्या टोपेहि मंत्रीपदाचें कर्तव्य मोठ्या कौशल्यानें करूं लागले. कानपूरवर श्रीमंत नानांची सत्ता ता. ४ जूनला प्रस्थापित झाल्यापासून तों ता. १६ जुलैला त्यांना पराभव प्राप्त होईपर्यंत, पेशव्यांच्या सैन्याचें आधिपत्य टिकासिंग, ज्वालाप्रसाद यांच्यासारख्या सैन्यांतील अधिकाऱ्यांनाच देऊन, त्यांना संतुष्ट ठेवण्यांत खरें कौशल्य होतें. कारण, त्यायोगें तेहि उत्साहानें कार्यांत भाग घेत होते व सैनिकहि त्यांना प्रथमपासून जाणीत असल्यानें त्यांच्यावर संतुष्ट होते. परंतु पुढें जेव्हां क्रांतिकारकांची पांगापांग झाली, त्यावेळीं हें सेनापति-पद अतिशय बिकटपणाचें व संकटमय बनलें. तेव्हां तें स्वीकारण्यास साहजिकच त्यावेळीं योग्य असा मनुष्य मिळणें मोठें कठीण होतें. फत्तेपूरला गेल्या-

वर ज्यावेळीं हें बिकट काम कुणाला द्यावें असा प्रश्न उपस्थित झाला, त्या वेळीं सर्वांचे डोळे तात्या टोप्यांकडेच वळले व सर्वांच्या मतानें तात्यांकडेच सैन्याची पुन्हां जमवाजमव करण्याचें कार्य देण्यांत आलें. श्रीमंतांची—नानासाहेबांची—तशी आज्ञा झाली व श्रीमंत नानासाहेबांची आज्ञा म्हणजे तात्यांना शास्त्रवचनाप्रमाणें प्रथमपासून वंद्य असे. म्हणून तशी आज्ञा श्रीमंतांकडून मिळतांच नितांत उत्साहभरानें तात्यांनीं आपली कुशल व चतुर लेखणी खालीं ठेवून प्रखर व तीक्ष्ण तरवार हातीं धरली! 'इदं ब्राह्मं, इदं क्षात्रं' अशा सव्यसाची पुरुषश्रेष्ठांमधले तात्या टोपे होते. म्हणून त्यांनीं मराठ्यांच्या धन्यानें—श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं जी जी आज्ञा केली, ती ती देशाधर्माची आज्ञा मानून शिरसावंद्य मानली व ती आज्ञा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतांच, त्या आज्ञेच्या पूर्तीकरतां ज्यावेळीं त्यांच्यावर शिर देण्याची पाळी आली, त्यावेळीं स्वतःचें शिर देऊनहि त्यांनीं ती पार पाडली !

याच कारणामुळें आतांपर्यंतचें तात्यांचें चरित्र श्रीमंत नानांच्या चरित्रांतच एकरूप झालें होतें. आणि म्हणूनच आपल्यालाहि श्रीमंत नानांच्या चरित्राचेंच आतांपर्यंत त्रोटकपणें निरीक्षण करणें अवश्य झालें.

यापुढें मात्र श्रीमंतांनीं तात्या टोप्यांना एका स्वतंत्र कार्यावर नियुक्त करून फत्तेपुराहून सैन्य गोळा करण्यास पाठवून दिलें. व त्यांना सेनापतिपदावर अधिष्ठित केलें. त्यामुळें तात्यांचा आयुष्यक्रम यापुढें भिन्न झाला. म्हणून आपल्यालाहि आतां श्रीमंत नानासाहेबांचा राजदरबार सोडून, तात्या टोप्यांच्या हालचालीकडे वळणें अवश्य आहे.

सुमारें २५ जुलैला श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं तात्या टोप्यांना प्रयाणकालचे आज्ञेचे विडे दिले. आजपर्यंत रामहनुमंताप्रमाणें असलेले हे असामान्य धनी आणि असामान्य सेवक, आज विभक्त होणार, ते पुन्हां कधीं भेटतील काय? उच्च ध्येयासाठीं देशाधर्माच्या नांवानें या दोघांनींहि आपलें वैयक्तिक सुख झिडकारून देऊन, हें सतीचें वाण हातीं घेतलें आहे. आणि त्या कार्यसाधनेकरतां जोंपर्यंत एकत्र रहाणें अवश्य होतें, तोंपर्यंत ते एकत्र राहिले. परंतु, आतां त्याच कार्यसाधनेकरतां त्यांना विभक्त होण्याचा प्रसंग आला, म्हणून ते विभक्त होत आहेत. या लोकीं जरी हे असामान्य

धनी व सेवक पुन्हां न भेटले, तरी निदान परलोकीं तरी ते निश्चितपणें एकत्र होतील व आपापल्या कार्याचें पर्यालोचन एकत्र बसून करतील यांत शंका नाहीं.

यापुढचें तात्या टोप्यांचें जीवनकार्य आपण पुढील भागांमधून पाहूं. आपल्या कथानकाचे धागेदोरे तात्यांच्या पुढच्या आयुष्याशीं पुढें कसे निगडित झाले हें ध्यानीं येण्याकरतां झांशीच्या महाराणींची थोडी माहिती देऊन हा तात्या टोप्यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध आपण येथेंच संपवूं.

मागील वृत्तांत कथन करतां करतां, हें दिग्दर्शित करण्यांत आलेंच आहे कीं, ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांतील कारस्थानांची माहिती झांशीच्या राजवाड्याला अवगत होत होती; व या दोनहि ठिकाणच्या हालचाली एकमेकांच्या अनुरोधानेंच घडत असत. त्याप्रमाणें ता. ४ जूनला श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं जेव्हां प्रगटपणें कंपनी सरकारशीं युद्ध पुकारलें तेव्हां ती अत्यंत महत्त्वपूर्ण बातमी लगेच झांशीच्या राजवाड्यांत कळविण्यांत आली. त्यासरशीं झांशीचें वातावरण क्षुब्ध होऊं लागलें व ता. ७ जून या दिवशीं झांशीदेखील कंपनी सरकारविरुद्ध उठली. तेथील पलटणीनें नित्याप्रमाणें बंड पुकारलें; कंपनीचीं धनागारें लुटलीं, सांपडतील तितक्या गोऱ्या लोकांना यमसदनीं पाठविलें व बहुतेक सैनिक दिल्लीकडे निघून गेले. बंडाच्या वावटळीची ही पहिली उर्मी ओसरतांच ता. ९ जून या दिवशीं झांशीच्या लक्ष्मीनें परागंदा झालेल्या तिच्या राज्यलक्ष्मीला पुन्हां पाचारण केलें व आपल्या संस्थानाचा सर्व कारभार हातीं घेऊन ही गतवैभव झालेली तेजस्वी लक्ष्मीबाई, पुन्हां महाराणी लक्ष्मीबाई बनली.

यानंतरची झांशीची घटना व ब्रह्मावर्ताच्या पेशव्यांचे सेनापति तात्या टोपे यांनीं घडविलेल्या घटना, यांचा कांहीं काळ एकजीव पुढें झाला होता. म्हणून झांशीची ही वीज, कंपनी सरकारवर कशी कडाडली हें प्रथम ध्यानांत धरलें पाहिजे.

झांशीमध्यें महाराणी लक्ष्मीबाईचें धर्मराज्य सुरू झाल्यावर पुढें पेशव्यांचें कंपनी सरकारशीं युद्ध सुरू होऊन त्यांत पेशव्यांना जेव्हां पराभव सोसावा लागला, त्यावेळीं त्यांच्या या झांशीच्या भगिनीनें त्यांना धीर देणारे

संदेश पाठविले होते व पेशव्यांकरतां सर्वस्वहि अर्पण करण्याचा तिनें मनाशीं दृढ निश्चय केला होता.

यानंतर ता. १९ मार्च १८५८ पर्यंत झांशी प्रांतावर महाराणी लक्ष्मीबाईंचें अबाधित राज्य चाललें होतें. त्या दिवशीं कंपनी सरकारचे विख्यात सेनापति सर ह्यू रोज यांनीं झांशीवर आक्रमण केलें, त्यापुढचा झांशीचा इतिहास तात्या टोपे यांच्याशीं निगडित असल्यानें त्याचा वृत्तांत आपण पुढें पाहूं.

येणेंप्रमाणें तात्या टोप्यांनीं ज्या युद्धाचें नेतृत्व पत्करलें व जें युद्ध चालविण्याकरतां त्यांनीं अंतीं आपले प्राणहि समर्पण केले, त्या युद्धाचा विकास कसा होत गेला हें आतांपर्यंत आपण पाहिलें. आतां याच्या पुढील भागीं तात्या टोप्यांनीं स्वतंत्रपणें चालवलेल्या युद्धाची कथा निवेदन करूं.

---

## प्रकरण ४ थें.

# तारा आकाशांत चढूं लागला.

तात्या टोपे यांनीं ता. २५ जुलै इ. स. १८५७ या दिवसाच्या सुमारास श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या सेनापतिपदाची धुरा धारण केली. ही धुरा धारण करणें त्या वेळीं मोठें कठीण होतें. कारण, पहिल्या सैन्यापैकीं फारच थोडें सैन्य जवळ राहिलें होतें, ब्रह्मावर्ताचा राजप्रासाद लुटला जाऊन पेशवे वनवासी झाले होते; व म्हणून सैन्याचा सर्व पोषणाचा भार तात्यांवरच येऊन पडला होता. या वेळची तात्यांची परिस्थिति व राजाराम महाराजांच्या वेळीं धनाजी संताजींची परिस्थिति, यांमध्यें मोठें विलक्षण साम्य आहे. राजाराम महाराज नानासाहेब पेशव्यांप्रमाणेंच परागंदा झाले होते, वनवासी बनले होते. नानासाहेबांची राजधानी ब्रह्मावर्त ही रायगडाप्रमाणें शत्रूंनीं जिकून, लुटून उध्वस्त केली होती. राजप्रासाद भंगले होते. आणि स्वतः नानासाहेब हेहि राजाराम महाराजांप्रमाणेंच एका दूरच्या ठिकाणीं जाऊन गादीचें रक्षण करीत होते. अशा असहाय वेळींच सतराव्या

शतकाच्या अंताला झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाचें सेनापतिपद धनाजी-संताजींना अर्पण करण्यांत आलें. नवीन सैन्य जमविणें, त्याच्याकरितां धनाची व धान्याची व्यवस्था लावणें, त्याला पराभवांतहि उत्तेजित करून लढण्यास सदा उत्सुक ठेवणें हीं अत्यंत महत्त्वाचीं आणि तितकींच बिकट कामें त्यांना करावयाचीं होतीं. त्याचप्रमाणें युद्धसामुग्री जमविण्याचें कामहि धनाजी संताजींना करणें होतें. परंतु, या संबंधांत तात्या टोप्यांचें काम धनाजी संताजीपेक्षांहि अवघड होतें. कारण, धनाजी संताजींना जी युद्धसामुग्री जमवावयाची होती ती पूर्वीच्याच काळची होती. मोंगलांजवळ त्या वेळीं कांहीं नवीन पद्धतीची युद्धसामुग्री उपलब्ध नव्हती. परंतु, तात्या टोप्यांना मात्र इंग्रजांसारख्या आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या प्रतिपक्षावर मात करतां येईल-किमानपक्षी त्यांच्या तोडीस तोड देतां येईल-अशी युद्धाची सामुग्री जमविणें प्राप्त होतें. सारांश, तात्या टोप्यांचें कार्य धनाजी संताजींप्रमाणेंच कांहीं अंशानें अधिकच बिकट होतें. आणि तरीहि तें बिकट काम तात्याटोप्यांनीं देशाधर्माच्या प्रेमानें श्रीमंत पेशव्यांची आज्ञा म्हणून अतिशय उत्साहानें अंगावर घेतलें. कारण-

'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ।

हेंच तत्त्व तात्यांच्या आयुष्यास पूर्णांशांनीं लागूं पडतें.

अशा रीतीनें तात्या टोप्यांनी फत्तेपुराहून श्रीमंत नानांची आज्ञा घेतल्यावर मुळींच वेळ न गमावतां, ते तडक शिवराजपूरला गेले व तेथली ४२ क्रमांकाची (नंबराची) जी पलटण नुकतीच बंड पुकारून उठली होती, तिला आपल्या स्वाधीन करून घेतली. याच अवधीत कानपूरला यश मिळवून अत्यंत अभिमानी झालेला कंपनी सरकारचा सेनापति हॅवेलॉक हा गंगानदी उतरून लखनौला जाण्याच्या सिद्धतेंत होता. तेव्हां तात्यांनीं त्याला हैराण करण्याची योजना ठरविली. एव्हांपासून मराठ्यांची सुप्रसिद्ध असलेली गनिमी काव्याची लढाई, क्रांतिकारकांच्या उठावणींत प्रत्ययास येऊं लागली. तात्या टोप्यांनीं मराठी वीरांचीं चरित्रें नीट काळजीपूर्वक अभ्यासिलीं होतीं. त्याचा त्यांनीं योग्य वेळीं उपयोग केला.

अशा रीतीनें हॅवेलॉकच्या पिछाडीला रंजीस आणून तात्या टोपे एक-

दम काल्पीवर येऊन कोसळले. काल्पी हें नगर कानपूरपासून ४६ मैलांवर वसलें आहे व तेथें एक बळकट किल्लाहि होता. त्याचप्रमाणें तें नगर एकीकडे, फत्तेपुराकडे असलेले श्रीमंत पेशवे व दुसरीकडे महाराणी लक्ष्मीबाईंची झांशी यांच्यामध्यें संबंध कायम ठेवण्यास फार उपयोगी पडणारें होतें. म्हणून तात्या टोपे अकस्मात् या नगरासमोर प्रगट झाले व त्यांनीं हल्ला करून, कंपनी सरकारपासून तें जिकून घेऊन किल्लाहि हस्तगत करून घेतला. नंतर तात्यांनीं ग्वाल्हेरला शिंद्यांच्या पलटणींकडे बोलणें लाविलें. तात्यांच्या वाक्कौशल्यानें व वागण्यांतल्या मोहकतेनें त्यांनीं थोडयाच प्रयासांत त्या पलटणी अनुकूल करून घेतल्या. नंतर अकस्मात् तात्या जणुं गुप्त झाले, तों शिंद्यांच्या पलटणींचें ठिकाण जें मोरार तेथें प्रगट झाले, परंतु ते तेथें वेषांतरांत गेले होते. त्या पलटणींनीं सर्वस्वी तात्यांच्या म्हणण्याला मान्यता दिली. तेव्हां त्यांच्यापैकीं कांहीं सैन्य बरोबर घेऊन तात्या पुन्हां त्वरेनें काल्पीला आले व काल्पीला कानपूरनंतर पेशव्यांचें मुख्य स्थान करावयाचें ठरवून, त्याप्रमाणें तेथें एक नवीनच सृष्टि त्यांनीं अल्पावधींत निर्माण केली. तेथें त्यांनीं लष्करी साहित्याचा व दारूगोळयाचा नवीन कारखाना उघडून नवीन प्रकारचें साहित्य सिद्ध करण्याचा सपाटा चालविला. नंतर त्यांनीं श्रीमंत नानांना ही कामगिरी कळविली. त्या वेळीं नानासाहेबांना धन्यता वाटून त्यांनीं आपल्या वतीनें श्रीमंत रावसाहेबांना काल्पीला धाडून दिलें. अशा रीतीनें कानपूरहून परागंदा झालेली पेशव्यांची सत्ता, काल्पीला पुन्हां अधिष्ठित झाली! ही सर्व अद्‌भुत घटना तात्या टोप्यांनीं, कंपनी सरकारचीं सैन्यें आवतीं भोंवतीं वावरत असतां त्यांच्या नाकावर टिचून घडवून आणली! श्रीमंत रावसाहेबांना काल्पीच्या किल्ल्याच्या रक्षणाला ठेवून, तात्या टोपे पुन्हां कंपनी सरकारच्या सैन्याला गनिमी पद्धतीप्रमाणें रंजीस आणण्याचा उद्योग करण्यास काल्पीच्या बाहेर पडले. हें सर्व करण्यास १८५७ चा नोव्हेंबर महिना उजाडला. पहिल्या धडाक्यास त्यांनीं कानपूरपासून ग्वाल्हेरपर्यंत ठिकठिकाणीं आपल्या चौक्या बसविल्या, व ग्वाल्हेरच्या शिंद्यांच्या सैन्याशीं त्यांनीं आपला संबंध अबाधित ठेविला. इतक्यांत त्यांच्या तीक्ष्ण दृष्टीला दिसून आलें कीं, कानपूरच्या संरक्षणास ठेविलेला इंग्रजांचा विख्यात

सेनापति विंडह्याम याच्याजवळ सैन्य कांहीं फार नाहीं. दुसरा सेनापति जनरल कॉलिन्स हा लखनौच्या सुटकेकरतां तिकडे निघून गेला होता. तेव्हां तात्यांनीं एक धाडसी बेत योजला. यामध्यें त्यांनीं श्रीमंत रावसाहेबांचीहि आज्ञा घेतली व एके दिवशीं अकस्मात् ते यमुना नदी उतरले, व जनरल विंड-ह्यामच्या समोर त्याला कल्पनाहि नसतां ससैन्य येऊन उभे राहिले—कान-पूर पुन्हां जिंकण्याचा त्यांचा हा धाडसी बेत होता !—

यमुनापार झाल्यावर तात्यांनीं वाटेमधील अत्यंत महत्त्वाचीं गांवें भगिनीपूर, शिवली, शिवराजपूर वगैरे अत्यंत वेगानें जिंकून घेतलीं. या सर्व हालचाली तात्यांनीं नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत केल्या व २० नोव्हेंबरला त्यांनीं इंग्रजी अन्नसामुग्रीचा मार्ग मारून काढला. ह्या सर्व बातम्या ज्यावेळीं विंडह्यामला कळल्या, त्यावेळीं तो तांतडीनें तात्यांना अडविण्याकरितां कानपुरापासून जवळ असलेल्या पांडुनदीवर चालून गेला. याच पांडुनदीच्या तीरावर ता. १३–१४ जुलैला श्रीमंत बाळारावांनीं हॅव-लॉक याला अडवून धरण्याचा शूरपणानें प्रयत्न केला होता. परंतु, त्यावेळीं त्यांना यश आलें नाहीं. आणि आज त्याच पांडुनदीवर पुन्हां एकदां कंपनी सरकारची व पेशवे सरकारच्या सेनापतीची गांठ पडली. प्रथम तात्यांनीं आपलें जड सामान व द्रव्यकोश, जालन्यालाच ठेवून दिला होता, व सड्या स्वारीनिशींच त्यांनीं ही धांव ठोकली होती. ता. २५ रोजीं तात्या श्रीखंडी-हून पांडूनदीवर येऊन पोंचले होते. तात्यांचें सैन्य समोर आलेलें पहातांच विंडह्यामनें सरळपणें एकदम तात्या टोप्यांवर चालून घेतलें.

कारण, त्यावेळीं जवळ जवळ सर्व इंग्रजी सेनापतींचा असा ठाम नियम ठरून गेला होता कीं, जेव्हां जेव्हां आशिया खंडांतील लोकांशीं युद्धाचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां पहिल्या धडाक्यालाच त्यांच्यावर अगदीं निर्भयपणें व कसलीहि पर्वा न करतां तुटून पडावें. म्हणजे त्यांचा धीर एकदम खचतो, व ते माघार घेतात. परंतु जर अशी चढाई करण्यास कां कूं केली तर ते शिरजोर होऊन तुटून पडतात. असा सर्वसाधारण समज त्यावेळीं सर्व ब्रिटिश फौजेंत रूढ होता व तो अस्थानीं होता असेंहि नाहीं. हा अनुभव अनेक वेळां आला

होता. परंतु, यावेळीं विडह्यामचा हा होरा अगदीं चुकला. कारण, तात्या टोप्यांशीं त्याची गांठ होती.

तात्या टोप्यांनीं आपला तोफखाना एका दाट जंगलांत लपवून ठेविला होता. तेथून त्यांनीं विडह्यामच्या सैन्यावर मारा चालविला. प्रथम इंग्लिश सैन्यानें तात्यांच्या कांहीं तोफा हस्तगत केल्या व त्यामुळें त्याना संपूर्ण विजय मिळाला असा भास झाला. परंतु, दुसऱ्याच क्षणांत तात्यांनीं अत्यंत नेटाचा हल्ला करून इंग्लिश सैन्याला मागें रेटलें. विडह्यामचें सैन्य घाबरें झालें व तें थेट कानपूरपर्यंत, मग तात्यांनीं मागें रेटलें. जेथें पेशवाईची पुन्हां प्राण-प्रतिष्ठा झाली होती, तें कानपूर पुन्हां तात्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आलें !

यावेळच्या तात्या टोप्यांच्या शौर्यासंबंधीं व दूरदृष्टीसंबंधीं मालेसन हा इंग्रज इतिहासकार देखील स्तुति करतो. तो म्हणतो कीं, 'बंडखोरांचा पुढारी कांहीं मूर्ख नव्हता. विडह्यामनें जो त्याच्यावर एकदम हल्ला चढविला त्यायोगें तो भिऊन जाण्याऐवजीं विडह्यामची दुर्बलताच त्याच्या ध्यानांत आली. तात्या टोप्यांनीं विडह्यामचीं काय व्यंगें आहेत हीं स्पष्टपणें एकादें उघडें पुस्तक वाचावें त्याप्रमाणें वाचलीं, आणि खऱ्या सेनापतीच्या कुशाग्र बुद्धीनें त्यानेंं या व्यंगांचा आपल्याला उपयोग करून घेण्याचें ठरविलें'.

कानपूरच्या वेशीजवळ तात्यांचें सैन्य विडह्यामचा पाठलाग करीत आलें तों संध्याकाळ होऊन गेली होती. तेव्हां तात्यांनीं आपल्या सैन्यास रात्रभर विसावा दिला. दुसऱ्या दिवशीं शिवली व शिवराजपूर येथून तात्यांचें आणखी तोफखान्याचें सैन्य येणार होतें. तेंही वेळेवर येऊन पोहोंचलें, व त्यांनी तत्काल इंग्लिश सैन्याच्या उजव्या बगलेवर आगीचा वर्षाव चालविला. इकडे स्वतः तात्यांनीं विडह्यामची आघाडी वडवून काढली. त्यासरशीं विड-ह्यामनें 'कारश्यू' नामक एका सेनापतीला ब्रह्मावर्ताच्या बाजूला धाडून तेथून हल्ला करण्यास आरंभ केला. तात्यांनीं लगेच आपलें सैन्य अर्धचंद्राकार व्यूहांत उभें करून ब्रिटिश सैन्याच्या दोन्ही बगलांवर सडकून मारा केला व तोंडावर स्वतः पुन्हां चाल केली. इंग्लिश सैन्य गोंधळून गुदमरून गेलें व हळूं हळूं मागें सरकूं लागलें. तात्या टोप्यांनीं आतां अधिकच लगट केली. सर्व दिवसभर अशी धुमाळी चालून अंतीं संध्याकाळीं इंग्लिश सैन्य उधळन

गेलें. तात्यांना विपुल लूट मिळाली. हजारों तंबू, बैलांचे कळप, त्याच-प्रमाणें धान्य व कपडा हीं सर्व तात्यांच्या हातीं पडलीं. अर्धें कानपूर नगर तात्यांचे हस्तगत झालें. पुन्हां तिसऱ्या दिवशीं सकाळपासून लढाईला तोंड लागलें. इंग्रज सैन्य प्रत्येक जागा मोठ्या निश्चयानें लढवीत होतें. परंतु, तात्याहि अधिक निश्चयानें त्यांना मागें रेटीत होते. दिवसाच्या मध्यापर्यंत इंग्लिशांनीं नेटानें तग धरला. आणि दुपारीं विंडह्यामनें सर्व शक्ति एकवटून तात्यांवर भयंकर वेगाचें आक्रमण केलें. परंतु इकडे तात्यांनींहि तितक्याच भयंकर पराक्रमानें इंग्रजी सैन्याची उजवी बगल मारून काढली. भयंकर रणधुमाळी माजली. इंग्रजांकडे यूरोपमध्यें नांवाजलेला एक रण-कुशल विंडह्यामसारखा सेनापति, शिस्तीमध्यें राबलेल्या सैन्यानिशीं व उत्तम युद्धसामुग्रीनिशीं क्रांतिकारकांवर निकरानें तुटून पडत होता आणि इकडे परवां परवांपर्यंत पेशव्यांच्या घरीं केवळ कारकुनी करणारा तात्या टोपे, बेशिस्त आणि उच्छृंखल क्रांतिकारकांच्या सेनेसह् व अपुऱ्या युद्धसामुग्रीसह त्यांच्याशीं झगडत होता आणि त्याचा अंतीं परिणाम काय झाला? तर इंग्रजी सेनेचा धुव्वा उडाला. त्यांचे नामांकित सेनानायक कामास आले. ब्रिगेडियर विल्सन, कॅप्टन मॅक्‌क्रिआ, मार्फी, मेजर स्टर्लिंग, लेफ्टनंट गिविन्स हे सर्व मृत्युवश झाले! तात्या टोप्यांना संपूर्ण विजय प्राप्त झाला. सर्व कानपूर नगर त्यांचे हातीं पडलें. ता. १७ जुलैला हातून गेलेलें कानपूर नगर अशा रीतीनें ता.२७ नोव्हेंबर १८५७ ला पुन्हां पेशव्यांचे हातीं पडलें! तेथें तात्या टोप्यांना पुन्हां विपुल लूट सांपडली. पांच लाख रुपये, अकरा हजार काडतुसांच्या पेट्या, पांचशें तंबू व इतर अनेक युद्धोपयोगी साहित्य तात्यांच्या हातीं पडलें व कानपूरवर भगवा झेंडा व जरिपटका फडकूं लागला! विंड-ह्यामनें व त्याच्या सैन्यानें या वेळीं शौर्याची पराकाष्ठा केली—आणि तरीहि तात्या टोप्यांनीं त्याच्या हातून पराक्रमानें व हटातटीनें तीन दिवस झगडून विजय हिसकून घेतला! तात्या टोप्यांच्या आयुष्यांत त्यांच्या भाग्याचा तारा यावेळीं परमोच्च बिंदूला जाऊन पोहोंचला. सर्व हिंदुस्थानांत व अंशतः सर्व यूरोपभर तात्यांच्या या विजयानें त्यांचें नांव दुमदुमून गेलें. कानपूर क्रांतिकारकांनीं पुन्हां हिसकून परत घेतलें, या घटनेनें कंपनी सरकारच्या

नांवाला मोठें अपयश लागलें व त्याच मानानें ठिकठिकाणीं पराजित होणाऱ्या इतर क्रांतिकारकांना मोठें धैर्य चढलें. अशा रीतीनें तात्या टोप्यांच्या अपूर्व योजनेनें, चातुर्यानें, सेनापतित्वाच्या कौशल्यानें व निधड्या छातीच्या पराक्रमानें सगळें उत्तरहिंदुस्थान चकित झालें.

याच वेळीं श्रीमंत नानासाहेबहि परत कानपूर–ब्रह्मावर्ताला येऊन पोहोचले व पुन्हां एकदां तेथें स्वराज्याच्या नांवाचा जयजयकार झाला!

इकडे कंपनीच्या सैन्याची ही दुर्दशा ज्या वेळीं प्रमुख सेनापति सर कॉलिन्स यांना कळली, त्यावेळीं ते लखनौचें समरक्षेत्र सोडून विंडह्यामच्या साहाय्याला धांवत आले. परंतु, ज्या दिवशीं कानपुरहून पराभूत झालेल्या इंग्लिश सैन्याला ते मिळाले, त्याच दिवशीं तात्या टोप्यांनीं वरील अपूर्व विजय मिळविलेला त्यांना कळला. त्यायोगें इंग्रजांचा हिंदुस्थानांतील प्रमुख सेनापतिहि मनांत चांचरला व इंग्लिशांच्या नित्याच्या पद्धतीप्रमाणें तडक तात्यांच्या अंगावर चालून न येतां प्रथम आपल्या विस्कळित झालेल्या सैन्याची त्यानें योग्य व्यवस्था लावण्याचा निश्चय करून त्या उद्योगास तो लागला.

अंतीं सर कॉलिन्सनें सर्व व्यवस्था पुरी करून ता. ६ डिसेंबर १८५७ या दिवशीं पेशव्यांच्या सैन्यावर उलट हल्ला करण्यास सुरवात केली. पेशव्यांच्या सैन्याच्या डाव्या बगलेवर स्वतः नानासाहेब पेशवे देखरेख करीत होते. सर कॉलिन्सनें डाव्या बगलेवर हल्ला करण्याची हूल दाखवून चटकन् उजव्या बगलेवर सर्व मारा चालविला. त्यामुळें तात्यांच्या सैन्यांत गोंधळ माजला व पराभव निश्चित दिसूं लागला. तेव्हां पेशव्यांच्या सैन्याचा ब्रह्मावर्ताकडचा मार्ग रोखून धरून तात्या टोप्यांना त्यांच्या सर्व सैन्यासह पूर्ण बुडवून टाकावयाचा डाव सर कॉलिन्सनें टाकला व ब्रह्मावर्ताच्या बाजूला मान्स्फील्ड या नांवाचा एक सेनापति पाठवून त्यास ती बाजू कोंडून धरण्याची आज्ञा दिली. परंतु, रणचतुर तात्या टोपे व नानासाहेब पेशवे यांनीं हा डाव ओळखला. त्यांनीं अत्यंत चपलतेनें मान्स्फील्डवर चालून घेतलें व त्याची फळी फोडून हे मराठे सिंह त्यांच्याभोंवतीं विणलेल्या सैन्याच्या जाळ्यांतून सुखरूप व सैन्य बचावन हां हां म्हणतां निसटून गेले. सर कॉलिन्सला

प्रत्यक्ष रणांगणावर मोठा विजय मिळाला; परंतु तात्या टोपे ससैन्य निसटून गेले हें ऐकून त्या विजयांतहि त्यास फार खेद झाला.

म्हणून त्यानें लगेच होपग्रँट याच्या हाताखालीं निवडक सेना देऊन त्यास तात्यांच्या पाठीवर त्वरेनें पाठविलें. इकडे तात्या काल्पीच्या मार्गाला लागले व नानासाहेब ब्रह्मावर्ताहून अयोध्येकडे निघाले. होप ग्रॅन्टनें तात्या टोपे यांचा अत्यंत निकराचा पाठलाग केला व ता. ९ डिसेंबर १८५७ या दिवशीं त्यांना शिवराजपूर येथें गांठलें. तात्यांनीं धांवती लढाई देऊन पुन्हां होप ग्रँटला चकविलें व ते निसटून गेले. तरी यावेळीं त्यांच्या बहुतेक तोफा इंग्रजांच्या हातीं पडून सैन्य विस्कळित झालें.

अशा रीतीनें, कंपनीसरकारच्या सैन्यानें पुन्हां कानपूर घेतलें. व मग पुन्हां ब्रह्मावर्त संपूर्णपणें लुटून, राजवाडा व मंदिरें हीं जाळून ब्रह्मावर्ताचा सर्व प्रदेश बेचिराख करून टाकला.

तात्या टोप्यांनीं ह्या पराभवानंतर तडक काल्पीकडे कूच करून, पुन्हां तेथें पूर्ववत् क्रांतिकारकांची गादी चालू केली. पूर्वीं दिल्ली हें बंडवाल्यांचें केंद्र झालें होतें. व तेथें निरनिराळ्या ठिकाणचे बंडवाले जमत असत, परंतु सप्टेंबरच्या अंताला दिल्ली पडली. आणि क्रांतिकारकांना कोठेंहि केंद्रस्थान उरलें नाहीं. लखनौकडे लखनौचा वेढा तेथील वंडवाले लढवीत होते. जगदीशपूरचे महाप्रतापी भीष्माचार्य, कुंवरसिंह व त्यांचे बंधु अमरसिंह हे बिहार प्रांतांत कंपनीसरकारशीं लढत होते. व इकडे झांशीला क्रांतिकारकांची रणदेवता महाराणी लक्ष्मीबाई राज्य करीत होती. तेव्हां या तीन ठिकाणांना एकत्र साधून, एकसूत्रानें पुढचें युद्ध चालवावयास कोठेंतरी एक मध्यवर्ती जागा पाहिजे होती. ती तात्यांनीं काल्पीस स्थापन केली व जवळ जवळ एक वर्षभर, जुलै १८५७ पासून जून १८५८ पर्यंत, त्यांनीं तें स्थान क्रांतिकारकांचें आश्रयस्थान व कारस्थानांचें मुख्य केंद्र बनविलें. एका बाजूला अयोध्या, लखनौ, जगदीशपूर व दुसऱ्या बाजूला झांशी, बांदा सागरकडचे क्रांतिवाले यांच्याशीं संबंध ठेवून, शक्य तितका एकसूत्रीपणा क्रांतीच्या युद्धांत ठेवण्याचा कृतनिश्चयाचा प्रयत्न, तात्या टोपे यांनीं काल्पीला प्रमुख केंद्र बनवून केला. तेथें त्यांनीं ती जागा फार बळकट केली. विपुल दारूगोळा

व द्रव्य तेथें त्यांनीं सांठवून ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांना शक्य तें सहाय्य केलें. यांपैकीं मुख्य उदाहरण म्हणजे झांशीला ज्या वेळीं वेढा पडला त्या वेळीं तात्यांनीं एका मोठ्या सैन्यानिशीं झांशीच्या सहाय्यार्थ धाव ठोकली. लढाईंत त्यांचा पराभव झाला ही गोष्ट वेगळी. परंतु, तात्यांचा उद्योग काय धोरणानें चालला होता हें यावरून ध्यानीं येईल. ज्या वेळीं झांशी पडली, त्या वेळीं महाराणी लक्ष्मीबाई ज्या निघाल्या त्या थेट काल्पीला येऊन पोंचल्या. त्याचप्रमाणें ज्या वेळीं बांदेवाले नबाबांच्या सैन्याचा पराभव होऊन, त्यांचें राजधानीचें ठिकाण बांदा हें १९ एप्रिल १८५८ या दिवशीं कंपनी सरकारच्या व्हिटलॉक या सेनापतीनें जिंकून घेतलें, तेव्हां पेशव्यांचे वंशधर हे बांदेवाले नबाब, आपलें सैन्य मोठ्या कौशल्यानें इंग्रजांच्या कचाटयांतून सोडवून घेऊन, क्रांतिकारकांच्या याच माहेरघरीं–काल्पीला–तडक निघून आले. याचप्रमाणें अन्य ठिकाणचे असहाय झालेले क्रांतिवाले सैनिकहि काल्पीकडे येत असत व तेथें तात्या टोपे सर्वांचा योग्य तो परामर्ष घेऊन, त्यांना पेशवे सरकारच्या वतीनें युद्धाला दाखल करून घेत असत.

येथें एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्देश करणें अवश्य आहे. प्रथमपासूनच क्रांतीचीं दोन मुख्य केंद्रें झालीं. एक दिल्लीचें केंद्र बादशहा बहादूरशहा व त्याचे शहाजादे यांच्या आधिपत्याखालीं व दुसरें केंद्र कानपूर–ब्रह्मावर्त हें नानासाहेब पेशवे व त्यांचे मंत्री, तात्या टोपे, बाळाराव पेशवे रावसाहेब पेशवे यांच्या आधिपत्याखालीं.

या दोन केंद्रांच्या ठिकाणीं क्रांतिकारकांनीं आपल्या अंगचें शौर्य, धाडस, देशाधर्माचें प्रेम वगैरे सद्गुणांचें प्रदर्शन सारख्याच अंशानें जरी केलें, तरी नेतृत्वाच्या संबंधांत दिल्ली अगदीं लंगडी पडली. भावनाप्रधान मुसलमानांची पहिली धडकी जरी जोराची असते, तरी पुढें त्याचें सातत्य, चिकाटी टिकविणें त्यांना कठीण जातें. त्यांतच इंग्लिशांसारख्या राजकारणपटु प्रतिपक्ष्याशीं झगडण्याकरितां समरपाटवाबरोबर जी मुत्सद्दीगिरी लागते ती दिल्लीच्या केंद्रांत अगदींच तुटपुंजी होती. त्यामुळें दिल्लीवर बंडाच्या आरंभीं जरी असामान्य शौर्याची वीज चमकत होती, तरी केवळ चार महिन्यांच्या अवधीतच ती नित्याची लुप्त झाली !

परंतु, कानपूर–ब्रह्मावर्ताला, राजकारणाचे खेळ इंग्लिश लोकांशीं १७७० सालाच्या सुमारापासून खेळलेल्या मराठ्यांमधील वीर आणि मुत्सद्दी यांचें नेतृत्व लाभल्यानें तेथील क्रांतीच्या प्रयत्नांत एकसूत्रीपणा, सातत्य, शिस्त, चिकाटी हीं अधिक दिसून आलीं. युद्ध म्हटलें म्हणजे त्यांत जय तसे पराजय हे यावयाचेच. परंतु, पराजय आल्यानंतर पुन्हां युद्ध सुरूं ठेवणें व पराजयानें हतवल न होतां, 'पतितः पतितः पुनरुत्पतति' या न्यायानें समरांगणींचा खेळ चिकाटीनें पुढें रेटीत नेणें, हें कर्म मोठें कठीण असतें. हें कठीण कर्म कंपनी सरकारच्या सर्व सैनिकांनीं १८५७ सालीं अपूर्व शौर्यानें केलें. व प्रथम प्रत्येक स्थळीं भयंकर कत्तल, भयंकर पराभव व भयंकर हानि होत असतांहि, 'ची' 'ची' न करतां हटेलपणानें, त्यांनीं समरक्षेत्र लढविलें, म्हणूनच त्यांना पाठीमागून यश प्राप्त झालें. असा समरक्षेत्रामधला हटेलपणा, मराठ्यांच्या अंगींहि तोंपर्यंत अखंडपणें वसत होता, हेंच या १८५७ व्या वर्षीं सिद्ध झालें; आणि म्हणूनच १८५७ च्या क्रांतीचा झगडा दोन वर्षेपर्यंत लांबला, नाहीं-तर १८५७ च्याच अंताला या प्रयत्नांचाहि अंत झाला असता.

त्याचप्रमाणें समरनीतीसंबंधींहि हें ब्रह्मावर्त कानपूर काल्पीचें क्षेत्रच सरस ठरलें. बंडाच्या आरंभीं बंड होतांच ठायींठायींचे बंडाचे नेते व सैनिक आपआपल्या ठिकाणीं सत्ता बसवून ठिकठिकाणीं कंपनी सरकार-च्या सैन्याला जर पायबंद देते तर निश्चितपणें १८५७ च्या युद्धाचा इतिहास फार निराळा झाला असता. परंतु तें करण्याचें सोडून देऊन सर्व बंडवाले बंड करून उठले कीं, धूम ठोकीत दिल्लीकडे कूच करून जात. अशा रीतीनें कंपनीच्या सैन्याला अनेक तणावे न लागतां तें निर्वेधपणें दिल्लीवरच सर्व सामर्थ्य एकवटूं शकलें आणि म्हणून दिल्ली एकदां पडल्यावर दिल्लीच्या केंद्रांतलें सर्व बळ नष्ट होऊन बंडाचें अर्धें अंग लुळें पडलें. दिल्लीला जवळ जवळ एक लाख सैनिक कमीअधिक मानानें जमा झाले होते. परंतु त्यांच्यानें चार महिन्यांच्यावर तग धरवला नाहीं. परंतु, इकडे कानपूर–जगदीशपूर या ठिकाणीं केवळ २–२ अथवा ५–५ हजार सैनिकांनींच कंपनी सरकारशीं किती किती दिवस तरी झगडा चालविला.

वास्तविक झांशी, बांदेवाले नवाब, जगदीशपूरचे कुंवारसिंह हे सर्व

पेशव्यांचे संबंधी, ऋणानुबंधी, परंतु त्यांना सर्वांना एके ठिकाणीं नानासाहेबांनीं जमविलें नाहीं. प्रत्येकानें आपापल्या ठिकाणीं राहून, शक्य तोंवर कंपनी सरकारचें सैन्य निरनिराळ्या ठिकाणीं गुंतवून ठेविलें व निरुपाय झाला, तेव्हांच ते एकत्र झाले. झांशी शक्य तों लढली व जेव्हां पडली तेव्हांच झांशीची राणी काल्पीला गेली. त्याचप्रमाणें बांदेवाले नबाब शक्यतों लढले व जेव्हां बांदा पडला, तेव्हांच ते काल्पीला गेले. इतकें कशाला? परंतु, प्रत्यक्ष श्रीमंत नानासाहेब हे स्वत: काल्पीला न राहतां लखनौ, अयोध्या या प्रांताकडे निरनिराळे प्रयत्न करीत झगडा चालू ठेवीत होते व काल्पीचें मध्यवर्ती ठिकाण त्यांनीं रणशूर तात्या टोपे व स्वत:चे प्रतिनिधि म्हणून पाठविलेले श्रीमंत रावसाहेब पेशवे यांच्या स्वाधीन केलें होतें. यामुळेंच या मराठमंडळांनीं हा झगडा इतके दिवस झगडविला. म्हणजे थोडक्यांत म्हणावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, प्रथम जसें हिंदुस्थानचें साम्राज्यपद ब्रिटिशांविरुद्ध मराठ्यांनींच शौर्यानें, चिकाटीनें, मुत्सद्दीगिरीनें झगडविलें व मराठ्यांचा पराभव झाल्यावरच जसें तें नंतर ब्रिटिश सरकारला प्राप्त झालें, तसेंच १८५७ च्या या क्रांतियुद्धांतहि कंपनीसरकारशीं हटातटानें राजसत्तेकरतां झगडा मराठ्यांनींच केला व त्यांचा पराभव ज्या वेळीं ब्रिटिशांनीं केला, त्याच वेळीं हिंदुस्थानचा राजमुकुट फिरून त्यांच्या मस्तकावर दृढपणानें बसला.

असो, अशा रीतीनें तात्या टोप्यांनीं काल्पीला आपलें मुख्य ठाण मांडलें होतें, तेथें ते कानपूरहून दुसऱ्यांदा पराभव पावल्यावर शक्य तों आपलें सैन्य संभाळून घेऊन गेले.

तात्या टोपे यांच्या सेनापतित्वाच्या कालाचे स्पष्टपणें तीन भाग पडतात. पहिला भाग, ता. १७ जुलै १८५७ ला कानपूरचा पहिला पराभव होऊन त्यांच्याकडे पेशव्यांचें मुख्य सेनापतित्व आल्यापासून तों कानपूरचा दुसरा पराभव होऊन तात्या परत काल्पीला १८५७ डिसेंबरच्या अंताला आले तोंपर्यंत होय. या अवधींत तात्यांनीं एकाद्या जादुगाराप्रमाणें, रिकाम्या हातांत माती घेऊन फुंक मारली व त्या फुंकीच्या योगानें एक प्रबळ सेना व एक प्रबळ सत्ताकेंद्र निर्माण करून, चार महिन्यांचे आंतच कंपनी सरकारशीं

बरोबरीच्या नात्यानें पेशवे सरकारची तरवार भिडविली, आणि या चकमकींत अनेक वेळां कंपनी सरकारचा पराभव करून, आपलें तेज प्रगट केलें. अंतीं डिसेंबर १८५७ मध्यें त्यांचा कानपूर व शिवराजपूर येथें पराजय होऊन पुन्हां ते विस्खलित सैन्यासह काल्पीला आले. येथून त्यांच्या सेनापतित्वाच्या दुसऱ्या भागाला आरंभ होतो. विगलित झालेली सेना पुन्हां उभी करून त्यांनीं जानेवारी १८५८ मध्यें, पुन्हां झगडा सुरूं केला. तेव्हांपासून तों ग्वाल्हेरला जून १८५८ मध्यें त्यांचा व पेशवे सरकारच्या अन्य सेनानींचा मोठा पराभव झाला त्या वेळेपर्यंतचा काल हा तात्या टोप्यांच्या आयुष्याचा दुसरा भाग पडतो.

या दुसऱ्या भागांत तात्या टोपे यांनीं जरी अनेक लढाया केल्या व असामान्य घटना घडवून काल्पी नष्ट झाल्यानंतर अल्पावधींत त्यांनीं सबंध ग्वाल्हेर जिंकून तेथें नवी विटी, नवें राज्य निर्माण करून जगाला चकित केलें, तरी या अवधींत त्यांचा वैभवतारा उतरणीकडेच झुकत होता व कंपनी सरकारवर त्यांना कोठेंहि निश्चयात्मक असा विजय मिळवितां आला नाहीं.

यानंतरचा तिसरा भाग म्हणजे जून १८५८ ते एप्रिल १८५९ पर्यंतचा काळ होय. हा त्यांच्या सेनापतित्वाचा संध्याकाळच होय. या काळांत क्षणाचाहि उसंत न घेतां, कणाचाहि द्रव्यसंचय नसतां व विजयाचा आशातंतूहि दिसत नसतां, केवळ कर्तव्य म्हणून, केवळ मराठ्यांचा हटेल बाणा म्हणून, केवळ दत्ताजींच्या 'बचेंगे तो और बी लढेंगे' या प्रत्यक्ष मरणाला तुच्छ लेखणाऱ्या अदम्य धैर्याचे वारसदार म्हणून त्यांनीं झगडा चालविला व जवळ अंतिमचा एक शिपायी संग्रही उरेपर्यंत हातांतली युद्धमान तरवार कोशगत केली नाहीं. हा त्यांच्या सेनापतित्वाच्या काळांतला तिसरा व अंतिमचा भाग होय.

आतांपर्यंत आपण तात्या टोपे यांचा पराक्रमाचा तारा आकाशांत चढून जाणारा काळ अवलोकन केला. कानपूर पुनरपि विंडहॅचामपासून हिस-

कून घेऊन तेथें पुन्हां भगवा झेंडा व जरीपटका फडकाविलेला आपण पाहिला. नंतर या भागाच्या परमोच्च बिंदूपासून त्यांचा भाग्यतारा क्षितिजाभिमुख होऊन ते काल्पीला पुनरपि आले; येथपर्यंतचा वृत्तांत आपण श्रवण केला. आतां ह्या प्रथम काळाचें वर्णन करणारा हा भाग येथेंच संपवून पुढच्या प्रकरणीं आपण त्यांचा अद्भुत घटनांनीं भरलेला पुढील भाग अवलोकन करूं.

---

## प्रकरण ५ वें.

## तारा अस्तगिरीकडे उतरूं लागला.

गेल्या प्रकरणीं आपण पाहिलें कीं, सर कॉलिन्सनें कानपूरवर तात्यांचा पराभव केल्यानंतर तात्या टोपे पुन्हां काल्पीकडे वळले व होपग्रॅन्टनें त्यांचा निकराचा पाठलाग चालविला असतां शिवराजपूर येथें त्याच्याशीं धांवती लढाई खेळून, होपग्रँटच्या हातावर तुरी देऊन ते सुखरूपपणें डिसेंबरच्या मध्यांत परत काल्पीला येऊन पोंचले.

परंतु, काल्पीला आल्यानंतर त्यांच्यापुढें पुन्हां मुख्य प्रश्न येऊन उभा राहिला तो हा कीं, पूर्वींच्या पराजयांत नष्ट झालेल्या तोफा, दारूगोळा व सैन्य यांची भरपाई कशी करावयाची? याच वेळीं लखनौ, अयोध्या व बिहार येथील क्रांतिकारकहि निकरानें झगडा चालवीत होते. म्हणून कॉलिन्स हा कानपूर घेऊन परत लखनौकडे गेला. शिवाय होपग्रॅन्टला शिवराजपूरला जरी तात्यांचा पराजय करून विजयी होतां आलें, तरी त्या विजयानें त्याची हड्डी चांगलीच नरम झाली होती. म्हणून तो तात्यांचा अधिक पाठलाग करूं शकला नाहीं. दिल्ली थंडीगार झाल्यामुळें व तेथील कंपनीसरकारची सत्ता आक्टोबर महिन्यांत पूर्ववत् दृढतेनें स्थापित झाल्यामुळें तेथील मोठी थोरली इंग्लिशांची फौज रिकामी झाली व ती बंडाच्या इतर प्रांतांत वाटून दिली गेली.

याच सुमारास इंग्लिशांच्या सेनापतींनीं, उत्तर हिंदुस्थान पुन्हां एकदां हिमालयापासून तों विंध्यपर्वतापर्यंत जिकून कंपनी सरकारच्या दृढ

सत्तेखालीं आणण्याची एक मोटी योजना सिद्ध केली. उत्तर हिंदुस्थानचे बंडवाल्यांच्या लहान मोठ्या असलेल्या उठावण्यांप्रमाणें, इंग्रज सेनापतीनें लहानमोठे विभाग पाडले व प्रत्येक विभागावर एक एक कुशल सेनापति, त्याच्या हाताखालीं विपुल सेना, व त्या सेनेजवळ भरदार सरंजाम देऊन, निरनिराळया विभागांवर त्यांची रवानगी करून देण्यांत आली.

स्वत: सर कॉलिन्स प्रयागहून निघाला व गंगायमुना यांच्यामधील दुआब त्यानें जिंकून घेऊन, गंगापार होऊन थेट लखनौला जाऊन भिडला; लखनौ, अयोध्या इकडील क्रांतिकारकांचा नि:पात करण्याकरितां व थेट हिमालयाच्या पायथ्यापर्यंत क्रांतिकारकांनीं जिंकलेला प्रदेश पुन्हां परत मिळविण्याकरतां त्यानें उत्तर दिशेला मोहीम चालविली.

अशा रीतीनें सर कॉलिन्स उत्तर दिशा पुन्हां जिंकीत असतां सर ह्यू रोज हा विंध्य पर्वतापर्यंतची दक्षिणदिशा जिकण्यास निघाला. या त्याच्या विभागांत दोन भाग करण्यांत आले. ब्रिगेडिअर व्हिटलॉक हा खालून जबल-पूरपासून वर मध्य हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांचीं ठाणीं हस्तगत करून सर ह्यू रोजला मिळणार होता. स्वत: सर ह्यू रोज या योजनेप्रमाणें ता. ६ जानेवारी १८५८ या दिवशीं महूहून निघाला; व झांशी घेऊन काल्पीला तात्या टोप्यानें निर्माण केलेलें पेशव्यांच्या राजधानीचें नगर काल्पी घेऊन तात्या टोपे याला सर्वस्वी बुडवावयाचा त्यांनीं निर्धार केला.

अशा रीतीनें तात्या टोप्यांना सर्वस्वी बुडविण्याचा विडा उचलून ता. ६ जानेवारी १८५८ ला ह्यू रोजसारखा युद्धनीतिनिपुण असा ब्रिटिश सेनानी मोठी थोरली सेना घेऊन निघाला व वाटेंत कित्येक किल्ले, नगरें व प्रांत घेत घेत पुढें चालला. ता. १० मार्चला त्यानें बाणापूर जिंकून घेतलें व चंदेरीचा प्रख्यात किल्ला परत जिंकून पाडाव केला. नंतर झपाट्यानें पुढें चालून जाऊन ता. २० मार्चला सर ह्यू रोज हा झांशीच्या किल्ल्याच्या १४ मैल अंतरावर येऊन ठेपला.

तात्या टोप्यांचे शत्रू अशा रीतीनें त्यांच्यावर झडप घालण्याकरितां झेंपा टाकीत येत असतां तात्या टोपेहि कांहीं स्वस्थ बसले नव्हते. तो मराठी वाघहि नित्य नव्या योजना योजून कंपनी सरकारच्या मागें गनिमी काव्याच्या

पद्धतीनें सारखा लागला होता. कानपूरच्या पराभवानंतर तात्या काल्पीला आले व कांहीं दिवसांनीं गंगा उतरून श्रीमंत नानासाहेबांना जाऊन भेटले. तेथें त्या थोर वनीसेवकांची पुढील धोरणासंबंधीं पुष्कळच चर्चा झाली असेल. व पुढील बेत नानासाहेबांजवळून सुनिश्चित करून घेऊन तात्या टोपे हे यमुना उतरून पुन्हां काल्पीवर उतरले.

'चरखारी'च्या राजांनीं उद्धटपणानें पेशव्यांना त्यांच्या युद्धांत सहाय्य करण्याचें नाकारलें होतें. त्यामुळें तात्या टोपे हे त्याच्यावर फार खवळले होते. नानासाहेबांना भेटून परत इकडे येतांच तात्यांनीं या उद्दाम चरखारीच्या राजाचें पारिपत्य करण्याचें ठरविलें. कारण, देशाच्या युद्धांत स्वसंतोषानें जर कुणी सहाय्य केलें तर तें सहाय्य तात्या टोपे मोठ्या आस्थेनें घेतच असत. परंतु, जर कुणी हें कर्तव्य करण्याचें नाकारलें तर तात्या टोपे अशा परसत्तार्धाजिण्या व्यक्तीला कठोर प्रायश्चित्त देत असत. त्याप्रमाणें या चरखारीच्या राजाचें पारिपत्य करण्याचा तात्यांनीं निर्धार केला. ही बातमी ज्या वेळीं त्या राजाला कळली त्या वेळीं तो अगदीं गर्भगळित होऊन गेला व त्यानें लॉर्ड क्यानिंग व सर सेनापति सर कॉलिन्स यांच्याकडे मोठ्या केविलवाणेपणानें सहाय्याची याचना केली. ही त्याची दीन वाणी ऐकून लॉर्ड कॅनिंग व सर कॉलिन्स या कंपनी सरकारच्या दोन्हीहि उच्च अधिकाऱ्यांनीं सर ह्यू रोज याला तांतडीची आज्ञा केली कीं, तुम्ही एकदम चरखारीच्या राजाच्या सहाय्याला जाऊन तात्या टोप्यांच्या कचाट्यांतून त्याला सोडवावें!

यावरून तात्या टोप्यांच्या सामर्थ्याला त्या वेळीं हिंदी व युरोपियन दोघेहि कसे भीत असत हें चांगलेंच प्रत्ययाला येतें. परंतु, प्रत्यक्ष व्हाईसरॉय व कमांडर इन्–चीफ या दोघांनींहि इतके प्रयत्न केले म्हणून चरखारीचा राजा तात्यांच्या तडाख्यांतून वांचला कां ? मुळींच नाहीं. सर ह्यू रोज हा झांशीसमोर येऊन ठेपला होता व जरी वरिष्ठतम अधिकाऱ्यांची त्याला आज्ञा झाली होती कीं, प्रथम चरखारीच्या राजाला तुम्ही सोडवावें तरी सर ह्यू रोजला ती आज्ञा तांतडीनें पार पाडतां आली नाहीं.

आणि इकडे तात्या टोप्यांनीं तरी अधिक दिरंगाई कुठें केली ? त्यांनीं त्यांच्या नित्याच्या पद्धतीप्रमाणें झपाट्यानें काल्पीहून कूच केलें व चर-

खारीच्या राज्यामध्यें घुसून त्याच्या सैन्याचा पूर्ण पराभव करून त्याच्या राजधानीवर चढाई केली. अल्प काळांतच ती राजधानी जिंकून घेतली व अशा रीतीनें पेशव्यांशीं उद्दामपणें वागणाऱ्या राजाचें शासन केलें. नंतर पेशव्यांच्या वतीनें व पेशव्यांच्या आज्ञेनें, तात्यांनीं त्याच्याजवळून तीन लाख रुपयांची खंडणी वसूल केली व युद्धामध्यें त्याच्या जिंकलेल्या चोवीस तोफा बरोबर घेऊन तात्या टोपे पुन्हां काल्पीला परत आले.

त्यांच्या ह्या विजयानें आसपासच्या वड्यावड्या जमीनदारांना व लहानमोठ्या राजांना पेशव्यांच्या सत्तेचा वचक बसला व तात्या टोप्यांचा धाक लागला. प्रत्यक्ष व्हाइसरॉय व कमांडर–इन्–चीफ यांनीं जरी कंपनी सरकारच्या दोस्तांना वाचविण्याचे प्रयत्न केले, तरी तात्या टोप्यांच्या कचाट्यांतून ते वांचतीलच असा भरंवसा कोणाच्याहि मनांत उत्पन्न होऊं शकला नाहीं. व त्यामुळें आसपासचे त्रयस्थ म्हणविणारे लहान लहान सत्ताधारी, ज्याचें सैन्य अधिक बलवान् व अधिक समीप असेल त्याला आपला कारभार देऊं लागले. आणि ही घटना तात्या टोप्यांच्या चांगलीच पथ्यावर पडूं लागली. कारण, त्यांना जेव्हां जेव्हां द्रव्याची अथवा तोफांची अथवा युद्धसाहित्याची आवश्यकता भासे, तेव्हां तेव्हां ते असेंच एकादें ब्रिटिश सैन्यापासून दूर असलेलें लहान संस्थान शोधून काढीत व प्रथम त्याजवळ सामोपचारांनीं पेशव्यांच्या नांवानें ते करभार मागत. परंतु, अशा सौम्य उपायांनीं जर काम न झालें तर एकाद्या वावटळीप्रमाणें ते अकस्मात् त्या आज्ञाभंग करणाऱ्या राजावर चालून जात व अवश्य तो करभार सैन्याच्या बलानें हस्तगत करून घेत असत. याच त्यांच्या चातुर्यामुळें पुढें ते अगदीं एकटे पडले असतांहि अनेक वेळां त्यांनीं नवीन सैन्यें, नवीन द्रव्यभांडार व नवीन दारूगोळा यांची निर्मिति करावी !

असो; अशा रीतीनें एकीकडून सर ह्यू रोज हा झांशीचा विध्वंस करून, काल्पीवर तात्या टोप्यांना व पेशव्यांच्या सत्तेला बुडविण्यास येण्याची अटोकाट खटपट करीत होता; तर इकडे तात्या टोपेहि त्याच्याशीं झगडण्याची सिद्धता करण्याचा व त्याला पायबंद देऊन झांशी वांचविण्याचा भगीरथ प्रयत्न करण्यांत गुंतून गेले होते.

इतक्यांत तात्या टोप्यांना बातमी कळली कीं, ता. २० मार्चपासून झांशीभोंवतीं सर ह्यू रोजच्या सैन्याचें वेष्टण पडलें आहे व झांशीची वीज झांशीचें रक्षण एकाद्या महाभारतीय योद्ध्याला साजेल अशा रीतीनें करीत आहे. केवळ २२–२३ वर्षांची ही सुकुमार तरुणी ! परंतु, वर्षांनुवर्षें युद्ध-व्यवसाय करून पांढरे केस झालेल्या महाप्रतापी सेनापतीबरोबर, निःशंक-पणें युद्धाचें ठाण मांडून तोफांच्या गर्जनेनें त्यांना आव्हान करीत आहे, हा देखावा किती विस्मयकारी आहे! इतिहासांत तर याला तोडच नाहीं; परंतु, पुराणांतरींहि देवी दुर्गेच्या कथेव्यतिरिक्त असलें दृश्य कोठें गोचर झालें नाहीं !

आज इतके वर्षांनंतरहि त्या महाराणी लक्ष्मीबाईच्या शौर्याच्या कथा ऐकून, ऐकणारांची वृत्ति आश्चर्यानें जर मुग्ध होत आहे, तर ज्या वेळीं ती संग्रामदेवता प्रत्यक्षपणें, आपल्या मृदुल आणि सुकोमल हातामध्यें प्रचंड व तीक्ष्ण तरवार घेऊन इंग्रजांसारख्या समरझुजार शत्रूंशीं लढत होती व लढतां लढतां अनेक कसलेल्या धिप्पाड सैनिकांचे बळी घेत होती तेव्हां तें दृश्य पाहून भीरु देखील जर रणशूर बनले असले व मेलेलीं प्रेतें देखील जिवंत होऊन समरतांडव करूं लागलीं असलीं तर त्यांत आश्चर्य कसलें ?

झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसारख्या व्यक्ती ह्या केवळ राष्ट्रीय व्यक्ती नसून त्या आंतरराष्ट्रीय व्यक्ती होत. जगांतील कोणत्याहि देशां-तील सुधारणेचा गंध लागलेले लोक घ्या व त्यांना या वीर तरुणीची कथा सांगा, त्यांचें मस्तक आदरानें नम्र झालेंच पाहिजे. इतकेंच काय, परंतु, प्रत्यक्ष इंग्रजांच्या विरुद्ध जरी लक्ष्मीबाई लढल्या तरी देखील गुणग्राही व संस्कृतिसंपन्न इंग्लिश लोकहि, बाईंचें नवयौवनांतलें हें प्रखर शौर्य पाहून आश्चर्यानें व आदरानें धन्योद्गार काढतात ! प्रत्यक्ष सर ह्यू रोजनें देखील महाराणींविषयीं सादर विस्मयच व्यक्त केला आहे.

परक्यांना आणि प्रत्यक्ष शत्रूंना जर महाराणीविषयीं इतका आदर-तर तात्या टोप्यांसारख्या सुहृदयाला व सहकाऱ्याला झांशीच्या ह्या रण-देवतेचें शौर्यशाली वर्तन ऐकून केवढा अभिमान वाटला असेल व तिच्या सहा,

ग्यार्थ धांवून जाण्यास केवढ्या तांतडीनें त्यानें आपली सेना सज्ज केली असेल हें शब्दांनीं सांगण्यापेक्षां कल्पनेनेंच अधिक जाणतां येण्यासारखें आहे.

इ. स. १८५८ च्या मार्च महिन्याच्या अंतिमच्या आठवड्यांत तात्यांकडे झांशीच्या राणीकडून एक दूत संदेश घेऊन आला. त्यामध्यें तात्यांना झांशीच्या सहाय्याला पाचारण केलें होतें. तात्या टोप्यांना हा निरोप मिळतांच त्याचें महत्त्व पूर्णपणें त्यांच्या ध्यानांत आलें व त्यांनीं अत्यंत तातडीनें आपली सेना एकत्र जमविली व नवीन अनेक सैनिकांची भरती केली. बरोबर विपुल धनधान्य व इतर साहित्य झांशीच्या मोचनाकरतां त्यांनीं जमा केलें.

याच सुमारास म्हणजे मार्चच्या २० तारखेपर्यंत लखनौकडचें बंड इंग्रजांनीं मोडून टाकलें होतें; व तेथील बंडवाले दशदिशांना फांकले होते. त्यांतलेच अनेक सैनिक काल्पीला पेशव्यांच्या आश्रयाला अर्थातच आले. व त्यामुळें तात्या टोप्यांची सेना या वेळीं खूप वाढली—जवळ जवळ २०—२२ हजार लोक तात्या टोप्यांच्या भगव्या झेंड्याखालीं एकत्र झाले होते! परंतु, सैन्याची संख्या जरी वाढली होती, तरी त्यांच्यामध्यें शिस्त, चिकाटी, ध्येयाची प्रीति ही अगदीं कमी प्रमाणांत होती. लखनौ व अयोध्याप्रांतांत बंडखोरांचा पराभव आलेला पहातांच प्राण वाचविण्याच्या इच्छेनें पळालेले हे बहुतेक शिपाई होते. बाजारबुणगेच अधिक जमा झाले होते. जे एकनिष्ठ होते ते लखनौकडे मारतां मारतां मेले होते. ज्यांना प्राणभय सुटलें होतें तेच बहुतेक तेथून निसटून इकडे तात्यांकडे चिकटले होते. विनाश्रम व कष्ट न होतां त्यांना यश पाहिजे होतें. परंतु, तें यश त्यांना कार्याच्या पूर्तीकरतां नको असून लूटमार करण्याकरतां पाहिजे होतें. यांमध्यें खरे ध्येयवादी, एकनिष्ठ व शूर सैनिकहि अनेक होते. परंतु या बाजारबुणग्यांच्या आधिक्यामुळें, त्यांचे सर्व प्रयत्न विफल होत असत. आणि तात्या टोप्यांजवळ एवढी प्रचंड सेना या वेळीं झांशीच्या मोचनाकरतां गोळा झाली असतां, सर ह्यूच्या एकाच धावेसरशी ती भरमसाटपणें माघार घेऊन पळूं लागली; यांतलें मुख्य कारणहि हेंच आहे. आजपर्यंत तात्या टोपे यांनींच केवळ दोन दोन हजार सैनिकांसहच मोठमोठे विजय इंग्रजांवर मिळविले होते. व केवळ ४—५

हजार सैन्यासह विंडहॅमसारख्या कुशल सेनापतीशीं तीन दिवसपर्यंत हटातटानें घनघोर युद्ध करून त्याला पराभूत केलें होतें. हें लक्षांत घेतां या वेळीं तात्यांजवळ २०–२२ हजार सेना असूनहि मातीच्या चित्राप्रमाणें पहिल्याच धडकीला सर ह्यू रोजनें ती उधळून लावली, यांतलें इंगितच हें आहे कीं, लखनौ–अयोध्येकडेच हे मिजासी, व्यसनी, पोकळडौली, बहुसंख्य मुसलमान व कांहीं पुरभय्येभाई यांनींच तात्यांची सेना या वेळीं फुगली होती. व म्हणून त्यांच्या कसलेल्या, त्यांच्या शिस्तींत रावलेल्या त्यांच्या मूठभर सैन्याचें, ह्या बाजारबुणग्यांच्या बेशिस्त उधळून जाण्यापुढें कांहीं चाललें नाहीं. व झांशीच्या मोचनाकरतां म्हणून तात्या टोपे जे मोठ्या उत्साहानें, भरपूर सरंजामासह ता. ३० मार्चच्या बेताला निघाले होते, ते आकस्मिकपणें सर ह्यू रोजकडून पराभूत झाले. व त्यायोगें क्रांतिकारकांच्या एकंदर मनःस्थितीवर फार प्रतिकूल परिणाम होऊन स्वतःच्या सामर्थ्याबद्दलचा अविश्वास त्यांच्या हृदयांत प्रादुर्भूत झाला. कानपूर नगर विंडहॅमपासून हिसकावून घेऊन जो एकप्रकारचा दरारा तात्या टोप्यांनीं शत्रुमित्रांच्या मनामध्यें उत्पन्न केला होता तो दरारा या झांशीसमोरील पराभवामुळें लुप्त झाला व क्रांतिकारकांचीं मनें आत्मविश्वासशून्य बनूं लागून कंपनी सरकारच्या सामर्थ्याचा डांगोरा दूरवर पोंचला. अशा रीतीनें या पराभवाचा नैतिक परिणाम बंडवाल्यांना फार विपरीत झाला. यापेक्षां तात्या टोप्यांनीं २–४ हजाराचीच जरी आपली निवडक व शेलकी सेना घेऊन सर ह्यू रोजच्या पाठीवर व बगलांवर त्यांच्या नेहमींच्या गनिमी काव्याच्या पद्धतीप्रमाणें घिरट्या घालीत त्याला सतावलें असतें व प्रत्यक्ष लढाई न देतां ह्यू रोजच्या सैन्याला त्याचा दाणागोटा तोडून व वारंवार छापे घालून रंजीस आणलें असतें तर त्याचा अधिक उपयोग झांशीच्या मोचनाकरतां झाला असता असें वाटतें. आणि मागें एकदां कानपूर प्रथम पडल्यावर कांहीं दिवस अत्यंत अल्प सैन्यबलानेंच तात्या टोप्यांनीं हॅवेलॉकला लखनौकडे जातांना सतावून सोडलें होतें, तीच रणनीति जर या वेळीहि तात्यांनीं सर ह्यू रोजबरोबर लढविली असती तर यशाचा अधिक संभव होता. परंतु, लखनौ वगैरेकडून मोठमोठ्या गर्जना व आत्मश्लाघा करीत आलेल्या या बढाईखोर, स्वच्छंदी आणि ऐष-

आरामी मिय्याभाईच्या वाजारबुणग्यांवर प्रमाणापेक्षां अधिक भरंवसा टाकून तात्या टोप्यांनीं सर ह्यू रोजशीं अशी समोरासमोर गांठ घातली असें दिसतें. नाहींतर, तात्या टोप्यांसारख्या चतुर सेनापतीला असलें अपयश आलें नसतें.

आणि या ठिकाणीं केवळ अपयशच आलें असें नव्हे तर तात्यांच्या अनेक तोफा, सर्व सामुग्री व पुष्कळ युद्धसाहित्यहि इंग्लिश सेनेच्या हातीं लागलें, व ज्या तोफांच्या भडिमारामुळें झांशीचा वेढा उठावयाचा होता, त्याच तोफांच्या भडिमारानें झांशीं पडण्यास सहाय्य केलें ! असा कांहीं हीन-बलाचा हा दैवयोग होता !

अशा रीतीनें मार्च १८५८ च्या अंताला तात्या टोप्यांचा झांशीसमोर मोठा पराभव होऊन ते परत काल्पीकडे वळले, व उरलेंसुरलेलें सैन्य व सामुग्री घेऊन काल्पीला लवकरच दाखल झाले.

यानंतर नितांत निराशा झाली असतांहि आणखी चार दिवस झांशी लढली. आणि ता. ४ एप्रिलला रात्रींच्या वेळीं बहुतेक सर्व सैनिक रणशायी झाल्यावर, झांशीच्या महाराणीनें झांशी सोडून विजेच्या चापल्यानें काल्पीची वाट धरली. सर्व इंग्रजी सैन्याच्या डोळ्यांदेखत ही झांशीची वीज त्यांच्या कचाट्यांतून निसटून गेली. इंग्रजी सैन्याला ही वातमी कळतांच त्यांनीं लेफ्टनंट बोकरच्या आधिपत्याखालीं रात्रींचा २१ मैलपर्यंत राणीचा पाठलाग केला. परंतु त्या सर्वांना चकवून व त्यांच्यापैकीं अनेकांना यमसदन दाखवून राणी थेट काल्पीकडे निघाली. एकदां तर लेफ्टनंट बोकर राणीच्या घोड्याजवळ येऊन पोंचला. त्यासरशी राणीनें एक तरवारीचा सफाईदार हात बोकरवर करून त्याला घायाळ केलें व तो घोड्यावरून उन्मळून खालीं पडला. लगेच ही झांशीची वीज तडक पुढें निघून गेली. अंतीं सर्व विघ्नांना निरस्त करून महाराणी काल्पीला सुखरूप येऊन पोंचल्या. त्यावेळीं त्यांचें अत्यंत हार्दिक स्वागत श्रीमंत रावसाहेब व तात्या टोपे यांनीं केलें. व त्यांच्या शौर्यासंबंधीं सर्व हिंदुस्थानभर फार ख्याति झाली.

याप्रमाणें झांशी ता. ५ एप्रिल १८५८ ला हस्तगत करून सर ह्यू रोज आतां काल्पीकडे आपली दृष्टी वळवूं लागला. इंग्रजांच्या डोळ्यांत हें

काल्पीच्या पेशवे सरकारच्या अधिष्ठानाचें शल्य, सारखें जवळ जवळ एक वर्षभर सलत होतें. आतां तर लखनौ अयोध्याहि थंड पडून क्रांतिकारकांची संघटित सत्ता काल्पी प्रांतांत व तिकडे बिहार प्रांतांत कुंवरसिंह व अमरसिंह यांच्या प्रयत्नानें काय ती जिवंत राहिली होती. बाकी ठिकाणची बंडाची ज्वाला बहुतेक विझून गेली होती आणि तरीहि काल्पीला अजून पेशव्यांचा दरबार, पेशव्यांचा भगवा झेंडा, जरीपटका; पेशव्यांचे सरदार, पेशव्यांचीं कारस्थानें, पेशव्यांचीं सैन्यें डौलानें वावरत होती; उधळलेल्या बंडवाल्यांना आश्रय देत होतीं. झांशी पडल्यावर महाराणी लक्ष्मीबाई व बांदा पडल्यावर बांदेवाले नबाब ता. १८–२० एप्रिल १८५८ च्या सुमारास काल्पीला निघून आले. अशा रीतीनें हें काल्पीचें पेशव्यांचें सत्ताकेंद्र तात्या टोप्यांच्या प्रतापामुळें अजूनहि ताजेंतवानें व राजवैभवानें युक्त असें कंपनी सरकारच्या सत्तेला तुच्छ करीत उभेंच्याउभें होतें. त्यामुळें तें कंपनी सरकारच्या डोळ्यांत असहतेनें खुपूं लागलें. आणि म्हणून झांशी पडल्यावर सर ह्यू रोजनें आतां आपला रोंख काल्पीवर वळविला.

इकडे काल्पीला परत आल्यावर तात्या टोपे यांनींहि काल्पीच्या रक्षणाची व सर ह्यू रोजचा समाचार घेण्याची सिद्धता अत्यंत कसोशीनें चालविली. थोड्याच दिवसांत तेथें झांशीच्या महाराणी, बांद्याचे नबाब, शहागडचे राजेसाहेब व बाणापूरचे राजे इत्यादि क्रांतिकारकांचा परिवार गोळा झाला व सर्व लढाईची सिद्धता झाली. परंतु, एकसूत्री कारभार व सैनिक शिस्त याच्या अभावीं हे सर्व प्रयत्न अंतीं योग्य फलदायी झाले नाहींत.

काल्पीपासून ४२ मैलांवर कुंचगांव म्हणून एक स्थळ आहे. तेथें महाराणीच्या व तात्यांच्या आधिपत्याखालीं क्रांतिकारकांनीं सर ह्यू रोजशीं पहिली लढाई दिली. या लढाईंत राणी लक्ष्मीबाईनें अचाट पराक्रम केला व इंग्रजांच्या सैन्याचीहि फार खराबी झाली. परंतु, अंतीं एकसूत्रीपणाच्या अभावीं व शिस्त नसल्यानें येथें तात्या टोप्यांचा व क्रांतिकारकांचा पराभव झाला.

पराभव झाल्यावर नित्याप्रमाणें तात्या टोप्यांनीं अत्यंत कौशल्यानें व

चतुराईनें आपल्या सैन्याची पीछेहाट केली ती शत्रूंनींदेखील वाखाणली. सर्व सैन्य काल्पीकडे परत आलें व तेथें त्यांनीं युद्धाची पुन्हां जंगी सिद्धता केली.

यानंतर काल्पीपासून सहा मैलांवर असलेल्या गलौली या गांवीं सर ह्यू रोजशीं पुन्हां लढाई झाली. या लढाईंत झांशीच्या राणीनें इतक्या निकरानें व अनिवार्यतेनें इंग्रजी तोफखान्यावर हल्ला केला कीं, तो अगदीं हस्तगत होऊन इंग्रजांचा पराभव होण्याची संधि आली. परंतु, इतक्यांत उंटांच्या स्वारांची एक तुकडी इंग्लिशांच्या सहाय्यास आली व लढाईचें पारडें पालटून यशानें इंग्रजांसच माळ घातली.

यानंतर लवकरच काल्पीवरहि हल्ला होऊन इंग्रजांनीं एक आठवड्यानंतर त्यांच्या डोळ्यांत सलणारें हें पेशव्यांचें अधिकारकेंद्र नष्ट करून टाकलें. ही वेळ म्हणजे एप्रिल १८५८ ची होती. काल्पी कंपनी सरकारच्या हातीं पडल्यानें पेशव्यांचें केंद्रच मोडल्याप्रमाणें झालें व त्या योगानें उत्तरेकडचे लखनौ–अयोध्येकडे गेलेले श्रीमंत नानासाहेब पेशवे, श्रीमंत बाळाराव व बिहारचे अमरसिंह यांचा व दक्षिणेकडे आलेल्या तात्या टोपे, श्रीमंत रावसाहेब, झांशीच्या महाराणी, बांदेवाले नबाब, इत्यादींचा संबंध तुटला. उत्तरेकडची मंडळी नंतर आणखी कांहीं दिवस लढून मग निरुपायानें नेपाळांत घुसली. परंतु, तेथेंहि त्यांचे फार हाल होऊन त्यांतच बहुतेकांचा अंत झाला.

श्रीमंत बाळाराव हे नेपाळ सरकारच्या एका तुकडीशीं लढतांना धारातीर्थी पतन पावले. श्रीमंत नानासाहेब व अमरसिंह यांचें पुढें काय झालें हें निश्चितपणें इतिहासाला समजलें नाहीं. पेशव्यांच्या राण्यांनीं मागाहून एक लहानसें गांव नेपाळ सरकारकडून विकत घेऊन तेथें आपले अंतिमचे वनवासी दिवस काढले. त्यांनीं तेथें एक मंदिर बांधलें व त्या मंदिरावर पेशव्यांचा भगवा झेंडा व जरीपटका त्यांच्या वनवासांतल्या दुर्दिनांमध्येंहि फडकत ठेवला.

इकडे दक्षिणेकडे वळलेली क्रांतिकारकांची बहुतेक पुढारी मंडळी काल्पीच्या पराभवानंतर गोपाळपूरला एकत्र जमली. त्यांच्यामध्यें श्रीमंत रावसाहेब, झांशीच्या महाराणी, बांदेवाले नबाब वगैरे मंडळी प्रमुख होती. तात्या

टोपे मात्र तेथें नव्हते. कारण, ते काल्पी पडल्यानंतर एका नवीन कारस्थानास लागले होते. काल्पी पडल्यावर नर्मदेपासून तों हिमाचलाच्या पायथ्यापर्यंत एकाहि ठिकाणीं आतांपर्यंत क्रांतिकारकांचें केंद्र राहिलें नव्हतें. त्यांच्या जवळचें सैन्य दशदिशांना पांगून गेलें होतें व जरी सैन्य उभारतां आलें असतें तरी त्यांना द्रव्यबल कोठून आणावें व युद्धसामुग्री कशी पुरवावी हा मुख्य प्रश्न क्रांतिकारकांच्या या वनवासी पुढाऱ्यांच्या पुढें उभा राहिला. त्याचप्रमाणें त्यांना आतां कोणतेंहि समर्थ असें आश्रयस्थान उरलें नव्हतें. सर्व बाजूंनीं कंपनी सरकारच्या विजयी फौजा त्यांच्यावर अग्निवर्षाव करीत धांवत सुटल्या होत्या. काल्पीला एक वर्षपर्यंत सतत उद्योग करून पेशवे व तात्या टोपे यांनीं विपुल युद्धसाहित्य सांठविलें होतें. साठ हजार टनांची बंदुकीची दारू जमिनीमध्यें पुरलेली कंपनी सरकारच्या हातीं पडली.. मस्केटस्, बंदुकांचे गोळे तयार करणारे कारखाने, हजारों सैनिक वेष, सैनिक ध्वज, नगारे, हाविटझार बंदुका युरोपमध्यें केलेल्या तेथें आणून सांठविल्या होत्या. यावांचून अगणित धनधान्य मिळालें तें निराळेंच. या एका वर्षाच्या अवधींत श्रीमंत रावसाहेब पेशवे व त्यांचे समर धुरंधर सेनापति तात्या टोपे यांनीं किती कष्टानें, किती द्रव्य ओतून काल्पीला हें सर्व जमविलें होतें याची कल्पना सहज करतां येईल. त्यांनीं काल्पी हें नगर अत्यंत परिश्रमानें दुसरी सैनिक राजधानी बनविली होती. व त्याच्या बळावर त्यांनीं एक वर्षभर कंपनीसरकारशीं बरोबरीच्या नात्यानें युद्ध केलें.

परंतु, आतां ती काल्पीहि पडल्यामुळें व तेथील अगणित युद्धसाहित्य प्रतिपक्षाच्या हातीं लागल्यामुळें क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांना निश्चित असें ठिकाणच कोठें उरलें नव्हतें म्हणून तें निर्माण करण्याचें महत्त्वाचें काम करण्याकरतांच तात्या टोपे हे कोठें गुप्तपणानें गेले होते. सैन्यांत मात्र अशी बातमी होती कीं, तात्या हे त्यांच्या वृद्ध वडिलांना भेटण्याकरतां ग्वाल्हेर संस्थानांतील चरखी या गांवीं गेले आहेत. परंतु, तात्या टोपे वास्तविक ग्वाल्हेरच्या सैन्यांतील प्रमुख पुढाऱ्यांना भेटण्यास व त्यांच्याशीं पुढील कारस्थानाचे धागेदोरे जमविण्यास गेले होते, हें पुढील घटनेवरून स्पष्ट झालें.

काल्पी पडल्यावर सर्वांना—शत्रूंना व मित्रांना—वाटलें होतें

कीं, आतां सर्व बंडवाले हताश होऊन शरण येतील, अथवा शत्रूच्या हातच्या गोळ्या खाऊन मरण पावतील. म्हणून जे या बंडाचा दुष्टावा करीत होते ते आनंदानें हर्षून गेले व जे याच्यावर प्रेम करीत होते तें नितांत दुःखानें गांजून गेले.

तरीहि तात्या टोपे, झांशीच्या महाराणी, श्रीमंत रावसाहेब हे सर्व निधड्या छातीचे लोक होते. 'संकटें येति जों गहन। तों चढे त्यांसि अवसान' अशा श्रेणींतले ते रणधुरंधर पुरुष होते व म्हणून तसल्या अत्यंत विपरीत व धननिराशेच्या परिस्थितींतहि गोपाळपूरवर जमून पुढील झगडा कसा लढ-वावयाचा याचा ते विचार करीत होते. थोड्याच दिवसांत तात्या टोपे हे ग्वाल्हेरमधील चरखी गांवाहून आपल्या वृद्ध वडिलांना भेटून व मग ग्वाल्हेर सैन्यांतलें महत्त्वाचें कारस्थान आटोपून परत गोपाळपूरला येऊन दाखल झाले. नंतर त्यांनीं सर्व पुढाऱ्यांपुढें पुढच्या कारस्थानासंबंधीं सर्व गोष्टी विशदपणें निवेदन केल्या. तात्यांनीं शिंद्यांच्या सैन्यांतील प्रमुख व्यक्तींच्या गांठीं घेतल्या. ग्वाल्हेर सैन्याचा व तात्यांचा पूर्वीपासूनच ऋणानुबंध होता. तोच आतां त्यांनीं दृढ केला. ग्वाल्हेरच्या स्वदेशी सैन्यांतील बहुतांश लोकांनीं पेशव्यांच्या स्वराज्यस्थापनेच्या महदुद्योगाला पूर्णपणें सहाय्य कर-ण्याचें आश्वासन दिलें. तात्यांनीं नंतर ग्वाल्हेरचें सैनिक दृष्टीनें निरीक्षण केले व त्याच दृष्टीनें सर्व अवश्य व उपयुक्त माहिती गोळा केली. आणि ही सर्व माहिती व पुढील प्रचंड उद्योगाची रूपरेषा त्यांनीं गोपाळपूरला जम-लेल्या क्रांतिकारक पुढाऱ्यांपुढें मांडली.

तात्या टोप्यांची ही अद्भुत घटना ऐकतांच त्या पुढाऱ्यांच्या सुकत चाललेल्या आशावेलींना पुनरपि नवी पालवी जणुं फुटली. झांशीच्या विजेच्या नेत्रांत पुन्हां नव्या उत्साहाची वीज चमकली, व या घटनेंत पुढचा महान् भविष्यकाळ गर्भित आहे असें तिला वाटलें—मात्र ही यशस्वी झाली पाहिजे.—

आणि खरोखरी तात्या टोप्यांनीं ही प्रचंड कामगिरी केली होती व जर यामध्यें चिरस्थायी यश आलें असतें तर हा क्रांतीचा वणवा पुन्हां भडकून, यानें नवीनच प्रदेश व्यापून टाकला असता. कारण, ग्वाल्हेरचें राज्य जर

श्रीमंत रावसाहेब पेशव्यांच्या आधीन राहिलें असतें तर, तेथून इंदूर व धार हीं मराठमोळ्यांतील अत्यंत महत्त्वाचीं संस्थानेंहि, या इतक्या निकट पुन्हां प्रस्थापित झालेल्या पेशवे सरकारच्या आज्ञेबाहेर जाणें शक्य नव्हतें. निदान तेथील देशी सैन्यें तरी निश्चितपणें पेशवेप्रभूंना मिळालीं असतीं व अशा रीतीनें पुन्हां उत्थित झालेलें हें मराठ्यांचें संयुक्त सैन्य नर्मदा ओलांडून थेट नागपूर व महाराष्ट्र या आपल्या माहेरघराकडे एकाद्या कोसळलेल्या वज्राप्रमाणें क्रांतीच्या कल्पनेचा आघात करीत आलें असतें–आणि जर हें असें झालें असतें तर कोणी सांगावें पुढें काय झालें असतें ! सुप्त पडलेला सह्याद्री कदाचित् ज्वालामुखीप्रमाणें जागृत होऊन युद्धाची आगहि ओकूं लागला असता. सातारा, नरगुंद, कोल्हापूर, त्रिंबक इत्यादि ठिकाणीं बंडाच्या ज्या कांहीं कांहीं ठिणग्या चमकल्या त्यावरून व रंगो बापूजींचीं जीं कारस्थानें चाललीं होतीं त्यांवरून हें उघड आहे कीं, ही क्रांतीची कल्पना इकडेहि त्या वेळीं कांहीं अज्ञात नव्हती. प्रत्यक्ष मुंबईमध्यें कांहीं पलटणींचा कट मोठ्या कौशल्यानें ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं वेळींच दडपून टाकला हें प्रसिद्धच आहे, आणि ५७ च्या क्रांतीच्या आरंभापासूनच नानासाहेब व तात्या टोपे यांचे सारखे प्रयत्न या मराठ्यांच्या माहेरघराशीं पुन्हां संबंध जोडण्याचे चालले होते हें सिद्ध होण्यासारखे अनेक पुरावे उपलब्ध झाले आहेत.

तेव्हां तात्या टोप्यांनीं ग्वाल्हेरचें कारस्थान जुळवून, दक्षिणेचा दरवाजाच आपल्या तोफांच्या धडाक्यानें सताड उघडा करण्याचा प्रचंड खटपटीचा सूतोवाच केला असें म्हणावें लागतें.

गोपाळपूरला जमलेल्या पेशव्यांच्या दरबारानें अंतीं आपला निश्चय कायम केला व पुन्हां एकदां समरपटावर युद्धाचा डाव टाकला. तात्या टोपे या जादुगारानें काल्पी मातीला मिळाली असतां तीच माती हातावर घेऊन पुन्हां एकदां फुंक मारिली व ग्वाल्हेरला एका नव्या राज्याची निर्मिती केली ! मागेंहि ज्या वेळीं कानपूर धुळीला मिळालें त्या वेळीं तीच धूळ हातीं घेऊन त्यांनीं काल्पी निर्माण केली. आज काल्पीनंतर ग्वाल्हेर निर्माण केलें! सामान्य लोकांचा धीर सुटून ज्या वेळीं ते हताश होतात, त्याच वेळीं तात्या टोप्यांसारखे असामान्य पुरुषपुंगव पुन्हां अधिक नेटानें उचल खातात !

अशा रीतीनें एप्रिल व मेमध्यें भगीरथ प्रयत्न करून पेशवे सरकारचें उधळलेलें सैन्य त्यांच्या पुढाऱ्यांनीं एकत्रित केलें व गोपाळपुरावरून कुच करून ता. २८ मे १८५८ ला तें ग्वाल्हेर सीमेंत घुसून आमीन महालाजवळ येऊन ठेपलें. स्वत: श्रीमंत रावपेशवे–श्रीमंत नानांचे प्रतिनिधि–ग्वाल्हेरच्या–आपल्या सरदाराच्या राज्यांत शिरल्यावर तेथल्या सैन्यानें उत्साहभरानें त्यांच्या कार्यात मिळण्याचा निश्चय केला. परंतु, अल्पवयी नृपति जयाजीराव शिंदे व त्यांचे सल्लागार दिवाण सर दिनकरराव राजवाडे यांनीं पेशव्यांचें स्वागत करून त्यांच्या उद्योगास मिळण्याचें नाकारलें. व कंपनी सरकारच्या वतीनें त्यांनीं पेशव्यांस अडथळा करण्याचें धोरण निश्चित केलें. हें तात्या टोपे व झांशीच्या राणीला कळतांच त्यांनीं श्रीमंत रावसाहेबांच्या नांवानें अंतिम आज्ञापत्र धाडलें व सर्व सैन्य घेऊन ते ग्वाल्हेरजवळच्या मोरार किल्ल्यापर्यंत चालून आले. इकडे शिंदे व त्यांचे प्रधान हेहि आपली निवडक सेना घेऊन पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करावयास चालून आले. एका काळचे धनी–सेवकच आज परस्परांशीं लढण्यास सिद्ध झाले !

दोन्ही दळें समोरासमोर येतांच तात्या टोप्यांनीं कांहीं संकेत शिंद्यांच्या सैन्याकरतां केले–तों काय आश्चर्य झालें कीं, शिंद्यांच्या बव्हंश पलटणी शिंदे सरकारचें कृत्य असंमत करून उघड रीतीनें पेशव्यांना येऊन मिळाल्या ! व राहिलेल्या सेनेवर झांशीची लक्ष्मी एकाद्या कृतांताप्रमाणें तुटून पडली. थोडयाच वेळांत युद्धाचा निर्णय लागला. शिंदे पूर्णपणें पराजित होऊन सर दिनकररावांसह समरभूमीवरून पलायन करून आग्र्याला इंग्लिशांच्या आश्रयाला निघून गेले व इकडे ग्वाल्हेर नगरींत पेशवे सरकारच्या विजयी सैन्याचा जयजयकारांत प्रवेश झाला !

ग्वाल्हेरचीं शिंद्यांचीं भरपूर भरून ठेवलेलीं धनागारें, तेथील सुसज्ज सेना, तो संपन्न प्रदेश हें सर्व पेशव्यांचे हातांत पडलें. तात्या टोप्यांच्या कारस्थानांचा संपूर्ण विजय झाला व काल्पीला बुडविलेलें पेशव्यांचें सिंहासन पुन्हां ग्वाल्हेरला तात्या टोप्यांच्या मुत्सद्दीगिरीनें व लक्ष्मीबाईंच्या तरवारीनें निर्माण करण्यांत आलें.

मोरारच्या पेशव्यांच्या विजयाची वार्ता सर्व हिंदुस्थानभर वणव्या-

पेक्षांहि जास्त वेगानें पसरत गेली. इंग्रजांचा प्रत्येक ठिकाणचा सेनापति ही नवीन उठावणी पाहून चमकून उठला. कंपनी सरकारचे सर्व सेनापती, काल्पी पडल्यापासून 'निर्वैरमूर्वीतलं' समजून खाद्य, पेय, विश्रांति, सुट्या, राजिनामे देऊन परत जाणें वगैरे गोष्टींत दंग होते–तोंच त्यांच्या कर्णपथावर बातमी आदळली कीं, ग्वाल्हेरचें राज्य पेशव्यांनीं जिंकलें! ही घटना ऐकून एवढा शांतचित्त लॉर्ड क्यानिंग–पण त्याच्यासुद्धां मनामध्यें निराशेचा संचार झाला व तो बिऱ्हाड बाजलें बांधून, हिंदुस्थानांतून नित्याचें जावें लागतें कीं काय या विवंचनेंत पडला !

इकडे ग्वाल्हेर नगरीनें विजयी पेशवे सरकारचें मोठ्या थाटामाटानें स्वागत केलें. सन्मानार्थ तोफा झडल्या, हत्तीवरून साखरा वाटल्या. नगरांतील भवनें ध्वजापताकांनीं सजून गेलीं. जिकडे तिकडे नवीन आशा, नवीन आकांक्षा व नवीन चैतन्य खेळूं लागलें. मुख्य धनागाराचे अधिकारी अमरचंद यांनीं सर्व धन पेशवे प्रभूंच्या चरणीं अर्पण केलें. ही घटना ता. ३१ मे १८५८ या दिवशीं संपूर्ण झाली.

नंतर ता. ३ जून १८५८ या दिवशीं कानपूरला प्रथम पेशवे उठले त्या दिवसापासून बरोबर एक वर्षानें–ग्वाल्हेरला एक मोठा राज्यारोहण समारंभ झाला. श्रीमंत रावसाहेब पेशवे हे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या प्रतिनिधि स्वरूपानें पेशव्यांच्या सिंहासनावर बसले. एक मोठा दरबार शिद्यांच्या फुलबागेमध्यें भरला. पेशव्यांचे सर्व मानकरी व धारकरी पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें दरबारांत नियुक्त स्थानीं बसले. मुख्य सेनापति तात्या टोपे उल्हसित वृत्तीनें स्वस्थानीं विराजमान झाले. झांशीची रणशूर देवता, बांदेवाले नबाब इत्यादि खाशी खाशी मंडळी यथायोग्य स्थानीं अधिष्ठित झाली. अगदीं पुण्याच्या शनवारवाड्यामधील दरबाराप्रमाणें हा दरबार तात्या टोप्यांच्या नेतृत्वाखालीं थाटला होता. भालदार चोपदार यांच्या ललकाऱ्या झाल्या ; समर वाद्यें वाजूं लागलीं; वीरांचे बाहू स्फुरण पावूं लागले. पेशवाईची पुनरस्थापना तोफांच्या गर्जनेनें सर्व हिंदुस्थानला विदित केली गेली. श्रीमंत रावसाहेब मुख्य सिंहासनीं विराजमान झाले. तात्या टोपे मुख्य सेनापति नेमण्यांत आले व त्यांना त्यांच्या अतुल

कामगिरीकरतां एक रत्नखचित तरवार भर दरबारमध्यें अर्पण कारण्यांत आली. झांशीच्या महाराणीला व बांदेवाले नबाबांना यथोचित मानसन्मान दिले गेले. अष्टप्रधान नेमले गेले; व क्रांतिकारकांच्या सैन्याला त्याच्या एकनिष्ठेकरतां व पराक्रमाकरतां वीस लाख रुपये वांटण्यांत आले. ह्या दरबारच्या प्रदर्शनानें सर्व भरत खंडाला, शत्रुमित्रांना अवगत झालें कीं, क्रांतिकारक अजून मेले नाहींत, पेशवे अजून बुडाले नाहींत, इतकेंच नव्हें तर ते ग्वाल्हेरच्या राज्याला हस्तगत करीत आहेत—तेथें सिंहासनाधीश्वर होत आहेत!

अशा रीतीनें काल्पी पडल्यापासून दोन महिन्यांच्या आंतच मुख्यतः तात्या टोपे यांच्या प्रयत्नानें, मुत्सद्देगिरीनें व कौशल्यानें मावळत्या क्रांतिः पक्षाला पुन्हां एकदां एक नवीन केंद्र निर्माण झालें.

आतां कोणी कोणी या दरबाराच्या व राज्यारोहणाच्या देखाव्याला नांवें ठेवतात. अल्प यशानें पेशवे हुरळून गेले असें म्हणतात. परंतु त्या वेळच्या परिस्थितीचा विचार केला तर हें कृत्य फार मुत्सद्दीगिरीचें व क्रांतिकारकांना नवीन आयुष्य देण्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक असें होतें. कारण, त्यावेळीं सर्वांचाच समज असा झाला होता कीं, बंडवाले सर्व निमाले व कंपनी सरकारचें निष्कंटक राज्य सुरूं झालें. त्यामुळें क्रांतिकारकांना ठिकठिकाणाहून मिळणारें सहाय्य कमी झालें होतें व अनेक मित्रभावानें वागणारे राजे—रजवाडे कंपनी सरकारच्या भयानें उघड विरोध करूं लागले होते. त्याचप्रमाणें अनेक क्रांतिकारकांचे सैनिक निराश होऊन घरोघर किंवा वाट फुटेल तिकडे निघून जाऊं लागले होते. आजपर्यंतच्या सहा महिन्यांत ठिकठिकाणीं क्रांतिकारकांना सारखे पराजयच येत होते; व त्यामुळें क्रांतिकारकांचे पुढारीहि निराश बनून निष्कर्तव्यांत फसूं लागले होते.

तेव्हां या सर्व निराशातमाला निरसविण्याकरितां, हें असल्या तऱ्हेचें एकादें देखाव्याचें व भावनोद्दीपक प्रदर्शन (Demonstration) अवश्यच होतें. प्रत्यक्ष ब्रिटिश सरकार नाहीं कां असले दरबार भरवीत? मग ज्या वेळीं सर्वत्र निराशा माजून बंडवाले निर्मूल झाले असें समजलें जात होतें, तेव्हां असा समारंभ अनवश्यक होता असें कां म्हणावें? उलट या समारंभांत मुत्सद्दीपणा होता असेंच मान्य करावें लागेल. पुढील झगड्याला स्फूर्ति

देण्याचा, घराकडे वळणाऱ्या सैनिकांना पुन्हां समराभिमुख करण्याचा, कंपनी सरकारच्या भयानें शत्रु होऊं पहाणाऱ्या अनेक राजेरजवाडचांना मित्र बनविण्याचा व कंपनी सरकारच्या अहंपणाला व इभ्रतीला पुन्हां एक मोठा हृदरून सोडणारा धक्का देण्याचा तो डाव होता. आणि अशा राजकारणाच्या डावामध्यें जो पैसा व जो वेळ गेला, तो अनाठायीं नसून यथायोग्य रीतीनेंच व्यतीत झाला, असें म्हणावें लागतें. त्याचप्रमाणें तात्या टोपे व झांशीच्या राणीसाहेबांसारखे अन्य पुढारी यांचा जो दक्षिण प्रवेशाचा पुढचा मोठा धुरंधर डाव होता, त्याची ही एक भव्य अशी नांदीच होती.

आणि इकडे कंपनी सरकारच्या सेनापतीमध्येंहि या पेशव्यांच्या विजयाच्या बातमीनें एक प्रचंड स्फोट झाल्याप्रमाणें झालें. सर ह्यू रोजनें काल्पी घेतल्यावर निर्वीर्य सर्व झालें असें मानून 'विश्रामं लभताम् इदं च शिथिलज्याबद्धमस्मत् धनुः' अशी दर्पोक्ति काढून आपल्या पदाचें त्यागपत्र दिलें होतें व विश्रांतीकरतां स्वदेशीं जाण्याच्या तो सिद्धतेंत होता तोंच त्याला ही अद्‌भुत वार्ता कळली. त्यासरशीं तोहि चमकून उठला व त्याचें संमत झालेलें त्यागपत्रहि वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं फेंटाळून लावून त्याला पुन्हां सज्ज होण्याच्या आज्ञा देण्यांत आल्या.

तात्या टोपे यांनीं ग्वाल्हेरच्या घटनेंत जें चातुर्य दाखविलें त्याची मालेसन या इतिहासकारानेंहि मुक्त कंठानें स्तुति केली आहे.

अशा रीतीनें ग्वाल्हेरचा विजय मिळवून तेथें पेशवाईची पुन्हां घोषणा केल्यानंतर मात्र क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांनीं जें शैथिल्य दाखविलें तें घातक झालें. झाशीच्या महाराणीनें याचा निषेध केला; व सत्वर आग्रा वगैरे घेण्याची निकड लावली. तात्या टोपेहि याच योजनेंत गुंतले असले पाहिजेत.

इकडे सर ह्यू रोजला ही ग्वाल्हेरची घटना समजतांच तो एक क्षणहि न गमावतां ग्वाल्हेरवर जयाजीराव शिंद्यांच्यासह चालून आला व ता. १५ जूनला त्यानें मोरारच्या किल्ल्यावर चढाई केली. तात्या टोप्यांनीं तात्काळ आपली सेना तिकडे नेली. परंतु आपले धनी प्रत्यक्ष जयाजीराव हे इंग्लिश सेनेच्या अग्रभागीं उभे आहेत हें पाहून शिंद्याच्या सेनेपैकीं बऱ्याच पलटणींनीं आयत्या वेळीं शिंद्यांवर चाल करण्याचें नाकारलें. त्यामुळें पेशव्यांची बाजू

आरंभालाच लंगडी पडली. मोरारचा किल्ला सर ह्यू रोजनें जिंकून घेतला व तो ग्वाल्हेरवर येऊन थडकला.

ता. १८ जून १८५८ ला ग्वाल्हेरला घनघोर रणकंदन झालें. तात्या-टोपे व झांशीच्या महाराणी यांनीं आपल्या प्रयत्नांची व शौर्याची अनुक्रमें कमाल केली. झांशीच्या राणीनें इंग्रजांचा हल्ला येतांच मोठे रणदुंदुभि वाजवून आपल्या सैनिकांना रणमद आणला व मग ती वज्राप्रमाणें इंग्रजी सेनेवर तुटून पडली. कित्येक तासपर्यंत ही लढाई निकरानें चालविल्या-वर झांशीची वीज अगदीं हातघाईवर आली व सर्व जगत् जणुं विसरून जाऊन लढाईच्या गर्दींत घुसली. तों त्या महाराणीच्या कोमल व तरुण देहा-वर दोन भयंकर घाव बसले. मस्तकावर तरवारीचा घाव बसून त्यांचा एक डोळा बाहेर आला व छातींत संगीनीचा घाव बसून तेथून रक्तस्राव सुरूं झाला. तरीहि ही रणदेवता आपल्या मन्दार आणि काशी या नांवाच्या शूर व लढवय्या दासींसह शत्रूंची फळी फोडून कैक मैल दौड करून गेली. परंतु, कांहीं गोरे शिपाई त्यांच्या पाठलागावर धांवले. अंतीं रक्तस्रावानें निःशक्त होऊन व एका ओढ्यावरून उडी मारण्याचें त्यांच्या घोड्यानें ऐन-वेळीं नाकारल्यावरून ही शूर, मानिनी, आधुनिक काळची देवी दुर्गा, पाठ-लाग करणाऱ्याच्या घावांनीं अंतीं घोड्यावरून धराशायी झाली ! कर्णाचें रथचक्र जसें रणभरांत समयाला पृथ्वीनें गिळलें होतें, तसेंच या समयीं या झांशीच्या महाराणीच्या घोड्यानें कच खाल्ली ! झालें—या ग्वाल्हेरच्या रणक्षेत्रामध्यें १८५७ सालच्या समरक्षेत्रामधली ही तेजस्वी देवता अंतर्हित झाली व क्रांतिकारकांच्या अंगच्या तेजाचा जणुं लोपच झाला ! पेशव्यांच्या हातांतील त्रिभुवन विजयी तरवारच जणुं गळून पडली ! १८५७ च्या होमां-तील तेजाची ज्वालाच जणुं अंतराळांत चढून अस्तंगत झाली ! प्रत्यक्ष इंग्र-जांनींहि या मानिनीची मुक्तकंठानें स्तुति केली !

धन्य हिंदभूमि कीं तिच्या उदरीं राणी लक्ष्मीबाई जन्म घेऊं शकते! धन्य हिंदु जाति कीं तिच्या संस्कृतींत असलें रमणीरत्न घडलें जाऊं शकतें !! व धन्य , धन्य, त्रिवार धन्य महाराष्ट्र कीं जो असल्या त्रिभुवनधन्य विभूतीला स्वतःची म्हणूं शकतो ! ! !

झांशीच्या महाराणी पडल्यावर लढाईचें निदानच झालें—पेशवे पराभूत झाले—ग्वाल्हेर पुनरपि शिंद्यांच्या हातीं इंग्रजांनीं दिला. क्रांतिकारकांचा गट फुटला. खरें सैन्य त्यांच्याजवळ पुढें उरलें नाहीं. दक्षिणेचा दरवाजा स्वतःच्या लाथेनें उघडावयाची तात्या टोप्यांची महत्त्वाकांक्षा मातीला मिळाली. ग्वाल्हेरला सिंहासनाधिष्ट झालेली पेशवाई हा अंतिमचा घोर पराभवाचा वार लागून राणी लक्ष्मीबाईबरोबरच जी निश्चेष्ट पडली ती पुन्हां उठली नाहीं !

क्रांतिकारकांचें राजवैभव आतां मावळलें व ते आतां सामान्य बंडखोरांप्रमाणें सर्व ठिकाणांहून मृगया केले गेले. आतां त्यांच्या जवळच्या राजधान्या, धनांगारें मोठमोठीं राजसैन्यें जाऊन, त्यांना आतां अरण्यें गांठावीं लागलीं—क्षुधेकरतांहि कष्ट सोसावे लागले. सैनिकांच्या लहान लहान टोळ्यांवरच लढाई चालवावी लागली. त्यांच्या मस्तकांवरचीं राजछत्रें कोसळून पडून त्यांच्या गळ्याभोंवतीं फांशीचे फांस आपले हात आवळूं लागले!

आणि तरीहि तात्या टोपे याहि भयंकर पराभवानंतर निसटून गेले—निसटून गेले व सतत पुढें आठ महिने एकाकी लढाई लढत राहिले. येथें समर तात्यांच्या जीवनाचा दुसरा भाग पुरा झाला. त्यामुळें आपणहि हा भाग येथेंच पुरा करून पुढच्या भागीं त्यांचा संध्याकाळचा जीवनवृत्तांत अवलोकन करूं.

---

## प्रकरण ९ वें.

# तारा अस्तगिरीसमीप आला.

गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ग्वाल्हेरच्या रणमैदानांत क्रांतिकारकांचा संपूर्ण पराजय झाल्यावर जें थोडें उरलें सुरलें सैन्य एकत्र करतां आलें तें एकत्र करून तात्या टोपे, श्रीमंत रावसाहेब, बांदेवाले नवाब ही मंडळी अत्यंत चपळाईनें सर ह्यू रोजच्या हातावर तुरी देऊन जौराअलीपूरकडे निघून गेली. परंतु, ता. २२ जूनला तेथेंहि इंग्रजांच्या फौजनें त्यांस गांठलें.

लहानशी लढाई झाली व विजयाची आशा नाहीं असें पहातांच तात्या टोपे व श्रीमंत रावसाहेब हे सरमथुरा येथें गेले. तेथें त्यांनीं पुन्हां एकदां सर्व परिस्थितीचें निरीक्षण केलें. परंतु, त्या निरीक्षणांत त्यांना आशातंतू कोठें दिसला?

श्रीमंत नानासाहेब व बाळाराव पेशवे यांची व तात्या टोप्यांची आतां नित्याचीच ताटातूट झाली. सर्व ठिकाणीं क्रांतीचे प्रयत्न थंड पडले. कंपनी सरकारनें नर्मदेपासून हिमाचलापर्यंत सर्व प्रदेश पुन्हां जिंकून घेतला. ठिक-ठिकाणीं बंडखोरांचीं भयंकर हत्याकांडें झालीं. प्रदेशचे प्रदेश जळून खाक झाले. सर्व सेना पराभूत होऊन उधळून गेल्या. द्रव्य संपलें. कंपनी सरकारचें अगणित सैन्य दशदिशांनीं क्रांतिकारकांची मृगया करण्याकरितां दांतओठ खाऊन धावा घेत होतें. कोणी इष्टमित्र उरला नाहीं. पूर्वीं सहानुभूति दाखवणारे, आतां भाग्याची देवता रुष्ट होतांच शत्रू बनले. शत्रू होते ते आतांचें बलहीनत्व प्रतीत होतांच भयंकर सुडाच्या आवेगानें वेडे होऊन चहूंकडून तुटून पडूं लागले. आश्रयाला सुरक्षित स्थल नाहीं; विश्रांतीला शिबिर नाहीं; इतकेंच काय, परंतु हजारांचे पोशिंदे हे—यानांच वेळेवर खावयास अन्न मिळणेंहि निश्चित नाहीं !

अशाच प्रकारचें कठोर चित्र त्यांच्या चित्तापुढें उभें राहिलें. मग आतां पुढें काय करावें? युद्ध व्यक्त करून कोठें तरी गुप्त होणें त्यांना यावेळीं अगदीं शक्य होतें व दुसरें अनेक क्रांतिकारक पुढारी जसे गुप्त होऊन कोठें-तरी निराळ्या देशांत, निराळ्या वेषांत, सुखेनैव आपलें राहिलेलें आयुष्य शक्यतया सुरक्षित व्यतीत करते झाले, तसेंच तात्यांना व श्रीमंत राव-साहेब पेशव्यांनाहि करतां आलें असतें. परंतु, त्या उभयतांनींहि हा मार्ग स्वीकारला नाहीं. कर्तव्य केवळ कर्तव्याकरतांच करावयाचें—सर्व संक-टांतहि करावयाचें—शेवटचा श्वास निघून जाईपर्यंत कर्तव्यविन्मुख न होतां करावयाचें हा बाणा तात्या टोप्यांचा व रावसाहेबांचा. तेव्हां त्यांना ही विषम, भयद, निराशामय परिस्थिति असली तरी ती कशी भिवविणार ?

पेशवे सरकारच्या आज्ञेनें स्वराज्य संपादण्याकरितां त्यांनीं कंपनी सरकारविरुद्ध तरवार उपसली होती. मग ती तरवार पुन्हां कोशगत करण्या-

सारखें काय घडलें होतें ? कंपनी सरकारचा पराभव झाला ? नाहीं. स्वराज्य संस्थापना झाली ? नाहीं. श्रीमंत नानासाहेब पेशव्यांची आज्ञा युद्ध थांबविण्याची झाली ? नाहीं. मग तरवार कोशांत घालून युद्धविन्मुख कां व्हावें? कसें व्हावें?—

परंतु, संकटें गहन आलीं आहेत ना ? शत्रू सर्वसमर्थ बनले आहेत ना ? यशाची किमपीहि आशा उरली नाहीं ना ? प्राणभय उत्पन्न झालें आहे ना ?—मग तात्या टोपे व श्रीमंत रावसाहेब! आपण युद्ध बंद करण्यास हीं कारणें पुरेशीं नाहींत कां ?

असल्या प्रकारचे अनेक विचार त्यावेळीं सरमथुरेला तात्या टोप्यांपुढें विचारले गेले असतील. परंतु, त्या महायोद्धयानें अंतीं एकच निश्चय ठरविला कीं, अगदीं एकटा उरलों तरी व एकटा उरल्यावरहि युद्धपराङ्मुख होणें नाहीं!

असले कृतनिश्चयी वीर कोणाच्याहि आदरालाच पात्र होतील व म्हणूनच इंग्रज लेखकांनीहि तात्या टोप्यांच्या ह्या दुर्दम निश्चयासंबंधीं धन्योद्गार काढले आहेत. स्कॉटलंडच्या विलियन वॅलेसन, रॉबर्ट ब्रूसन, अथवा हिंदुस्थानच्या महाविख्यात महाराणा प्रतापसिंहानें जें दुर्दांत धैर्य व अखंड कर्तव्यनिष्ठा दाखविली तसलीच कर्तव्यनिष्ठा व दुर्दांत धैर्य, तात्या टोप्यांनी यावेळीं दाखविलें. श्रीमंत रावसाहेब पेशव्यांनीं देखील तात्या टोपे यांच्याबरोबर जसें भाग्यांत, तसेंच दुर्भाग्यांत मोठ्या धैर्यानें व चिकाटीनें स्वराज्यसंपादनाचें कर्तव्य श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या आज्ञेनुसार केलें. अंतीं ज्या वेळीं सैन्यच उरलें नाहीं व तात्या टोपेहि पकडले गेले, त्यावेळीं हा कर्तव्यपरायण शूर व ध्येयनिष्ठ पेशवा, राणीच्या क्षमादानाच्या घोषणेला मान वांकवून शरणागति न स्वीकारतां, गुप्तपणें संचार करीत होता. अंतीं १८६२ या वर्षीं पंजाबांत सियालकोट येथें श्रीमंत रावसाहेब पकडले गेले व त्यांना कानपूरला आणून त्यांची चौकशी होऊन १८६२ मध्यें त्यांना फांशी देण्यांत आलें.

सरमथुरेला बाकी उरलेल्या बंडाच्या पुढाऱ्यांचा लढाई लढविण्याचा कृतनिश्चय होऊन ते तेथून बाहेर पडले. आतां त्यांच्याजवळ धांवती सेना

होती. परंतु, त्या सेनेला पोसायला व युद्धसामुग्री मिळविण्याला साधन कोणतें? असा प्रश्न उत्पन्न झाल्यावर तात्या टोप्यांनीं एक युक्ति शोधली. ती ही कीं, उत्तर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं लहान लहान राज्यें व जहागिरी विपुल पसरलेल्या आहेत, तेव्हां त्यांच्यावर पेशवे सरकारच्या नांवानें खंडणी बसवावयाची. त्यांनीं गुण्यागोविंदानें दिली तर उत्तमच. नाहींतर त्यांच्यावर हल्ला करून ती वसूल करावयाची व त्याच्या बळावर युद्ध लढवावयाचें.

याप्रमाणें युद्ध चालविण्याच्या साधनांची व्यवस्था मनांत त्यांनीं ठरविली व या युद्धाला कांहीं तरी एक अंतिमचा उद्देश व योजना पाहिजे, म्हणून त्यांनीं पुढची योजना अशी आंखली कीं, इंग्रज सेनेला गनिमी काव्याच्या लढाईनें रंजीस आणून व मोठमोठाल्या कठीण मजला मारून एकदां नर्मदातीर गांठावयाचें व मग नर्मदा पार उतरून मराठ्यांच्या माहेरघरीं—नागपूर महाराष्ट्रांत—हें युद्ध नेऊन भिडवावयाचें. त्यावेळीं कदाचित् त्यांच्याकडे दक्षिणेंतील कांहीं राजेरजवाड्यांचीं अथवा महाराष्ट्रांतील अन्य पुढाऱ्यांचीं सूत्रें चालूं असतील. म्हणून तात्या टोपे यांनीं जिवापाड श्रम करून दक्षिणेचा एवढा ध्यास धरला असावा. ग्वाल्हेरला शिंद्यांचें राज्य जिंकलें त्या वेळींहि त्यांच्या डोक्यांत हीच दक्षिणदिशा—विजयाची महत्त्वाकांक्षा उद्दीप्त झाली होती. व आजहि त्यांची सारी मोहीम याच धोरणानें चालली होती.

यावेळीं तात्या टोप्यांनीं सर्व मध्य हिंदुस्थान पायांखालीं तुडवला. चारी दिशांनींच नव्हे तर दशदिशांनीं कंपनी सरकारचीं विजयी सैन्यें, अविरतपणें तात्यांच्या पाठीमागें लागलीं असतांहि तात्या सारखे त्यांना चुकवीत चकवीत, प्रसंग आला तर थप्पड देत व वेळच पडली तर सर्व रणसाहित्य सोडून देऊन माघार घेत, चक्राकार फिरत होते. मी मी म्हणविणारे एवढे इंग्रजी योद्धे, परंतु, तात्यांच्या या युद्धनीतीनें रंजीस आले व तात्या टोपे म्हणजे कांहीं एक सदेह व्यक्ति आहे कीं, एकादी निराकार शक्ति आहे याचीहि त्यांना अनेक वेळां भ्रांति पडली! त्यांच्या भ्रमणशील लढाईची कांहीं रूपरेषा आम्ही देत आहों त्यावरून वाचकांना वरील म्हणण्याची थोडीशी तरी कल्पना येईल.

सरमथुरेवरून भरतपूरकडे जाण्याची तात्यांनीं प्रथम सिद्धता केली. परंतु, तिकडे इंग्रज सैन्य सज्ज होऊन आल्याचें कळतांच, ते एकदम जयपूरकडे मुरडले. परंतु, तेथेंहि इंग्रजी सैन्य आडवें आलें आहे असें कळतांच तात्या दक्षिणेकडे चाल करून गेले. तों त्यांच्या पाठीमागें इंग्रजी सैन्य धांवत आलें. तेव्हां तात्या अकस्मात् टोंक संस्थानकडे वळले व त्यांचा पाटलाग करणाऱ्यांना त्यांनीं तोंडघशीं पाडलें. टोंकच्या नबाबानें आपलें सैन्य तात्यांवर पाठविलें, परंतु, तें सैन्य तात्यांच्या सैन्यासमोर येतांच तात्यांचा जयजयकार करीत तात्यांना चार तोफांसह येऊन मिळालें ! त्यांच्याच सहाय्यानें तात्या टोपे यांनीं टोंक संस्थानांतून भरपूर युद्धसाहित्य, द्रव्य, धान्य वगैरे घेऊन तात्या मग उघडपणें दक्षिण दिशा जिंकण्याकरितां नर्मदेच्या रोंख तडक कूच करून निघाले.

ही बातमी कंपनीच्या सेनापतींना कळतांच त्यांची पांचावर धारण बसली व ते दांत करकर चावून दक्षिणचा तात्यांचा मार्ग रोधून टाकण्यास्तव जिकडून तिकडून धांवून आले. व्हाईसरायहि गडबडले व आतांपर्यंत शांत असलेला दक्षिण हिंदुस्थानहि तात्या, मारूतीनें लंका जशी पेटविली, तसा पेटवून देतात कीं काय याचें त्यांना भय पडलें !

टोंकहून तात्या इंद्रगडाला आले. तेथें दोन इंग्रज सेनापति पिछाडी आणि बगलांकडून तात्यांच्या लहानशा सैन्याला चेंपीत होते व समोर मुसळधार पावसानें दुथडी भरून चाललेली चंबळा घोंघावत वहात होती ! सर्वांना वाटलें कीं, तात्या आतां सांपडणार. परंतु, अत्यंत चातुर्यानें तात्यांनीं बुंदीकडे मार्ग काटला व सर्वांना चकित करीत ते नीमच –नसिराबाद प्रांतांत उतरले; आणि आपल्या अत्यंत दमल्या भागल्या सेनेला विश्रांति देण्याकरतां म्हणून भिलवाडा गांवीं आले. तों तेथें लगेच रॉबर्टस् या नांवाचा एक सेनापति येऊन ठेपला. तेव्हां तात्यांनीं अत्यंत नेटानें व निकरानें सबंध दिवसभर त्यांच्या सैन्याला मार देऊन व थोपवून धरून रात्र पडतांच, तात्या एकाद्या स्वप्नाप्रमाणें ब्रिटिश सेनेसमोरून नाहीसे झाले व उदेपूर संस्थानांतील कोट्रा या गांवीं प्रगट झाले.

तेथें आपल्या शूर सैन्याला विश्रांतीकरतां ठेवून स्वतः तात्या तेथून

जवळच असलेल्या नाथद्वारींच्या क्षेत्रीं श्रीकृष्णदर्शनाला गेले. परत मध्यरात्रीं येतात तों त्यांना दिसून आलें कीं, इंग्रजी सेना समीप येऊन ठेपली.

पुन्हां एक चकमक झडली, हा दिवस १४ ऑगस्ट १८५८ चा होता. या चकमकींत तात्यांच्या थकल्या भागल्या सैन्याची फार दुर्दशा उडाली. त्यांना तोफा टाकून देण्यास सांगून त्यांनीं पुन्हां १५ मैलपर्यंत पीछेहाट केली. पुन्हां तात्या युद्धसामुग्रीविना व तोफांविनाच लढाई चालवूं लागले. तोफा म्हणजे आधुनिक लढाईंतील नांगी. तीच नांगी मोडून पडल्यावर लढाई चालविणें किती कष्टाचें झालें असेल हें एक तात्यांनाच माहित असणार ! त्याची इतरांना कल्पनाहि करतां येणार नाहीं.

तरीहि तात्यांनीं धीर न सोडतां व इंग्रज सेनेचा डाव यशस्वी होऊं न देतां चंबळा नदी ओलांडली. परंतु, पुढें युद्धसामुग्रीविना व तोफाविना तात्या नर्मदेकडे कसे जाणार? ती तर लांब पडत चालली. म्हणून तात्यांच्या कल्पनाशक्तीनें आणखी एक ठिकाण शोधून काढलें व ते शालरापट्टण या संस्थानांत जाऊन उतरले. तेथील राजे तात्यांवर ससैन्य चाल करून आले. परंतु, आश्चर्य काय झालें कीं, तात्या टोपे दिसतांच त्या बिचाऱ्या राजाचें सर्व सैन्य तात्यांचा जयजयकार करीत त्यांना येऊन मिळालें ! येथें त्यांना पुन्हां चतुरंग दल प्राप्त झालें; १५ लाखांचें धन मिळालें–रणसाहित्य मिळालें–व एकंदर ३२ तोफा प्राप्त झाल्या ! केवढी ही किमया ! केवढा हा किमयागार !

पुन्हां नवीन जीवन प्राप्त झाल्यावर श्रीमंत राव पेशवे व तात्या, त्या जुन्याच महत्त्वाकांक्षेचे सफलतेकरतां, दक्षिण जिकण्याकरतां नर्मदेकडे धांवले. पुन्हां कंपनी सरकारचीं सर्व सैन्यें चकित होऊन त्यांना मध्येंच थोपवून धरण्याकरितां आडवीं आलीं.

इतक्यांत तात्या टोप्यांच्या मनांत नवीन व धाडसी कल्पना आली–कीं इंदूर जिंकून घ्यावें. अनेक पराजयांनींहि अपराजित असलेली तात्यांची नवनवोन्मेषशालिनी बुद्धि पाहिली कीं धन्य वाटतें ! चालले–तात्या इंदूरच्या रोखानें चालले व चालले तेहि पवनवेगानें चालले. ग्वाल्हेरच्या आठवणींनीं सर्व इंग्लिश सेनापती भयचकित झाले व सर्वांनीं मिळून या हातीं न लागणाऱ्या, परंतु, ठायीं ठायीं प्रतीत होणाऱ्या तात्यांना पकड-

ण्याकरतां पराकाष्ठा केली. रॉबर्ट होमस् पार्क, मिचेल होप आणि लॉक्हार्ट असे सहा सेनानायक तात्यांच्या पाठीस, पुढून आजूबाजूंनीं धांवले.

तात्या इतक्या अवकाशांत माळव्यांत उतरून रायगडला प्रगट झाले. लगेच मिचेलनें त्यांच्यावर झडप घातली. दोघांचें युद्ध झालें—आणि दमले भागलेलें तात्यांचें सैन्य पराभूत झालें. या वेळीं पुन्हां सर्व तोफा इंग्लिश सैन्याच्या हस्तगत झाल्या.

पुन्हां तात्यांना आपला व्यूह बदलावा लागला. बीटवा नदीच्या तीरानें तात्या अरण्यांतून वाट काढीत सिरंज येथें आले. त्याच वेळीं पर्जन्य राजानें तात्यांस सहाय्य केलें व त्यामुळें इंग्रजी सेनेला हालचाल करणें कांहीं दिवस अशक्य झालें. तात्यांनीं आपल्या सैन्याला विश्रांति दिली.

एका आठवड्यानें तात्या पुन्हां शिंद्यांच्या प्रदेशांत शिरले व ईश्वर-गड येथें त्यांनीं पुन्हां हल्ला करून आठ तोफा मिळविल्या.

तात्या टोपे व श्रीमंत रावसाहेब हे यावेळीं आपल्या सेनेच्या दोन टोळ्या करून निरनिराळ्या मार्गानें—परंतु, नर्मदा गांठण्याच्या एकाच ध्येयानें आपल्या हालचाली करूं लागले. अनेक वेळां नवीन साहित्य मिळवावें, जुनें हरलें जावें, झटापटी व्हाव्या, झुकांड्या द्याव्या, पराभव सोसावे, परंतु परत सैन्य जमवावें अशा रीतीनें ही धनाजीसंताजींच्या लढाईची, चढाईची दुसरी आवृत्ति उत्तर हिंदुस्थानच्या प्रदेशांत तात्या टोपे व श्रीमंत रावपेशवे यांनीं काढून दाखविली.

कांहीं दिवसांनंतर तात्या व राव पुन्हां ललितपूरला एकत्र झाले. आतां मात्र इंग्लिश सैन्य त्यांना चेपीत येत होतें. लगेच ते दोघे कजूरीला आले व तेथून थोडे आणखी उत्तरेला गेले. नर्मदा दूर होत चालली. इंग्लि-शांना वाटलें कीं, आतां नर्मदेचें स्वप्न तात्यांनीं सोडून दिलें—तोंच तीरासारखे तात्या व राव हे अरण्यांतून बाहेर घुसले. इंग्लिश सैन्याशीं चकमकी झडून ते बीटवा नदीपार झाले आणि पुन्हां कंपनीच्या साऱ्या फौजांची कुंडी फोडून थेट नर्मदेच्या रोंखानें चालून गेले !

कंपनी सरकारचीं सर्व सैन्यें वेडावून गेलीं व सैरावैरा तात्यांचा पाठ-लाग करूं लागलीं. जवळ जवळ सात आठ इंग्रजी सेना व त्यांचे सेनापती

तात्यांच्या पाठीमागें धांवले. परंतु, तात्या पुढें आणि पुढेंच थेट नर्मदेकडे घुसले.

तात्या टोपे नर्मदेकडे आले ही बातमी दक्षिण दिशेला वाहणाऱ्या वाऱ्याच्या पंखांवर बसून, जणुं दक्षिणेंत पसरली. नर्मदा नदीचीं गांवें, तात्यांच्या विजेच्या चापल्यानें होणाऱ्या आक्रमणामुळें, हलून, हदरून **गेलीं.**

अंतीं तात्या टोपे व श्रीमंत रावसाहेब पेशवे ससैन्य नर्मदा तीरावर, तीरासारखे येऊन ठेपले ! आणि कंपनी सरकारच्या दशदिशांना फांकलेल्या सैन्याच्या डोळ्यांदेखत तात्या टोपे नर्मदा उतरून दक्षिणेंत आले ! हुशंगाबादेजवळ नर्मदा उतरून तात्या नागपूरच्या समीप आले.

हें असामान्य धाडस, हें असामान्य चापल्य, ही असामान्य कर्तृत्वशक्ति व हें असामान्य मनःसामर्थ्य पाहून मित्रांनीं तर धन्यतेनें व आनंदानें टाळ्या पिटल्याच परंतु, तात्यांचे पाठलाग करणारे शत्रू जे इंग्रज सेनापती त्यांनींहि ते गुणांचे चहाते असल्यानें, तात्यांना धन्यवाद दिले. पौराणिक भाषेमध्यें म्हणावयाचें म्हणजे यक्ष, गंधर्व, किन्नर आणि विमानांतून पहाणारे अखिल देव, यांनीं आनंदानें टाळ्या पिटल्या व तात्यांवर आणि श्रीमंत राव पेशव्यांवर दिव्य फुलांची वृष्टि केली. त्यानें सर्व अवनी आनंदित झाली व स्वर्गलोक तात्यांच्या जयजयकारांनीं निनादित झाला ! तात्यांचें हें कर्म एवढें अचाट होतें, एवढें अफाट होतें.

निजामच्या राजधानींत, पुण्याला, मुंबईला सर्वत्र थोडथोडे धक्के बसले—परंतु, कोणीहि खडबडून उभा राहिला नाहीं; उभा राहून कोणीहि हात उचलला नाही; हात उचलून कोणीहि तात्यांच्या, पेशव्यांच्या वतीनें आघात केला नाहीं, मात्र कंपनी सरकारचीं अखिल दक्षिणदेशींची सुसज्ज चतुरंग दळें निजामचे दळासहित मूठभर सैन्य असलेल्या तात्यांच्या या सेनेवर धांव घेऊन चालून आलीं.

दक्षिणेचा हा अवसानघातकी देखावा पाहून तात्या टोपे मनांत चरकले—त्यांना फार विचार करण्यास वावच नव्हता. नर्मदेच्या उत्तरेकडे, उत्तरेचीं धुरंधर इंग्लिश सैन्यें, व दक्षिणेला दक्षिणेचीं धुरंधर इंग्लिश सैन्यें, तात्या टोप्यांना धरावयाला सैरावैरा धांवत होतीं. तेव्हां अधिक विचाराला वेळ

कोठला? त्यांच्या प्रियकर महाराष्ट्राची ही स्थिति पाहून, तात्यांना त्या वेळीं काय वाटलें असेल तें त्यांचें त्यांनाच माहीत ! परंतु, कोणतेंहि चैतन्य इकडे नाहीं हें पाहून हा मराठा सिंह धीर गंभीरपणें परत फिरला. परंतु, जातां जातां तात्या टोप्यांनीं कंपनी सरकारच्या प्रदेशांत भयंकर धुमाकूळ घातला. आगगाड्या तोडल्या, पोस्टें लुटलीं, तारायंत्रें मोडलीं, मुलूख लुटला व अशी धांदल उडवीत तात्या पुन्हां उत्तराभिमुख झाले.

नर्मदेवरील सर्व उतारांच्या जागा इंग्लिशांनी रोखल्या होत्या. तरीहि तात्या करगुन या गांवीं आले. तेथें मेजर सुंदरलंडशीं त्यांची गांठ पडली. तात्यांनीं लगेच लढाई सुरू केली. लढाईच्या ऐन भरांत, तात्यांनीं एकाएकीं नर्मदेंत आपल्या सैनिकांना उड्या घालण्यास आज्ञा दिली व स्वत: नर्मदेंत उडी ठोकून, सर्व इंग्रजी सैन्य आश्चर्यानें मुग्ध झालें असतां, तात्या आपल्या त्या शूर आणि पराक्रमी सैन्यासह नर्मदेच्या पल्याड जाऊन पोंचले ! यावेळीं सर्व तोफा तात्यांनीं मागें टाकून दिल्या. मालेसन हा इंग्रज इतिहासकार अत्यंत स्तुतिपूर्ण शब्दांनीं म्हणतो कीं, 'तोफांचें वगैरे ओझें जवळ नसल्यानें तात्यांच्या सैन्यानें कूच करण्याचें अतुलनीय चापल्य दाखविलें. असें **चापल्य दाखविण्यांत हिंदी लोकांची वरचढ तर काय, पण बरोबरी करणेंहि जगांतील कोणत्याहि सेनेला अशक्य आहे.'**

आतां तात्यांनीं बडोद्याकडे जाण्याची महत्त्वाकांक्षा धरून ते नित्याप्रमाणें विद्युत्‌गतीनें तिकडे घुसले. राजपुऱ्यापर्यंत येऊन तेथील संस्थानिकांजवळून बरीच खंडणी वसूल करून ते छोटा उदेपूर संस्थानांत घुसले.

परंतु, ते जरी बडोद्यापासून केवळ ५० मैलांवर येऊन टेपले तरी इंग्लिशांचें प्रबल सैन्यहि त्यांना आडवें झालें. म्हणून बडोद्याचा नाद सोडून तात्या पुन्हां उत्तराभिमुख झाले.

याच वेळीं व्हिक्टोरिया महाराणीची क्षमेची घोषणा झाली होती. तिचा लाभ घेऊन आतांपर्यंत पेशव्यांबरोबर लढत असलेले बांद्याचे नबाब इंग्रजांकडे जाऊन त्यांनीं क्षमा मिळविली.

आतां राहिले तात्या व श्रीमंत राव पेशवे. भोंवतालीं निबिड निराशेचा अंधःकार ! दशदिशांना—नव्हे आतां पदापदाला इंग्लिशांचा दलभार!

पुढें क्षमा याचनेचा व्रतच्युत करण्यास मोहनी टाकणारा किमयागार! या अवस्थेंतहि सत्त्व रक्षण करणें हरिश्चंद्राइतकें, किंबहुना त्याच्याहिपेक्षां अधिक कठीण! परंतु, तात्या व श्रीमंत राव यांनीं याहि वेळीं स्वराज्यनिष्ठा राखली! पेशव्यांचें तेजस्वी नांव राखलें! स्वतःच्या माना फांसावर उधळण्याचें दिव्य त्यांनीं आनंदानें पत्करलें परंतु, पेशव्यांचा व त्यांच्या जरिपटक्याचा मान त्यांनीं अढळ ठेवला!

नंतर तात्या एका अरण्यांत शिरले. अनेक पराभवांनीं विद्ध झालेला, सैन्य, तोफा यांच्या नखदंतांनीं विहीन झालेला हा मराठा सिंह अविचल धैर्यानेंच अजूनहि रानावनांतून संचार करीत होता. ११ डिसेंबर १८५८ ला पुन्हां एकदां तात्या रानांतून बाहेर उसळले, पुन्हां एका किल्लेदाराकडून कांहीं रणसाहित्य हिसकून घेऊन ते थेट उदेपूर नगराच्या रोखानें दौड करीत चालले. घायाळविद्ध संत्रस्त झालेल्या सिंहाची ही अंतिमचीच झेप होती! पुन्हां इंग्रज सैन्य आडवें आलें—पुन्हां तात्या अरण्यांत शिरले. आतां अधिक तग धरणें मनुष्याला तर काय, पण अतिमनुष्यालाहि शक्य नव्हतें! तात्या व श्रीमंत राव यांनीं आतां एकमेकांचे निरोप घेण्याचें ठरविलें! त्यांना त्या वेळीं काय वाटलें असेल! धन्य सेवक! धन्य धनी! धन्य सेनापति तात्या टोपे! धन्य श्रीमंत राव पेशवे!

आणि तरीहि त्यांनीं उभयतांनी आणखी एक प्रयत्न करून पाहिला. ज्या अरण्यांत ते घुसले होते तें सर्व बाजूंनीं वेढलें होतें तरी मेजर रॉक ज्या बाजूला होता, त्या बाजूंनीं तात्या व राव यांनीं धडकी मारली. अत्यंत चवताळून त्यांनीं दोघांनीं हल्ला केला व अंतीं मेजर रॉकची फळी फोडून तात्या व राव पुन्हां एकदां जाळें तोडून ससैन्य मुक्त झाले.

ता. २५ डिसेंबरला तात्या कसवाराच्या अरण्यांतून बाहेर पडले. तों दिल्लीचे शहाजादे फिरोजशहा हे लखनौहून निसटून तात्यांना भेटाववयास येत होते. म्हणून पुन्हां एकदां चकमकी करून तात्या इंद्रगडापर्यंत पोंचले व तेथें तात्या, राव व फेरोजशहा यांची गांठ पडली. परंतु तेथेंहि इंग्लिशांनीं त्यांचा पाठलाग केला. तात्यांना इंग्लिश पकडणार तोंच तात्या लगेच निसटून गेले व दीसापर्यंत त्यांनीं कूच केला. दीसाला ता. १६ जानेवारी

१८५९ ला तात्या, राव, फेरोजशहा हे विचार करीत बसले असतां एकदम इंग्लिश सैन्य तात्यांच्या गोटांत घुसलें व एका इंग्लिश शिपायानें तात्यांच्या मानेला हात घातल्याचाहि भास झाला! तत्क्षणीं तात्या, राव, फेरोजशहा हे तेथून जणुं किमयेनें गुप्त झाले! इंग्लिश सैन्य निराश व आश्चर्य यांनीं स्तंभित झालें!

ता. २१ जानेवारी १८५९ ला तात्या एकाएकीं राव व फिरोजशहा यांच्यासह अलवारजवळ शिक्कारा या गांवीं प्रगट झाले. तेथें पुन्हां इंग्लिश सैन्याशीं लढाई झाली. तात्यांचें सैन्य पराभूत झालें.

या पराभवानें मात्र तात्यांची सर्व प्रतिकारशक्ति नष्ट झाली! असा झगडा, असा हटातटाचा प्रतिकार, असा अगम्य प्रयत्न फारच थोड्या नर-पुंगवांनीं केला असेल! आतां परम सीमा झाली.

येथेंच तात्या, राव यांनीं एकमेकांचे निरोप घेतले व तात्या मानसिंग या नांवाच्या एका काळीं तात्यांनीं ज्याला आश्रय व अधिकारपद दिलें होतें त्याच्या आश्रयाला तूर्त कांहीं दिवस केवळ २–३ सेवक मंडळी घेऊन गेले यापुढचें कथानक काय अधिक वर्णवें? हाच मानसिंग थोड्याच दिवसांत इंग्लिशांना फितूर झाला. नरवरचें संस्थान त्याला देऊं करून त्याच्याकडून तात्या टोप्यांना पकडण्याचा कट सिद्ध झाला. उघड रणांगणांत तात्यांना पक-डतां पकडतां आज दोन वर्षें इंग्लिशांचे मोठेमोठे नाणावलेले सेनापति थकून गेले. तरीहि जें कार्य सिद्ध झालें नाहीं तें कार्य या मानसिंगाच्या विश्वास-घातानें सिद्ध करून दिलें!

वास्तविक त्यांची कूच करण्याची शक्ति अद्वितीय होती. इंग्रज सेना-पतींना त्यांचा पाठलाग करतां करतां किती यातायात पडे हें ध्यानीं येण्या-करतां खालील कांहीं आंकडे चिरस्मरणीय आहेत.

' नऊ दिवसांत ब्रिगेडिअर पार्कला २४० मैल व तितक्या दिवसांत ब्रिगेडिअर समरसेटला २३० मैल त्यांनीं नाचविलें. कर्नल होम्सनें वाळवंटी मैदानांतून २४ तासांत ५४ मैल त्यांचा पाटलाग केला आणि ब्रिगेडिअर होनरनें ४ दिवसांत त्यांच्या पाठीस लागून १४५ मैलांची मजल मारली व समरसेटनें ४८ तासांत ७० मैल त्यांचा पाठलाग केला. इतक्या झपाट्यांनीं

मजला इंग्रजी फौज मारीत असतां देखील तात्या टोपे त्यांच्या हातीं लागले नाहींत. तेव्हां तात्यांच्या धडाडीचें व तडफीचें वर्णन करावें तितकें थोडेंच होईल.' (प्रो. वेहरेकृत सन १८५७)

ता. ७ एप्रिल १८५९ हा दिवस मावळून मध्यरात्र झाली होती. तात्या टोपे मानसिंगाच्या विश्वासानें त्यांनींच दाखविलेल्या पारण येथीलं निबिड अरण्यांतील जागीं स्वस्थपणें निद्रा घेत होते—तोंच तो विश्वास-घातकी मानसिंग इंग्लिशांचें दळ घेऊन तेथें आला व तात्या टोपे या गडबडीनें जागे होतात न होतात तोंच, त्यांना पकडून त्यानें इंग्लिशांच्या स्वाधीन केलें!

पेशव्यांचे सेनापति तात्या टोपे, इंग्लिशांचे बंदिवान् झाले! १८५७ च्या वणव्यांतील ह्या अंतिमच्या निखाऱ्यावर पाणी पडलें!! हा दैदीप्य-मान तारा अस्तगिरीला टेंकला!!!

---

## प्रकरण ७ वें

# तारा अस्तंगत झाला !

ता. ७ एप्रिल सन १८५९ ला मध्यरात्रीं तात्या टोप्यांना एका मित्राच्या विश्वासघातानें इंग्लिशांच्या हातीं समर्पित केलें. जें कार्य उत्तर हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या सर्व दळभारांनीं व सेनापतींच्या कौशल्यानें साध्य झालें नाहीं तें दुष्कर कार्य मानसिंगाच्या विश्वासघातानें सुकरपणें साध्य करून दिलें!

नंतर लगेच ता. ८ ला सकाळीं तात्या टोप्यांना शिप्री येथें जनरल मीड याचा गोट होता, तेथें नेण्यांत आलें. तेथें एक सैनिक कोर्ट उघडण्यांत आलें व त्यासमोर तात्या टोप्यांवर दावा करण्यांत आला. इंग्रजांविरुद्ध लढाई केल्याचा आरोप तात्यांवर ठेवण्यांत आला.

तात्या टोपे यांनीं अत्यंत स्पष्ट व धीरोदात्त असें निवेदन या वेळीं केलें. तें म्हणाले कीं, 'मी जें काय केलें ते माझ्या स्वामींच्या आज्ञेप्रमाणें केलें. काल्पीपर्यंत श्रीमंत नानासाहेबांच्या आज्ञेखालीं मी होतों. काल्पी-

नंतर श्रीमंत रावसाहेबांच्या आज्ञेखालीं मी होतों. न्याय्य लढाई व रणक्षेत्र वगळून मी किंवा नानासाहेबांनीं कोणाहि युरोपियन पुरुष, स्त्री अथवा मूल ह्यांना मारलें नाहीं.'

नंतर ते म्हणाले:—'मी इंग्रजांचा चाकर कधींच नव्हतों, त्यामुळें मी बंडखोर ठरत नाहीं. मी इंग्रजी राज्यांत जन्मलों नाहीं व इंग्रजांशीं राजनिष्ठ राहण्याची मी कधीं शपथहि घेतली नाहीं. मी पेशव्यांचा चाकर व मी त्यांचेंच अन्न खाल्लें. त्यांच्याशीं राजनिष्ठ रहाणें हें माझें कर्तव्य होतें व तें मी पूर्णपणें बजाविलें. त्यांनीं आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्यासंबंधीं खटपट चालविली व मी केवळ त्यांच्या आज्ञा पालन केल्या. खरा स्वामिभक्त सेवक धन्याची आज्ञा पालन करणें हें एकच कर्तव्य जाणतो. पेशव्यांचे आज्ञेनें व पेशव्यांचे वतीनें मी तुमच्याशीं युद्ध केलें व अनेक समोरासमोर लढाया दिल्या. मी कोणाचा घातपात केला नाहीं, किंवा कधीं इंग्रजांच्या वायका-मुलांची हत्त्या केली नाहीं. युद्धांत माझा पराभव झाला व मी तुमच्या हातीं लागलों, म्हणून मी दोपी ठरूं शकत नाहीं. शत्रूचा सेनापति हातीं लागल्या-वर त्याच्याशीं जसें सन्मानाचें वर्तन करावयास पाहिजे तसेंच वर्तन तुम्ही माझ्याशीं ठेवणें योग्य ठरेल. युद्धांत जयापजय हा दैवाचा खेळ आहे; परंतु, शूरानें शूराला यथायोग्य मान देऊन त्याचा गौरवच केला पाहिजे. मी तुमचा प्रजाजन नव्हतों व नाहीं. मी पेशव्यांचा प्रजाजन आहें; व मी त्यांच्याशीं राजनिष्टा व स्वामिभक्ति दाखविली, व त्यांच्या आज्ञा पालन केल्या. तेव्हां तुम्ही लादलेल्या बंडाचा आरोप मजवर मुळींच लागू होत नाहीं.' (प्रो. बेहरे कृत १८५७ पा. ४८६–४८७)

तात्यांच्या या सणसणीत आणि तरीहि भारदस्त निवेदनांत त्यांचा स्वभाव पूर्णपणें प्रतीत होत आहे. पकडल्यापासून त्यांचें वर्तन अत्यंत बाणेदारपणाचें, निर्भयतेचें व डौलदारपणाचें झालें. त्यांच्या मुद्रेवर कर्तव्य केल्याचें एक स्वर्गीय समाधान नित्य खेळत होतें.

त्यांच्या चौकशीला तीन दिवस लागले. चौकशीच्या वेळीं या अद्वितीय सेनापतीला पहाण्याकरितां लोकांचे थवेच्या थवे जमत असत. तात्यांना पाहून ते लोक अभिवंदन करीत.

तात्यांच्या चौकशीच्या आधीं तात्यांना त्यांच्यावरील आरोप सांगण्यांत आला व 'कांहीं साक्षीपुरावा असेल तर सांगा' असें कळविण्यांत आलें. तेव्हां तात्यांनीं सडेतोडपणें सांगितलें कीं, 'तुमच्याविरुद्ध मी युद्ध खेळलों आहें व म्हणून मला पक्कें माहीत आहे कीं, आतां मला मरणाला सिद्ध झालें पाहिजे. मला कोणतेंहि न्यायालय नको आहे व त्यामध्यें मला कोणताच भागहि घ्यावयाचा नाहीं.'

अंतीं आपले शृंखलाबद्ध हस्त वर उचलून तात्या म्हणाले 'आतां मला एकच आशा आहे व ती ही कीं, या शृंखलांपासून मुक्त होण्याकरितां मला एकतर तोफेच्या तोंडीं देऊन उडविलें गेलें पाहिजे किंवा फांसावर लटकाविलें गेलें पाहिजे.

तात्यांनीं शेवटीं एकच इच्छा प्रदर्शित केली व ती ही कीं, 'माझ्या वृद्ध वडिलांचा माझ्या कृत्यांशीं कांहींएक संबंध नाहीं व त्यामुळें त्यांना माझ्याकरितां कोणताहि त्रास देऊं नये.'

ता. १८ एप्रिल १८५९ या दिवशीं तात्यांची चौकशी पूर्ण होऊन, त्यांना फांशीची शिक्षा झाली. त्याच दिवशीं दुपारीं ४ वाजतां त्यांना फांशीच्या स्तंभाकडे नेण्यांत आलें. सभोंवार इंग्रज लष्कर गराडा घालून उभें होतें. आजूबाजूला अनेक लोक हें हृदयविदारक दृश्य पहाण्यास उभे राहिले होते. तात्यांच्या शृंखला तोडण्यांत आल्या आणि तात्या टोपे धीरगंभीरपणें फांशीच्या स्तंभावर दृढपदानें चढले. नित्याच्या पद्धतीप्रमाणें ज्या वेळीं तात्यांचे हातपाय बांधण्याकरितां फांशीचे मांग वर आले, तेव्हां तात्या एकदां शांतपणें हंसले व म्हणाले 'छे; या प्रकाराची कांहीं आवश्यकता नाहीं!' लगेच तात्यांनीं आपण होऊन आपली मान फांसांत अडकविली–झालें; मृत्यूचे पाश आवळले गेले. पायाखालील इहलोकची फळी निसटली गेली–तात्यांचें पार्थिव शरीर अधांतरीं लटकूं लागलें व त्यांचा तो प्राण–विहंगम चटकन् आकाशांत उड्डाण करून निजधामाला निघून गेला!

अशा रीतीनें हा उदार, आनंदी, स्थितप्रज्ञ, पेशव्यांचा अंतिमचा वीरवर सेनापति फांसावर टांगला गेला!

झालें, तात्या टोप्यांचें जीवन समाप्त झालें. १८५७ च्या क्रांति युद्धाच्या क्षितिजावर चमकणारा हा दैदीप्यमान तारा अस्तंगत झाला.

तात्या टोपे यांच्यासारख्या वीरवराचें चरित्र कोणालाहि आदरणीयच वाटेल. त्यांची कर्तव्यनिष्ठा जाज्वल्य होती. त्यांचें स्थितप्रज्ञत्व कोणाहि योग्याला साजेल असें होतें. कोणत्याहि पराभवानें त्यांनीं स्वीकृत कार्य सोडलें नाहीं. प्रचंड आपत्तींनीं त्यांचें धैर्य विचलित झालें नाहीं. त्यांचें सेनापतित्व उच्च कोटींतलें होतें.

असा हा अद्वितीय सेनापति कामास येऊन आज ७० वर्षे होऊन गेलीं. शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याच्या कल्पनेंतला व सांप्रदायांतला तात्या टोपे हा अंतिमचा मराठा वीर होता. त्यानंतर तो मनु पालटला. नवीन मनु सुरु झाला. नवीन मनूत नवीन परंपरा, नवीन कल्पना उदयाला आल्या. तरीहि त्यांचा जन्म जुन्या मनूच्या जुन्या परंपरेंतूनच झाला असल्यानें, त्या जुन्या मनूचें यथावत् ज्ञान असणें, नव्या मनूंतील पिढीला अत्यंत आवश्यक असतें. त्यायोगेंच प्रत्येक राष्ट्राचें, जातीचें व व्यक्तीचें वैशिष्ट्य टिकतें. म्हणून सांप्रत देखील आपल्या मागच्या पिढ्यांनीं कोणत्या आकांक्षा धरल्या, कोणती ध्येयें दृष्टीसमोर ठेविलीं व तीं प्राप्त करुन घेण्याकरितां किती बलिदान दिलें याचें यथावत् ज्ञान वर्तमानकाळांत पाहिजे असतें. त्याच दृष्टीनें तात्या टोपे या वीरवर सेनापतींचें हें त्रोटक चरित्र आम्हीं महाराष्ट्रीय वाचकांपुढें ठेवलें आहे. कृतज्ञता बुद्धीनें केलेली ही अल्पसेवा तात्या टोप्यांच्या चरणीं मान्य होवो !

समाप्त

# परिशिष्ट १

## टोपे नांव कसें पडलें.

तात्या टोपे यांच्या घराण्याचें मूळ आडनांव येवलेकर असें होतें. पुढें बाजीराव पेशवे यांनीं तात्यांचें बुद्धिचापल्य, त्यांची तरतरी व शिपाईबाणा हे सद्गुण पाहून एकदां त्यांस एक भरदार टोपी संतुष्ट होऊन पारितोषिक म्हणून दिली. त्या टोपीस एकंदर नऊ रत्नें लाविलीं होतीं. तात्या टोपे यांच्या चित्रांत हीच टोपी त्यांनीं घातलेली काढलेली असते. ज्या दिवशी बाजीरावांनीं ही टोपी तात्यांस अर्पण केली, त्या दिवसापासून श्रीमंत त्यांस येवलेकर म्हणण्याच्या जागीं 'टोपे' म्हणून म्हणूं लागले. झालें; हेंच 'टोपे' हें नांव तात्यांच्या कुलाला रूढ झालें.

तात्या टोपे यांचे वडील वे. शा. सं. पांडुरंग भटजी हे मूळ येवल्याचे रहाणारे. त्यांचें घरदार व शेतीभाती तेथें होती व अजूनहि त्यांच्या वंशजांजवळ ती आहे. हे फार विद्वान् होते. हे केवळ पेशव्यांकडेच भिक्षुकी करीत होते. पेशवेहि ह्यांस फार मान देत होते. शनवार वाड्याजवळच यांनीं एक वाडा विकत घेतला व तेथें ते राहूं लागले. नंतर ते राज्य बुडाल्यावर बाजीरावाबरोबर ब्रह्मावर्तास गेले.

## तात्यांचीं अपत्यें व इतर कुटुंबीय.

तात्या टोपे यांस संवत् १८९८ त 'सखाराम' या नांवाचा मुलगा झाला. व संवत् १९०० मध्यें 'मनोरमा' या नांवाची मुलगी झाली. तिचा विवाह सर्डिगे यांच्याशीं झाला. संवत् १९१४ त बंडाच्या धुमश्चक्रींत तात्यांचा तळ काल्पीमध्यें असतां मनोरमाबाईस एक पुत्ररत्न झालें. त्याचें नांव गोविंद, हे गोविंदराव संवत् १९८८ मध्यें उज्जैन मुक्कामीं मृत्यू पावले. तात्यांना हीं दोनच आपत्यें झालीं. त्यांचे पुत्र सखारामपंत हे पेशव्यांच्या राण्यांबरोबर नेपाळांत त्यांची सेवा करीत होते.

तात्यांचे सावत्र बंधु रघुनाथराव हे बंडानंतर नेपाळांत पेशव्यांच्या राण्यांजवळ सुभे म्हणून सेवा करीत होते. ते सवत् १९४० मध्यें नेपाळांत मरण पावले.

तात्यांचे दुसरे सावत्रभाऊ रामकृष्णपंत हे बडोद्यास होते. ते सुमारें संवत् १९७० मध्यें तेथेंच मरण पावले. त्यांचे पुत्र गजाननराव हे सध्या सुरत कोर्टांत चाकरीवर आहेत.

तात्यांचे आणखी एक सावत्र भाऊ वैजनाथराव अर्थात् बाबाराव हेहि मरेतोंपर्यंत पेशव्यांच्या राण्यांजवळ नेपाळांत सेवा करीत होते.

तात्यांचे गंगाधरराव अथवा बापूराव हे आणखी एक सावत्र भाऊ येवले येथें मूळ घरदार सांभाळून होते. त्यांचे पुत्र नारायणराव हे सध्यां सर्व परिवारांसह येवल्यास नांदत आहेत.

तात्यांच्या सावत्रभावांपैकींच एक वंश आज ब्रह्मावर्तास स्वतःच्या वाड्यामध्यें नांदत आहे. लक्ष्मणराव या नांवाच्या सावत्र भावाचीं मुलें आज ब्राम्हावर्तास हें इतिहासप्रसिद्ध घ राणें सांभाळून आहेत.

तात्यांच्या एकंकर दहा बंधूंपैकीं कित्येक संन्यासदीक्षा घेऊन ब्रह्मावर्त व काशी येथें ब्रह्मरूप झाले.

तात्यांचे वडील पांडुरंगराव हे संवत् १९१९ या वर्षी कार्तिक शु. १२ स काशीक्षेत्रीं माणिकर्णिका घाटीं संन्यास घेऊन समाधिस्त झाले. तात्या टोपे फांशी गेल्यावर ही घटना घडली. तात्या टोपे यांचा ब्रह्मावर्ताचा भव्य वाडा इंग्रजांनीं ब्रह्मावर्त घेतल्यावर पेशव्यांच्या वाड्याबरोबरच अग्निसात् केला गेला. आज ब्रह्मावर्तास नाराणराव लक्ष्मण टोपे हे तात्यांचें घराणें चालवीत आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र 4837